सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित

छत्रपती संभाजीनगर | गुरूवार, दि. २६ मार्च २०२६ | वर्ष - ३ रे | अंक ३४६ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# महिलांची डिजिटल बदनामी ठरणार गुन्हा; ३ वर्षांच्या कोठडीची तरतूद

## भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक कायदा एकमताने विधान परिषदेत मंजूर

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ मार्च :** सोशल मीडिया किंवा इतर कोणत्याही डिजिटल माध्यमाद्वारे महिलांची बदनामी करणे, अश्र्लील व्हिडिओ किंवा फोटो प्रसारित करणे आता महागात पडणार आहे. राज्य सरकारने अशा विकृत कृत्यांना थेट 'लैंगिक गुन्ह्यांच्या' श्रेणीत समाविष्ट केले असून, यासाठी तीन वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असणारे 'भारतीय न्याय संहिता महाराष्ट्र सुधारणा विधेयक २०२६' बुधवारी विधान परिषदेत एकमताने मंजूर करण्यात आले.

**डिजिटल छळाला बसणार लगाम**

आजच्या डिजिटल युगात व्हॉट्सप, फेसबुक, ई-मेल किंवा इतर सोशल प्लॅटफॉर्मवर महिलांना लक्ष्य करण्याचे प्रमाण वाढले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या विधेयकावर बोलताना स्पष्ट केले की, महिलांबाबत आक्षेपार्ह मजकूर पसरवणे किंवा त्यांना डिजिटल माध्यमांतून धमकी देणे हा आता गंभीर गुन्हा मानला जाईल. केंद्र सरकारच्या 'बीएनएस' कायद्यात ज्या त्रुटी होत्या,



मा.मुख्यमंत्री, श्री.देवेंद्र गंगाधरराव फडणवीस

त्या दूर करण्यासाठी राज्याने या महत्त्वाच्या दुरुस्त्या सुचवल्या आहेत.

**ॲसिड हल्ला पीडितांची ओळख राहणार गुप्त**

या विधेयकातील दुसरा सर्वात महत्त्वाचा बदल म्हणजे सिड हल्ल्यातील पीडित महिलांची ओळख आता गुप्त ठेवली जाणार आहे. यामुळे पीडितेच्या सामाजिक प्रतिष्ठेचे रक्षण होण्यास मदत होईल. या दुरुस्त्या आता अंतिम मंजुरीसाठी केंद्राकडे पाठवण्यात येणार आहेत.

**मुले आणि पुरुषांवरील अत्याचारावरही भाष्य**

या चर्चेदरम्यान आमदार हेमंत पाटील यांनी लहान मुले आणि पुरुषांवर होणाऱ्या अत्याचाराचा मुद्दा उपस्थित केला. त्यावर उत्तर देताना मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले की, महिलांप्रमाणेच लहान मुले आणि पुरुषांवरील अत्याचाराच्या घटनांवर 'पोक्सो' (झजउडज) आणि इतर कायद्यांतर्गत तात्काळ कारवाई करण्याची तरतूद आधीच अस्तित्वात आहे.

शिवसेना (ठाकरे गट) आमदार सचिन अहिर यांनी या गुन्ह्यांचा तपास करण्यासाठी 'विशेष तपास यंत्रणा' (डखढ) नेमण्याची सूचना केली, जेणेकरून अशा प्रकरणांचा निकाल जलद गतीने लागेल. या चर्चेत अनिल परब, प्रविण दरेकर, मनिषा कायंदे यांसह अनेक सदस्यांनी सहभाग नोंदवत या बदलांचे स्वागत केले.

# अशोक खरातचे अनेक कांड बाहेर येत आहेत, देवेंद्र फडणवीस यांची विधानसभेत माहिती

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ मार्च :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज पुन्हा एकदा विधानसभेत भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावर भूमिका मांडली. विकृत भोंदूबाबा अशोक खरात याच्या प्रकरणी काल मी सविस्तर निवेदन दिलं आहे. मी सर्वांना विनंती करेन की, ज्यांच्याकडे या प्रकरणाची माहिती आली असेल तर ती माहिती शासनापर्यंत पोहोचवावी. कारण या प्रकरणाची संपूर्ण माहिती मिळवून त्या व्यक्तीला अशी शिक्षा द्यायची आहे की, अशा पद्धतीने वागणारे लोकं आहेत त्यांना जरब बसली पाहिजे. या प्रकरणाने आपण नेमके कुठे जात आहोत? असा विचार करण्याची वेळ आली आहे, असं आवाहन मुख्यमंत्र्यांनी केलं.

आपण नेहमी असं म्हणत- ो की, आत्मविश्र्वास असावा पण अतिआत्मविश्र्वास असू नये. तसेच आपण सर्व श्रद्धा मानणारे लोकं आहोत. पण श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यामध्ये खूप छोटी रेघ आहे. ती रेघ ओलांडली जाते तेव्हा काय होतं ते आपण या प्रकरणातून बघितलं आहे. पण एकप्रकारे अंधश्रद्धेत विवेक हरवतो ते आपल्याला या प्रकरणात बघायला मिळालं आहे, असं मुख्यमंत्री म्हणाले.

# 'स्वाराती' त राडा : ॲड. इस्माईल गवळी यांना सुरक्षारक्षकांकडून मारहाण, संबंधितांवर होणार कारवाई

## १५ दिवसांची सक्तीची रजा, अहवाल वरिष्ठांकडे पाठवणार - अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई, दि. २५ मार्च :** स्वामी रामानंद तीर्थ ('स्व-राती') रुग्णालयात आज दुपारी मोठा गोंधळ उडाला. सामाजिक कार्यकर्ते ॲड. इस्माईल गवळी यांना सुरक्षारक्षकांकडून मारहाण झाल्याची घटना घडल्याने रुग्णालय परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेची माहिती मिळताच राजकीय व सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांसह गवळी यांच्या समर्थकांनी रुग्णालयाकडे धाव घेतली. काही वेळा-तच परिसरात मोठी गर्दी जमून परिस्थिती चिघळली.

मिळालेल्या माहितीनुसार, एका रिक्षाचालकाला किरकोळ कारणावरून सुरक्षारक्षकांकडून मारहाण केली जात होती. ही घटना थांबवण्यासाठी पुढे सरसावलेल्या ॲड. इस्माईल गवळी यांनाही सुरक्षारक्षकांनी मारहाण केली. या प्रकारामुळे रुग्णालयात खळबळ उडाली असून उपस्थितांनी संताप व्यक्त केला. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिसांना पाचारण करण्यात आले. पोलिसांच्या हस्तक्षेपामुळे परिस्थिती नियंत्रणात आली.

**सुरक्षारक्षकांवर कारवाई करावी : ॲड. गवळी**

दरम्यान, मारहाण करणाऱ्या सुरक्षारक्षकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ड. गवळी यांनी केली आहे. घटनेनंतर माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी, उपनगराध्यक्ष दिनेश भराडिया, शेख रहिम, डॉ. नरेंद्र काळे, अमर देशमुख, शेख रमिज यांच्यासह अनेक नगरसेवकांनी अधिष्ठाता कार्यालयात धाव घेत प्रशासनाला जाब विचारला. यावेळी सुरक्षा प्रमुख सोळंके यांनाही बोलावण्यात आले.

अधिष्ठाता डॉ. शंकर धपाटे यांनी तात्काळ कारवाई करत संबंधित सुरक्षारक्षकांना १५ दिवसांच्या सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले असून, संपूर्ण प्रकरणाचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविण्यात येणार असल्याचे स्पष्ट केले. दरम्यान, अधिष्ठाता कार्यालयात जमलेल्या तरुणांनी प्रशासनाविरोधात तीव्र नार-ाजी व्यक्त केली. रुग्णालयातील सुरक्षारक्षकांकडून वारंवार नियमांचे उल्लंघन होत असल्याचा आर-ोप यावेळी करण्यात आला. अखेर राजकिशोर मोदी, डॉ. नरेंद्र काळे आणि अमर देशमुख यांच्या मध्यस्थीने परिस्थिती निवळली.

**सोशल मिडियावर निषेध**

स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालय परिसरात ॲड. इस्माईल गवळी यांना झालेल्या मारहाणीच्या घटनेचे तीव्र पडसाद सोशल मीडियावर उमटले. फेसबुक, व्हॉट्सॲपवर नागरिकांनी तीव्र निषेध व्यक्त करत संबंधित सुरक्षारक्षकांवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. रुग्णालयातच नागरिकांवर मारहाण होणे अत्यंत धक्कादायक आहे, अशा प्रतिक्रिया मोठ्या प्रमाणात उमटत आहेत. काहींनी रुग्णालयातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्र्नचिन्ह उपस्थित केले असून, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी मागणी होत आहे.

# महाराष्ट्रात पेट्रोल, डिझेलचा पुरेसा साठा

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई, दि. २५ मार्च :** महाराष्ट्रात पेट्रोल-डिझेलचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. राज्यात पेट्रोल-डिझेलचा पुरवठा नियमित आहे. नागरिकांनी अफवांकडे दुर्लक्ष करावे; असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रातील जनतेला केले आहे.

राज्यात काही ठिकाणी पेट्रोल-डिझेल संपल्याच्या अफवा पसरल्या. यानंतर पेट्रोल, डिझेल भरून घेण्यासाठी पंपांवर वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या. अनेक पेट्रोल पंपांवर गोंधळाची परिस्थिती निर्माण झाली. या पार्श्र्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी एक्स पोस्ट अर्थात ट्वीट करून जनतेला विश्र्वासात घेतले आहे.




**Authorised Dealers For Bajaj Auto Ltd.: Aurangabad • Adalat Road** PAGARIYA BAJAJ 02406659937 • **AkashPusad** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Harsul Point** PAGARIYA BAJAJ 7709366111 • **Waluj** PAGARIYA BAJAJ 6616734 **Bhokardan Road Sillod** ASHOK BAJAJ 8380001965 • **Shendra** ASHOK BAJAJ 8380025694 • **Buldhana** ASHOK BAJAJ • **Jamkhed** Navale Bajaj 9130609999 8929643158• **Jalna** AMBRISH BAJAJ 8605466906• **Ahmednagar Kinetic Chowk** Chhatrapati Bajaj 9175142881, • **Ahmednagar Savedi Naka** Chhatrapati Bajaj 8087203861 • **Kopargaon** Shirode Bajaj 9921009952, • **Rahuri** Shirode Bajaj 9921009953 • **Shrirampur** Shirode Bajaj 9270468998 • **Sangamner** MALPANI BAJAJ 9850112036, 02425-2225031.

# थोडक्यात...

## श्रीराम नवमी निमित्त सनातनचे ग्रंथ प्रदर्शन

**छत्रपती संभाजीनगर–** महाशिवरात्रीनिमित्त सनातन संस्थेच्या वतीने प्रकाशित ग्रंथ व सात्त्विक वस्तूंचे प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. हे प्रदर्शन येथील श्रीराम मंदिर, किराडपुरा, श्री समर्थ राम मंदिर, समर्थ नगर, श्री काळाराम मंदिर, समर्थ नगर, श्रीराम मंदिर गुरुकृपा ज्वेलर्स च्या समोर उस्मानपुरा, श्री राम मंदिर, चेतक घोडा, उल्कानगरी येथे भरविण्यात आले आहे. या प्रदर्शनाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन सनातन संस्थेच्या वतीने करण्यात आले आहे.

## रामनवमीच्या निमित्ताने प्रभू श्रीरामांविषयी श्रद्धा व्यक्त

रामनवमीच्या निमित्ताने झी टीवी वरील विविध मालिकांतील कलाकारांनी प्रभू श्रीरामांविषयी आपली श्रद्धा व्यक्त केली. सोनाक्षी बत्रा, निहारिका चौक्सी, अभिषेक शर्मा, मानसी जोशी रॉय, मोहक मटकर, भरत अहलावत आणि इंदिरा कृष्णा यांनी या सणाचे आध्यात्मिक महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी श्रीरामांच्या सत्यनिष्ठा, संयम, धैर्य आणि धर्मनिष्ठतेच्या मूल्यांचा आपल्या जीवनावर झालेला सकारात्मक परिणाम सांगितला. अनेक कलाकार हा दिवस कुटुंबासोबत पूजा, रामायण वाचन आणि आत्मचिंतन करून साजरा करतात. रामनवमी हा केवळ सण नसून योग्य मार्ग निवडण्याची प्रेरणा देणारा दिवस असल्याचे त्यांनी नमूद करत समाजात शांतता, प्रेम आणि सद्भावना वाढावी, अशी प्रार्थना व्यक्त केली.

## रोहिताश्व गौड यांचा सांगितला मनमोहन तिवारी भूमिकेबाबत अनुभव

**छत्रपती संभाजीनगर –** रोहिताश्व गौड यांनी मालिका 'भाबीजी घर पर है २.० मधील मनमोहन तिवारी भूमिकेबाबत अनुभव मांडले. गेल्या ११ वर्षांत ही भूमिका अधिक समृद्ध होत गेली असून तिच्यातील विरोधाभासच तिला खास बनवतात, असे त्यांनी सांगितले. काळानुसार विनोद सादरीकरणात सूक्ष्म बदल करत प्रेक्षकांचे मनोरंजन कायम ठेवले जात असल्याचे त्यांनी नमूद केले. शिल्पा शिंदेच्या पुनरागमनामुळे जुन्या आठवणी ताज्या झाल्या असून नव्या भागांमध्ये गोंधळ, गैरसमज आणि विनोदी प्रसंगांची मेजवानी मिळणार आहे. साधी, वास्तवाशी जोडलेली कथा आणि सततचा विनोद हेच मालिकेच्या लोकप्रियतेमागील प्रमुख घटक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.पहा रोहिताश्व गौड यांना मनमोहन तिवारीच्या भूमिकेत मालिका 'भाबीजी घर पर है २.०'मध्ये दर सोमवार ते शुक्रवार रात्री १०.३० वाजता फक्त एण्ड टीव्हीवर. तसेच सर्व एपिसोड्स कधीही पहा हिंदी झी५ वर!

## पंजाब एण्ड सिंध बँकेने नवीन शाखेचे उद्घाटन केले

नाशिक : बँकिंग सेवा अधिक व्यापक करण्याच्या आणि ग्राहकांना उत्कृष्ट सुविधा देण्याच्या आपल्या वचनबद्धतेला अधिक बळ देत पंजाब एण्ड सिंध बँकेने ने २० मार्च २०२६ रोजी नाशिकच्या गोविंद नगर येथे नवीन शाखेचे उद्घाटन केले.नवीन शाखेचा उद्देश वेगाने विकसित होत असलेल्या गोविंद नगर परिसरातील रहिवासी, व्यावसायिक आणि उद्योजकांना सुलभ व सर्वसमावेशक बँकिंग सेवा प्रदान करणे हा आहे. आधुनिक बँकिंग पायाभूत सुविधा आणि ग्राहक-केंद्रित सेवांच्या माध्यमातून ही शाखा व्यक्ती, एमएसएमई आणि स्थानिक उद्योगांच्या आर्थिक गरजा पूर्ण करेल तसेच वित्तीय समावेशन उपक्रमांना चालना देईल.

## भारतमाता सिनेमा पुन्हा सुरू

मुंबई: परळमध्ये असलेले, मुंबईतील एक जुने आणि लोकप्रिय सिंगल-स्क्रीन थिएटर भारतमाता सिनेमा मंगळवार, २४ मार्च २०२६ रोजी पुन्हा प्रेक्षकांसाठी खुले झाले आहे. आता येथे पारंपरिक सिनेमा अनुभवासोबत आधुनिक तंत्रज्ञान आणि सुधारित सुविधा मिळणार आहेत।पिढ्यान् पिढ्या प्रेक्षकांच्या आठवणींमध्ये असलेले हे थिएटर आता नव्या रूपात तयार करण्यात आले आहे. त्याचे नूतनीकरण करताना त्याची जुनी ओळख आणि स्थानिक लोकांशी असलेला भावनिक संबंध कायम ठेवण्यात आला आहे. हा सिनेमा वन सिनेमाजने, मुक्ता -२ सिनेमाजच्या सहकार्याने पुन्हा सुरू केला आहे, जेणेकरून आजच्या प्रेक्षकांनाही सिंगल-स्क्रीनचा अनुभव घेता येईल।

# हेच आमचे लासूर स्टेशन धर्मापेक्षा माणुसकीच मोठी!

## लासूर स्टेशन येथे ऑटो पार्ट्स दुकानास आग; मुस्लिम बांधवांची मदतीसाठी धाव, भगवान शंकराची मूर्ती सुरक्षित बाहेर, व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल


**तभा वृत्तसेवा/तुषार सराफ**

**लासूर स्टेशन, दि. २५ मार्च :** धर्म सोडून सर्वप्रथम माणुसकीचे कर्तव्य पार पाडणारे असे जिवंत उदाहरण लासूर स्टेशन येथे बुधवारी, दिनांक २५ मार्च रोजी पहाटेच्या सुमारास पाहायला मिळाले. येथील मुख्य रस्त्यावर असलेल्या पूजा ऑटो पार्ट्स दुकानाला शॉर्टसर्किटमुळे अचानक आग लागली.




परिसरात नमाज पठणासाठी आलेल्या मुस्लिम बांधवांनी लागलेली आग पाहताच तात्काळ मदतीसाठी धाव घेतली. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील इतर सतर्क नागरिकांनीही क्षणाचाही विलंब न करता मदतीचा हात पुढे केला. काहींनी त्वरित आग विझविण्याचे प्रयत्न सुरू केले, तर काहींनी दुकानातील वाचवता येईल असा माल सुरक्षितपणे बाहेर काढण्यासाठी अथक प्रयत्न केले.

या घटनेतील एक विशेष बाब म्हणजे, दुकानात असलेली भगवान शंकराची मूर्ती मुस्लिम बांधवांनी अत्यंत काळजीपूर्वक व सुरक्षितपणे बाहेर काढली. या कृतीतून धर्मापेक्षा माणुसकीला प्राधान्य देणारी भावना अधोरेखित झाली.



मुस्लिम बांधवांनी भगवान शंकरांची मूर्ती बाहेर काढतानाचा व्हिडिओ परिसरात सोशल मीडियावर वाऱ्यासारखा व्हायरल झाला. या घटनेतून परिसरात एक सकारात्मक संदेश पसरला असून, गावातील एकात्मता आणि बंधुत्वाची भावना अधिक दृढ झाल्याचे दिसून आले.

या आगीत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी, लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, या घटनेतून माणुसकीचे जिवंत उदाहरण पाहायला मिळाले असून, नागरिकांच्या तत्परतेमुळे मोठा अनर्थ टळला.

## एमजीएमच्या प्रा.माधुरी भास्करराव कावरखे यांना पीएच.डी. प्रदान

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि. २५ मार्च :**महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या फॅक्ल्टी ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संगणक शास्त्र आणि अभियांत्रिकीच्या संशोधक प्रा.माधुरी भास्करराव कावरखे यांना पीएच.डी. प्रदान करण्यात आली आहे. त्यांनी स्कूल ऑफ इंजिनियरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या संचालिका डॉ. परमिंदर कौर यांच्या मार्गदर्शनात 'प्रेडिक्शन ऑफ डायबेटिक सिम्प्टम्स यूजिंग वेअरेबल डिव्हायसेस अँड एआय' या विषयावर आपला शोधप्रबंध सादर केला होता.



या यशाबद्दल प्रा.माधुरी कावरखे यांचे विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू प्रा.डॉ.विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ. हरिरंग शिंदे, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, संचालिका डॉ.शर्वरी तामणे, महेश काकडे आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## पहाटे जनावर चोरी; सायंकाळी मालेगावातून गाय व इनोव्हा जप्त



**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि. २५ मार्च :** शहरातील पांढरी मोहल्ला परिसरात पहाटेच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी जनावरे चोरी केल्याची घटना घडली. या प्रकरणी दि. २० मार्च रोजी दुपारी गुन्हा दाखल होताच पोलिसांचे पथक मालेगावच्या दिशेने रवाना झाले. सायंकाळी ८ वाजेच्या सुमारास पोलिसांनी मालेगाव येथे धाड टाकत चोरीस गेलेली टॅग केलेली गाय व सिल्व्हर रंगाची इनोव्हा कार जप्त केली.

याबाबत सादिक रज्जाक शेख (वय ३२, रा. पांढरी मोहल्ला, कन्नड) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, दि. २० रोजी पहाटे ३ वाजेच्या सुमारास जनावरांचा आवाज आल्याने बाहेर येऊन पाहिले असता, एक सिल्व्हर रंगाच्या चारचाकी वाहनातून जनावरे घेऊन जात असल्याचे दिसून आले. संबंधित वाहन चाळीसगाव-मालेगावच्या दिशेने निघून गेले.

या घटनेनंतर परिसरातील शेख फयास शेख इस्माईल व अन्वर चाँद शेख यांच्या जनावरांचीही चोरी झाल्याचे उघड झाले.

पोलिसांनी गुप्त माहितीच्या आधारे मालेगावातील गुलाब पार्क परिसरात कारवाई करत आरोपीच्या घरासमोर टॅग केलेली भुरक्या रंगाची गाय तसेच एम.एच.१५ बी.एक्स. ३५०३ क्रमांकाची इनोव्हा कार (किंमत सुमारे ८ लाख रुपये) जप्त केली.

या प्रकरणी मोईन अख्तर कुरेशी (वय २६, रा. गुलाब पार्क, मालेगाव) व यासीन खान इस्माईल खान (वय २४, रा. नागछाप झोपडपट्टी, मालेगाव) यांना अटक करण्यात आली आहे.आरोपींना दि.२५ रोजी कन्नड न्यायालयासमोर हजर केले असता न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे


जा.क्र.मुनपा/का.वि./वा.द.निविदा २०२५-२६/
कार्यालय नगरपरिषद मुदखेड जि. नांदेड
दिनांक / /२०२६

### कार्यालय नगरपरिषद मुदखेड जि.नांदेड
### निविदा सुचना

मुदखेड नगरपरिषद मुदखेड खालील नमुद केलेल्या कामांसाठी सन २०२६-२७ करीता वार्षिक दर करार करण्यासाठी दिनांक ०४.०४.२०२६ रोजी दुपारी ०२.०० वाजे पावेतो रोख अनामत रक्कमेसह सिलबंद निविदा मागवत आहे.

| अ.क्र. | कामाचा तपशील | निविदा प्रपत्राची किंमत | निविदा सोबत भरावयाची अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कलावधी |
|---|---|---|---|---|
| | **संगणक विभाग** | | | |
| १ | कार्यालयासाठी कलर व लेजर प्रिंटर साहित्य व संगणक अनुषंगीक साहित्य पुरवठा करणे. | २०० | २०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| २ | न.प. च्या विविध कार्यक्रमाचे फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग करणे बाबत. | १०० | २०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ३ | नगरपरिषद कार्यालयासाठी झेरॉक्स पुरवठा करणे. | १०० | २०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ४ | नगरपरिषद कार्यालयाती प्रिंटर कार्टेज रिफीलिंग करणे, प्रिंटर दुरुस्ती करणे व आवश्यकते नुसार संगणकीय साहित्य पुरवठा करणे बाबत | १०० | २०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **विद्युत विभाग** | | | |
| १ | शहरातील दिवाबत्ती साठी विद्युत साहित्य पुरवठा करणे व विद्युत विभागाची अनुषंगीक कामे करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **पाणी पुरवठा विभाग** | | | |
| १ | पाणीपुरवठा विभागासाठी वॉल, पाईप, स्टार्टर, व दुरुस्तीसाठी लागणारे इतर विविध किरकोळ साहित्य पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| २ | शहरातील विविध बोअरमध्ये, गाळात फसलेल्या विद्युत मोटार काढणे | २०० | ५०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ३ | १००,९०,४०,२५,२०,१२,१०,७ व ५ एच. पी. इत्यादी सबमर्सीबल मोटारी दुरुस्ती करणे व नविन विद्युत मोटारी स्थापीत करणे व नादुरुस्त मोटारी बाहेर काढणे बाबत. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ४ | ब्लिचिंग पावडर आय.एस.आय. ग्रेड-१३२ ते % क्लोरीन युक्त २५ कि. पॉलिथीन बॅगमध्ये पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ५ | पाणीपुरवठा विभागासाठी तुरटी फेरिक ऍलम ग्रेड-१ (A-203) १६ ते १८% पुरविणे | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **राष्ट्रीय कार्यक्रम विभाग** | | | |
| १ | विविध राष्ट्रीय कार्यक्रम, भुमीपुजन कार्यक्रम, कार्यालयीन कार्यक्रम व इतर कार्यक्रमासाठी टेन्ट, बिछायत साहित्य, शामीयाने, लाऊस्पीकर, व इतर अनुषंगीक साहित्य पुरवठा करणे. | २०० | ५०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| २ | चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना गणवेशासाठी कापड पुरवठा करणे व शिलाई करून पुरवठा करणे. | २०० | ५०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **बांधकाम विभाग** | | | |
| १ | न.प. अंतर्गत रस्ता दुरुस्तीसाठी कठीण मुरुम, सिलकोट, ६एमएम, ६० एमएम मेटल, ४० एमएम मेटल, पुरविणे व पसरविणे (रॉयल्टीसह) | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| २ | न.प. अंतर्गत रस्ते, नाल्या, पुल, पाईप लाईन RCC & PVC, इ. बांधकाम / दुरुस्ती करणे, न.प. समाज मंदिर दुरुस्ती करणे रंगरंगोटी करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ३ | विविध कामासाठी जे.सी.बी. / पोकलेन मशिन, ट्रॅक्टर ट्रॅलीसह पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **लेखा विभाग** | | | |
| १ | लेखा संहिता २०११ नुसार विविध नमुने छपाई करणे व पुरवठा करणे व कार्यालयीन स्टेशनरी साहित्य पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| २ | आयकर व जि.एस.टी. फाईल करणेसाठी सि.ए. ची नियुक्ती करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| ३ | लेखा विभागांतर्गत व्दिनोंद लेखे अद्ययावत करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **अग्निशम विभाग/आपतकालीन विभाग** | | | |
| १ | अग्निशमन आपतकालीन साहित्य पुरवठा करणे. | २०० | १००० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |
| | **आस्थापना विभाग** | | | |
| १ | नगरपरिषद कार्यालया अंतर्गत संगणक डेटा एंट्री ऑपरेटर पुरविणे | २०० | १०० | ३१ मार्च २०२७ पर्यंत |

**सुचना / अटी:** १. कोरी निविदा प्रपत्रे दिनांक २७.०३.२०२६ ते दिनांक ०४.०४.२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत रोखपाल यांचेकडून रोख किम्मत भरल्यानंतर मिळतील. २) सिलबंद निविदा दिनांक ०४.०४.२०२६ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत रोखअनामत रक्कमेसह रोखपाल न.प. मुदखेड यांच्याकडे स्विकारल्या जातील. ३) लिफाफा नं. ०१ मध्ये आयकर /विक्रीकर प्रमाणपत्र, रजिस्ट्रेशन, अधिकृत विक्रेता / पुरवठादार असल्याचे प्रमाणपत्र, अनुभवासंबधीत कागदपत्रे सादर करावे लागतील तसेच लिफाफा नं. ०२ मध्ये मुख्य वित्तीय बोलिची निविदा सादर करावी लागेल. ४) प्राप्त निविदा शक्यतो दि ०७.०४.२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजता उपस्थित निविदा धारका समक्ष उघडण्यात येतील. ५) निविदा मंजुर झाल्यानंतर १००/- रुपयांच्या कोर्ट फी स्टॅम्पपेपरवर करारनामा करून द्यावा लागेल. ६) कोणतीही अटीबध्द निविदा स्विकारली जाणार नाही. ७) विद्युत विभागा अंतर्गत स्थानिक पातळीवरील शहरातील प्रत्येक भागातील माहिती असणे, व नगरपरिषद अंतर्गत विद्युत कामे केली असलेल्यांनाच प्राधान्य देण्यात येईल (०८) डेटा एंट्री ऑपरेटर करीता नगरपरिषदे अंतर्गत किमान पाच वर्षे किंवा अधिक काम केल्याचा अनुभव असणे आवश्यक आहे नगरपरिषदेतील अनुभव नसल्यास निविदा विचारात घेतली जाणार नाही. ०९) नियमानुसार देय असलेल्या शासकीय कर, सुरक्षा ठेव कपात करण्यात येईल ८) कोणतीही किंवा सर्व निविदा कोणत्याही कारणाशिवाय नाकारण्याचा अधिकार नगर पालिकेने राखुन ठेवला आहे.

स्वाक्षरित/-
**मुख्याधिकारी**
**नगर परिषद मुदखेड जि. नांदेड**



### जाहीर प्रगटण

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ११०/२०२६
अर्जदार:-
१. भीमाबाई त्रिंबक बोचरे, वय. ५७ वर्ष धंदा. शेती रा. कासोडा, ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर २. सरस्वती मधुकर ढोले, वय: ५४ वर्ष धंदा. शेती रा. बकवालनगर, नायगांव ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर ३. रुखमन संजय ढोले, वय. ४३ वर्ष धंदा. शेती रा. बकवालनगर, नायगांव ता. गंगापूर जि.छ.संभाजीनगर
- विरूद्ध:-
गैरअर्जदार -निरंक
प्रकरण :- कलम २ बॉम्बे रेगुलेशन क्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत
ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन क्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ३ यांची आई नामे जनाबाई भाऊसाहेब जाधव हे दि. ०३/११/२०२५ रोजी मौजे आसेगांव ता. गंगापूर येथे मयत झाली आहे. तसेच अर्जदार यांचे वडिल व मयत जनाबाई भाऊसाहेब जाधव यांचे पति नामे भाऊसाहेब शंकर जाधव अर्जदार हे देखील पूर्वीच दिनांक १५/०१/२०२३ रोजी मौजे आसेगांव ता. गंगापूर येथे मयत झाले आहेत. त्यामूळे अर्जदार हेच मयत जनाबाई भाऊसाहेब जाधव यांचे कायदेशीर वारस असून, अर्जदार यांच्या व्यतिरीक्त इतर दुसरे कोणीही वारस नाही. मयत जनाबाई भाऊसाहेब जाधव यांचे वारस प्रमाणपत्राची शासकीय योजनांचा लाभ मिळविण्याकामी व इतर शासकीय कामासाठी आवश्यक्ता आहे.
त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत जनाबाई भाऊसाहेब जाधव यांचे अर्जदार यांना वारस प्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुदतीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत जनाबाई भाऊसाहेब जाधव यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्दती नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.
**कनिष्ठ लिपिक.** **आदेशावरून**
**सहायक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर**

### जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस

**मा. श्री. ए. ए. कळमकर, ३ रे सह. दिवाणी न्यायाधिश, (क. स्तर) न्यायालय गंगापूर**

सिव्हील एम.ए. क्र. १८९/२०२६
अर्जदार १) सुमन भ्र. भिका मगर वय ६३ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. देवळी, पो. शिल्लेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद २) शोभाबाई भ्र. अंबादास घोरात वय ५२ वर्षे, धंदा घरकाम रा. मु. पोस्ट पिंपळगांव (दिवशी), ता. गंगापूर जि. औरंगाबाद ३) भिमा भिका मगर वय ४८ वर्षे, धंदा मजूरी रा. मु. देवळी, पो. शिल्लेगांव, ता. गंगापूर जि. औरंगाबाद ४) करूनाबाई भ्र. राजेंद्र वाहूळ वय ४९ वर्षे, धंदा घरकाम रा. घर क्रं.१३१७० , मंगेश किराणा जवळ, हर्ष नगर, औरंगाबाद, ता. जि. औरंगाबाद ५) मनीषा भ्र. राजू रोकडे वय ३७ वर्षे, धंदा घरकाम रा. फुलशेवरा, गवळी शिवरा, ता. गंगापूर जि. औरंगाबाद
// विरूध्द //
गैरअर्जदार:- निरंक
प्रकरण:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट VIII 1827 अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट मिळणेबाबत.
सर्व जनतेस येते उपरोक्त अर्जदारांनी या न्यायालात ॲड. आसिफ आय. शहा रा. लासूर स्टेशन, ता. गंगापूर जि. औरंगाबाद यांच्या मार्फत बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट तखखख १८२७ अन्वये लिगल हेअरशिप सर्टिफिकेट / वारस प्रमाणपत्र मिळणेकामी अर्ज सादर केला आहे की, अर्जदार क्र. १ ते ५ हे वरील नमुद ठिकाणचे कायमस्वरूपी राहणारे असून अर्जदार क्रं. १ ही अर्जदार क्रं. २ ते ५ यांची आई आहे. अर्जदार क्रं. २ ते ५ हे आपसात सख्खे भाऊ, विवाहीत बहिणी आहे. अर्जदार क्रे. १ हिचे पती व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे वडील नामे भीका सोमा मगर हे दिनांक २१/०७/२०१२ रोजी मौजे देवळी, ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथे मयत झालेले आहे. तसेच अर्जदार क्रं. १ चे सासू सासरे व अर्जदार क्रं. २ ते ५ यांचे आजी आजोबा नामे अंजनाबाई सोमा मगर व सोमा गंगाधर मगर बऱ्याच वर्षापुर्वी मयत झालेले असल्यामुळे त्यांच्या मयताबाबतचा कोणताही कागदोपत्री पुरावा अर्जदारांकडे उपलब्ध नाही. मयत भीका सोमा मगर यांना अर्जदार क्रं. १ ही पत्नी व अर्जदार क्र. २, ४ व ५ ह्या मुली आणि अर्जदार क्रं. ३ मुलगा या नात्याने कायदेशीर वारसदार असून मयतास अर्जदार क्र. १ ते ५ यांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत भीका सोमा मगर यांच्या मृत्युमुळे अर्जदारांना शासकिय, निमशासकिय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याने अर्जदारांनी सदरचा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला असून वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. सबब सदर प्रकरणी कोणाचाही कोणत्याही प्रकारचा आक्षेप किंवा उजर असल्यास त्यांनी प्रस्तुत जाहीर प्रगटन प्रसिद झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात नोंदवावा. त्यानंतर आलेल्या उजर, आक्षेपाचा विचार केला जाणार नाही व अर्जदारांच्या मागणीप्रमाणे त्यांच्या हक्कात वारस प्रमाणपत्र देण्यात येईल, करीता हे जाहीर प्रगटन. आज दिनांक २५/०३/२०२६ रोजी माझ्या सहिने व या न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.
प्रकरणात पुढील तारीख ०७/०५/२०२६
**लिपीक.** **आदेशावरून**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर गंगापूर**

### जाहीर प्रगटण/सायटेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर न्यायालय गंगापुर ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**

**सिव्हिल एम.ए. क्र.१७०/२०२६**
**अर्जदार:- इंदु सुमन मुसवाद, वय ५४ वर्षे धंदा घरकाम रा. रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर**
**विरुध्द**
**गैरअर्जदार :-निरंक**
**प्रकरण :-बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

उपरोक्त विषयी सर्व जनतेस कळविण्यात येते की, या न्यायालयात अर्जदार यांनी त्यांचे विधिज्ञ ॲड. श्री. अमोल पी. ठाकुर यांच्या मार्फत अर्ज सादर केला आहे की, अर्जदार ही तिचे नमुद पत्यावर राहणारी असुन अर्जदाराची आई नामे सुमन बन्सी मुसवाद या मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर येथील राहणाऱ्या होत्या, त्या दिनांक ०७/०२/२०२६ रोजी मौजे रांजणगाव शेणपुंजी ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर येथे मयत झालेल्या आहे. मयत सुमन बन्सी मुसवाद यांना अर्जदार हिच एकमेव कायदेशीर वारसदार असुन अर्जदाराच्या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नसल्याचे नमुद करुन शासकीय-निमशासकीय व इतर कार्यालयीन कामासाठी वारसप्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, अर्जदारांच्या प्रस्तुत अर्जातील मागणीस कोणाचा काही आक्षेप-उजर असेल तर संबंधीतांनी त्यांचा असलेला आक्षेप-उजर या न्यायालयात व्यक्तीशः अथवा विधीज्ञामार्फत हे प्रगटन प्रसिध्द झाले तारखेपासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा मुद्द्तीनंतरचा आक्षेप उजर लक्षात घेतला जाणार नाही व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी मागणी केले प्रमाणे वारस प्रमाणपत्र जारी करील. करीता हे प्रगटन माझे सही व शिक्क्यानी आज दिनांक २३/०३/२०२६ रोजी दिले, प्रकरणात पुढील तारीख दिनांक २३/०५/२०२६ रोजीची ठेवण्यात आलेली आहे.
**वरीष्ठ / कनिष्ठ लिपीक.**
**सहाय्यक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

CMYK

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेजतर्फे स्वसंरक्षण प्रशिक्षण संपन्न

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च :** चन्नबसवेश्वर फार्मसी कॉलेज (डि-ग्री), लातूर यांच्यातर्फे पी. एम. श्री. सावित्रीबाई फुले म. न. पा. शाळा क्र. ९, लातूर येथे ''हर घर दुर्गा'' या स्वसंरक्षण जनजागृती व प्रशिक्षण कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांमध्ये विशेषतः मुलींमध्ये, वैयक्तिक सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करणे आणि त्यांना मूलभूत स्वसंरक्षण कौशल्ये देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश होता.

सदर शिबिरामध्ये प्रशिक्षित मार्गदर्शक मास्टर धनश्री मदने हिने स्वसंरक्षणाचे प्रात्यक्षिक दाखवून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवून विविध तंत्रे आत्मसात केली. हा कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांच्या सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरला. शाळा प्रशासनानेही या उपक्रमासाठी सहकार्य केले. सदर कार्यक्रमास शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. पी. शिंदे, प्रा. महेश मानके, डॉ. ऐश्वर्या इर्लापल्ले, शाळेचे सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

या उल्लेखनीय उपक्रमाबद्दल संस्थेचे सचिव श्री. भीमाशंकर देवणीकर, विश्वस्त श्री. विजयकुमार मठपती, श्री. अरुण हालकुडे, प्राचार्य डॉ. विजयेंद्र स्वामी, डॉ. अविनाश टेकाडे, डॉ. ओमप्रकाश भुसनुरे, डॉ. अनंत देशपांडे, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे कौतुक करून या उपक्रमाचे मनापासून स्वागत केले.



## विविध वृत्त...

### चटकदार पदार्थांनी गजबजली 'आनंदनगरी'; हजारोंची उलाढाल

**लातूर:** दयानंद वाणिज्य महाविद्यालयात उत्कर्ष २०२६ वार्षिक स्नेहसंमेलनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या ''आनंदनगरी'' या उपक्रमाला विद्यार्थ्यांचा आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध खाद्यपदार्थांच्या स्टॉल्समुळे परिसरात चविष्ट आणि उत्साहपूर्ण वातावरण निर्माण झाले असून, या माध्यमातून विद्यार्थ्यांनी हजारो रुपयांची उलाढाल करत व्यवहारज्ञानाची प्रात्यक्षिक शिकवण घेतली. हा उपक्रम सोमवारी मोठ्या उत्साहात महाविद्यालय परिसरात पार पडला.

या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांनी पाणीपुरी, पावभाजी, दहीधपाटे, दहीवडा, आईसगोळा, मठ्ठा, शरबत, बासुंदी, कुल्फी यांसारख्या विविध खाद्यपदार्थांचे स्टॉल उभारले होते. आकर्षक सादरीकरण, ग्राहकांशी संवाद आणि विक्री कौशल्य यामुळे प्रत्येक स्टॉलवर मोठी गर्दी पाहायला मिळाली. या उपक्रमाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांच्या उपक्रमशीलतेचे कौतुक करत, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान आणि आत्मविश्वास मिळतो, असे मत व्यक्त केले.

यावेळी प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर यांच्यासह उपप्राचार्य तथा विद्यार्थी परिषदेचे प्रमुख डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनीषा आष्टेकर, बीसीए विभागप्रमुख डॉ. शशिकांत स्वामी, बीबीए विभागप्रमुख डॉ. वैशाली सातपुते, प्रा. ऋतुजा देशमुख, डॉ. सुभाष मोरे तसेच ''आनंदनगरी''चे प्रमुख डॉ. विशाल वर्मा यांची उपस्थिती होती. उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी प्रा. विशाल वर्मा, डॉ. प्रिया वर्मा, प्रा. निकिता अग्रवाल, प्रा.अक्षय राजूरवार, प्रा.सोनाली सास्तुरकर, प्रा. रेणुका महाळंगीकर यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### लातूर शहर महानगरपालिका विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांचा सत्कार



**लातूर:** लातूर शहर महानगरपालिका, लातूरच्या विरोधी पक्षनेते देविदास काळे यांची नियुक्ती करण्यात आली आणि आज त्यांचा पदभार समारंभ पार पडला त्यानिमित्ताने त्यांचा अजिंक्य सिटी येथील कार्यालयात आज शाल आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी पोलीस इन्स्पेक्टर तथा वाकेथॉन विजेते पी.जी. लवटे, माजी शिक्षक बाबुराव बोबडे, प्रा.विश्र्वनाथ बोंडगे पाटील, पेन्शनर्स संघटनेचे जिल्हा सचिव माजी मुख्याध्यापक के.एस.मानकर, ज्येष्ठ नागरिक शिवाजी खसे, प्रबोधनकार प्रा.डी.डी.सूर्यवंशी, प्रा.डॉ. संजय गवई, सेवानिवृत्त प्राध्यापक मधुकरराव होनमाळे यांची उपस्थिती होती.

यावेळी लातूर शहर महानगरपालिका वार्ड क्र.०१मध्ये त्यांनी केलेल्या कार्याची माहिती सुद्धा देण्यात आली तसेच उर्वरित विकास कामे लवकरच पूर्ण केली जातील असे आश्र्वासन त्यांनी या प्रसंगी दिले.

यावेळी उपस्थित सर्वांनी मा.श्री.देविदास काळे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यांनीही सर्वांचे आभार व्यक्त केले.

### लातूर ग्रामीण मधील काँग्रेस पदाधिकारी यांच्या निवडी जाहीर

**लातूर :** काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बळकटीसाठी तसेच स्थानिक पातळीवर पक्षकार्य अधिक प्रभावी करण्याच्या दृष्टीने विविध पदांवर काँग्रेस पक्षाच्या वतीने माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या सुचनेनुसार नव्या नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या आहेत.नुतन पदाधिकारी यांना काँग्रेस भवन येथे नियुक्ती पत्राचे वाटप करण्यात आले.

यामध्ये रेणापुर शहर काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी श्री. नितीन अनुरथ मोटेगावकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या सामाजिक व राजकीय कार्याचा विचार करून ही जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तसेच रेणापुर शहर युवक काँग्रेसच्या अध्यक्षपदी श्री. रोहित गोविंद गिरी यांची निवड करण्यात आली असून, युवकांना पक्षाशी जोडण्याबरोबरच युवकांच्या प्रश्नांवर प्रभावीपणे काम करण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपविण्यात आली आहे.

याचबरोबर मुरुड बु. शहर महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी सौ. सारिकाताई निलेश फेरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महिला सक्षमीकरण, महिलांचे प्रश्न आणि त्यांच्या हक्कांसाठी लढा देण्याच्या उद्देशाने ही निवड करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

# देविदास काळेंनी घेतला विरोधी पक्ष नेत्याचा पदभार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च :**

लातूर/प्रतिनिधी : भारतीय जनता पक्षाने लातूर शहर महानगरपालिकेच्या विरोधी पक्ष नेतेपदी देविदास काळे यांची नियुक्ती केल्यानंतर आज त्यांचा पदभार समारंभ भव्य रूपाने पार पडला. भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व भाजपा लातूर शहर अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा समारंभ संपन्न झाला. या पदभार समारंभ प्रसंगी प्रशासनाच्या वतीने आयुक्त मानसी मीना यांनी देविदास काळे यांचा सत्कार केला व त्यांना शुभेच्छा दिल्या. विरोधी पक्षनेते देविदास काळे यांनीही डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर आणि आयुक्त मानसी मीना यांचा सत्कार केला.



विरोधी पक्षनेते देविदास काळे यांच्या सत्कार समारंभ प्रसंगी बोलताना भाजपा शहर अध्यक्ष अजित पाटील कव्हेकर म्हणाले, आज अतिशय महत्त्वाचा दिवस आहे. भाजपा पक्ष लोककल्याणासाठी केंद्रबिंदू म्हणून काम करते. मनपात आज लोककल्याणकारी कार्यालयाची सुरुवात झाली असून, या कार्यालयात सर्वसामान्य कार्यकर्त्यांची कामे होणार आहेत. त्यामुळे या विरोधी पक्ष नेते दालनाला 'कार्यकर्ता मंदिर' म्हणून पाहिले पाहिजे. या कार्यकर्ता मंदिरातून प्रत्येक कार्यकर्त्यांना न्याय मिळेल आणि लातूरकरांनाही न्याय मिळवून देण्याचे काम इथून होणार आहे.

ते पुढे म्हणाले, सत्ताधाऱ्यांवर अंकुश ठेवण्याचे काम विरोधी पक्ष नेते देविदास काळे यांच्या माध्यमातून होणार आहे. भाजपचे प्रत्येक कार्यकर्ते या कार्यालयात भेट देऊन आपल्या प्रभागातील प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न करावेत. आयुक्त मानसी मीना यांना उद्देशून त्यांनी विनंती केली की, भाजपा कार्यकर्ते आणि नगरसेवकांच्या कामांना प्राधान्य द्यावे, तसेच त्यांना न्यायिक भूमिका देण्याचे काम आपल्या माध्यमातून व्हावे कारण प्रशासनातील काही अधिकारी सत्ताधाऱ्यांच्या सांगण्यावरून काम करत असल्याचे निदर्शनास आले आहे. या प्रसंगी विरोधी पक्षनेत्यांना पुढील कामासाठी शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर बोलताना भाजपा प्रदेश उपाध्यक्षा डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी आपल्या भाषणात सांगितले, आज महत्त्वाचा दिवस आहे. देविदास काळे यांच्या माध्यमातून लोककल्याणकारी कामे होतील. सत्ताधाऱ्यांची संख्या जास्त असली तरी त्यांच्यापेक्षा अधिक प्रभावी काम करून आपण लातूरकरांचे मन जिंकावे. विरोधी पक्षाचे दालन सर्वांसाठी खुले आहे आणि येथे २४ द ७ तास काम केले जाईल. त्यांनी हरलेल्या उमेदवारांना संबोधित करताना म्हटले, जे मनपा निवडणुकीत हारले त्यांना मी 'हार-ले' म्हणणार नाही, तर 'लढले' असे म्हणेन. त्यांनीही आपल्या प्रभागातील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी विरोधी पक्ष नेत्याशी संपर्क साधा-वा. आपल्या कामातून सत्ताधाऱ्यांची मक्तेदारी तोडावी.

ते पुढे म्हणाल्या, राज्यात आणि केंद्रात भाजपाचे सरकार असल्याने शहराच्या विकासासाठी जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न केला जाईल. सत्ताधाऱ्यांची कामे शहराच्या विकासाला खीळ घालणारी आहेत, हे जिल्हा नियोजन समितीच्या कामांना स्थगिती देऊन दाखवले आहे. येणाऱ्या काळात सत्ताधाऱ्यांना सळो की पळो करावे ला-गेल. कार्यकर्त्यांना संबोधित करताना त्यांनी विश्र्वास दिला की, प्रभागातील प्रश्न सोडवण्यासाठी अग्रेसर राहा, अडचण आली तर आम्ही तुमच्यासोबत आहोत.

देविदास काळे यांचे आक्रमक आश्वासन

पदभार स्वीकारताना आणि सत्काराला उत्तर देताना देविदास काळे म्हणाले, येणाऱ्या काळात सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर लातूरकरांच्या प्रश्नांसाठी भाजपा आक्रमकपणे काम करणार आहे. साडेतीन वर्षांच्या प्रशासकीय काळातून प्रशासन बाहेर आले नाही, त्यांनाही जाब विचारला जाईल. पालिकेला आर्थिक शिस्त ला-वणे, कर्मचाऱ्यांच्या पगार वेळेवर होणे याकडे लक्ष दिले जाईल.

ते पुढे म्हणाले, लातूरकरांनी आम्हाला विरोधात बसवले तरी सत्ताधाऱ्यांकडून योग्य काम करून घेण्याची भूमिका आमची राहणार आहे. मनपा कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य लातूरकरांना कोणतीही अडचण येणार नाही, यासाठी भाजपा अग्रेसर राहील. शहरातील कचरा, स्वच्छता, दिवाबत्ती, पाणीपुरवठा, ट्राफिक यासारख्या मूलभूत प्रश्नांवर जातीने लक्ष देऊन ते सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आह-ोत. विकास कामे वेळेत आणि दर्जेदार होण्यासाठी सत्ताधाऱ्यांना जाब विचारला जाईल.

देविदास काळे यांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, माजी पालकमंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेश कराड यांचे आभार मानले आणि पक्षाने दिलेल्या संधीचे सोने करण्याची ग्वाही दिली. पक्षातील सर्व सदस्यांना सोबत घेऊन काम केले जाईल, असेही त्यांनी सांगितले.

समारंभात उपस्थित राहिल्याबद्दल डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर व शहराध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांचे आभार मानले. या प्रसंगी भाजपाच्या अनेक नगरसेवकांनी कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी देविदास काळे यांना शुभेच्छा दिल्या. हा पदभार समारंभ भाजपासाठी नव्या उर्जेचा प्रारंभ मानला जात आहे. या पदभार समारंभास प्रविण कस्तुरे, उध्दव तेलंग, ऋषी राजे, भीमाशंकर बेंबळकर, ड. प्रदीप मोरे, करुणा शिंदे, स्वाती घोरपडे, राजश्री बाहेती, संजय गीर, पुनित पाटील यासह अनेक नगरसेवक व कार्यकर्ते उपस्थित होते.

## आज रामेश्वर येथे प्रभू श्रीराम जन्मसोहळा आणि श्रीराम रथ उत्सवाचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च :** भारतीय संस्कृती, परंपरा, तत्त्वज्ञान, त्याग आणि समर्पणाचे मूर्तीमंत प्रतीक, समस्त भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने सर्वधर्मसमभावाचे प्रतीक अस-लेले भारतीय संस्कृती दर्शन 'श्रीराम' रथ यात्रा उत्सव आणि ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचा कीर्तन सो-हळा लातूर तालुक्यातील मौजे रामेश्र्वर (रूई) येथे २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यास रामेश्र्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

पूर्णब्रह्मयोगिनी त्यागमूर्ती श्रीमती प्रयागअक्का दादाराव कराड यांनी मानवता तीर्थ मौजे रामेश्र्वर (रूई) येथील श्रीराम मंदिरास अर्पण केलेल्या सुंदर, रेखीव व वैशिष्ट्यपूर्ण अशा भारतीय संस्कृती दर्शन- श्रीराम रथाची २६ मार्च २०२६ गुरुवार रोजी सकाळी ८ वाजता संपूर्ण भारतीयांचे श्रध्दास्थान असलेल्या मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम जन्मसोहळ्याच्या निमित्ताने रामेश्र्वर गावात ग्रामप्रदक्षिणा रथयात्रा उत्सव आयोजित करण्यात आला असून या रथ यात्रेनंतर ह.भ.प. हरिहर महाराज दिवेगावकर यांचे कीर्तन होऊन महाप्रसादाचे वाटप करण्यात येणार आहे.

प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी प्रभू श्रीराम जयंती सोहळ्यानिमित्ताने श्री राम रथ उत्सवाची जय्यत तयारी करण्यात आली आहे. या रथयात्रेत वाजंत्रीसह विविध भजनी मंडळी, टाळकरी, असंख्य भाविक भक्त सहभागी होणार आहेत. रामेश्र्वर आणि पंचक्रोशीतील भाविक भक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन संयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे.

## 'जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६' करिता अर्ज सादर करण्याचे आवाहन- १० एप्रिलपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने शासन निर्णय १२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक, युवतींना व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. युवक, युवतीसाठी पुरस्काराचे स्वरुप गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये १० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये ५० हजार असे आहे. यासाठी जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० एप्रिल २०२६ अशी आहे. यासाठीचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावेत व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात क्रीडाधिकारी बाबासाहेब इंगोले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.


**जाहीर प्रगटन** दै. तरूण भारत

लातूर जिल्हा परिसरातील तमाम जनतेस या जाहिर प्रगटना द्वारे सुचीत करण्यात येते की, माझे पक्षकार **शंकर रामसिंह राजपुत, रा.हरंगुळ (बु.), ता.जि.लातूर** यांनी मला दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन व वकिल म्हणून अधिकृत केले वरुन सर्व जनतेस खालील प्रमाणे जाहीर प्रगटन देत आहे.

माझे पक्षकार यांना **गोविंद देवराव जाधव, रा.मुबारकपुर, ता.निलंगा जि.लातूर** यांनी खरेदीखत दस्त डे.बु.नं लतर - १ - ८७२१/२०१२, दि.०४/०७/२०१२ ईसवी अन्वये खरेदी मालकीचा व कब्जेवहिवाटीचा प्लॉट मौजे. मुरुड अकोला, ता.जि.लातूर येथील जमीन गट नंबर १२२ पैकीचा खुला प्लॉट याचा एन.ए झालेला एन.ए नंबर २०११/जेएमबी/लातूर/सीआर -२०२, दि.१३/०३/२०१२ ईसवी अन्वये मे.सबडिव्हीजनल ऑफिस, लातूर यांनी मंजूर केलेला याचा लेआऊट नंबर एलटीआर/एनए/जी/एस/स.नं.११८,११९,१२०,१२२/लातूर/एनआरएल -२८३, दि.०७/०३/२०१२ ईसवी अन्वये मे. नगर रचनाकार, लातूर यांनी मंजूर केलेल्या पैकीचा प्लॉट नंबर १२२ पुर्ण असून याची लांबी पुर्व - पश्चिम द.बा. १३.४१ मी. व उ.बा. १३.१३ मी. आणि रुंदी दक्षिण - उत्तर पु.बा. ९.५७ मी. व प.बा. ८.५० मी असून याचे एकूण क्षेत्रफळ ११९.८३ चौ.मी. (१२८९.३७ चौ.फुट) आहे. याची चतु: सीमा खालीलप्रमाणे :-

पुर्वेस - ६ मीटर रुंदीचा रस्ता, पश्चिमेस - सदर गटातील जमीन, दक्षिणेस - सदर गटातील जमीन, उत्तरेस - प्लॉट नंबर १२३.

येणे प्रमाणे वरील चतु:सीमेच्या आतील मिळकत विद्यमान मालकाकडुन **लेखी** करार करुन घेऊण,इस्सारापोटी काही रक्कम माझे पक्षकाराकडुन स्विकारुन सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम असल्याची हमी माझे पक्षकारास दिली आहे. तरी सदर मिळकती बाबत जर कोणाचा उजर,आक्षेप,हितसंबंध,हक्कसंबंध,कर्जबोजा,गहाणखत,बक्षीसपत्र,कोर्टडिग्री,मृत्युपत्र,तारण,लीज, शेजाऱ्याचा वाद,शासकिय अथवा निमशासकिय कर्ज, न्यायालयीन वाद असतील तर त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून **सात ( ०७ )** दिवसाच्या आत माझे खालील कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर / आक्षेप नोंदवावा मुदतीत जर कोणाचा उजर/आक्षेप नाही आल्यास सदरची मिळकत ही निर्विवाद व निर्जोखीम आहे असे गृहीत धरुन माझे पक्षकार सदर मिळकतीचे नोंदणीकृत खरेदीखत मूळ मालकाकडून आपल्या हक्कात करुन घेतील व त्यानंतर येणारे आक्षेप माझे पक्षकारावर बंधणकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी.

दिनांक — २४/०३/२०२६

तर्फे ॲड.अशोक ज्ञा.लोखंडे
नोटरी भारत सरकार.
शाहू चौक,लातूर
मो नं.९४२१९ ८६४९५

जाहीर प्रगटन देणार
**शंकर रामसिंह राजपुत**
**रा.हरंगुळ (बु.), ता.जि.लातूर**
मो. नं.९८९२७ ६१०२३


# महावितरणकडून वीजबिल वसुली मोहिम अधिक आक्रमक

## - २४९७ वीजग्राहकांचा वीजपुरवठा खंडीत - सहा दिवसात साडेदहा कोटी वसुलीचे आव्हान

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २५ मार्च :** जिल्ह्यातील लघूदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक व औद्योगिक वीजग्राहकांसह इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे थकीत ३६ कोटी ३० लाख व चालू महिन्याचे ५८ कोटी १६ लाख अशा एकत्रीत ९४ कोटी ४६ लाख रुपयांच्या वीजबिल वसुलीसाठी महावितरणने वस-ुली मोहीम मार्च अखेरीस अधिक आक्रमक केली आहे. थकबाकीदार वीजग्राहक रडारवर असून वारंवार सुचना देवूनही दाद न देणाऱ्या ग्राहकांचा वीजपुरवठा थेट मीटर काढून खंडित करण्याची कारवाई करण्यात येत आहे. वीज खंडित केल्यानंतर कुणी पर-स्पर जोडल्यास महावितरणतर्फे थेट पोलिसांत गुन्हा दाखल करण्याचा इशारा देण्यात आला आहे. ग्राहकांनी चालू बिलासह थकबाकी भरून सहकार्य करावे आणि वीजपुरवठा खंडीत करण्याची कटू कारवाई टाळावी असे आवाहन महावितरणने केले आहे.

जिल्ह्यात घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर वर्गवारीतील वीज ग्राहकांकडे आज रोजी ९४ कोटी ४६ लाख रुपयांची वीजबिल थकबाकी आहे. वसुलीसाठी संपूर्ण जिल्ह्यात महावितरणचे सर्व अभियंते, अधिकारी, कर्मचारी भर उन्हात दारोदार फीरत आहेत. अनेक ग्राहक तातडीने बिल भरून सहकार्य करत आहेत. मात्र जे ग्राहक बिल भरण्यास प्रतिसाद देत नाहीत, त्यांचा वीजपुरवठा नाईलाजास्तव खंडित करण्यात येत आहे. काल पर्यंत २ हजार ४९७ वीजपुरवठा तात्पुरत्या स्वरूपात खंडीत करण्यात आला आहे. त्याचबरोबर स्मार्ट मीटर असलेल्या ग्राहकांचा वीजपुरवठा ऑटो डिस्कनेक्ट होत आहे. नॉन स्मार्ट मीटर असेल, तर ते थेट काढून आणले जात आहे. थकबाकी भरल्यावरच नवीन स्मार्ट मीटरने वीजपुरवठा जोडण्यात येत आहे. गेल्या चोवीस दिवसात लातूर मंडळातील थकबाकीदार ग्राहकांनी ४७ कोटी ७३ लाख रूपयांच्या बिलांचा भरणा केला आहे. हे प्रमाण चालू बिलाच्या केवळ ८२ टक्केच असून मागील थकबाकीला स्पर्शही झालेला नाही. यामधे निलंगा विभागाची मागील थकबाकी ४ कोटी ८५ लाख असून चालू महिन्याचे ९ कोटी ४८ लाख वसुल करावयाचे आहेत. यापैकी केवळ ८ कोटी २७ लाख वसूल झाले आहेत. तर उदगीर विभागातील ग्राहकांकडे १७ कोटी २३ लाख थकबाकी असून चालू महिन्याचे १५ कोटी ९० लाख वसूल करण्याचे आव्हान आहे. काल पर्यंत यापैकी केवळ १३ कोटी २८ लाख वसूल करण्यात यश मिळाले आहे. त्याचबरोबर लातूर विभागातील ग्राहकांकडे १४ कोटी २१ लाख थकबाकी असून चालू महिन्याचे




३२ कोटी ७८ लाख वसूल करण्याचे आव्हान आहे. काल पर्यंत यापैकी केवळ २६ कोटी १८ लाख वसूल करण्यात आले आहेत. वीजबील वसुलीसाठी विभागीय कर्मचाऱ्यांसोबतच लातूर परिमंडल कार्यालयाचे वरिष्ठ अधिकारीही थकबाकीदारांचे दार ठोठावत आहेत. सुट्टीच्या दिवशीही ही मोहीम सुरू आहे. जिल्ह्यातील सर्व ग्राहकांनी थकबाकी व चालू वीजबिले भरून सहकार्य करावे व संभाव्य गैरसोय टाळावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

महावितरणच्या ला-तूर परिमंडलाचे मुख्य अभियंता अरविंद बुलबुले हे सातत्याने वसुलीवर लक्ष ठेवून आहेत. जास्त थकबाकी असलेल्या व वसुली कमी असलेल्या उपविभागाला प्रत्यक्ष भेट देऊन वसुलीचा आढावा घेत आहेत. यावेळी अधीक्षक अभियंता प्रशांत दाणी हे सुध्दा वारंवार बैठका घेवून व प्रत्यक्ष उपविभागीय क्षेत्रात वसुलीसाठी फीरत आहेत. निलंगा विभागाचे कार्यकारी अभियंता नागेश देशमूख, उदगीर विभागाचे कार्यकारी अभियंता रविंद्र महाव्दार तसेच लातूर विभागाचे कार्यकारी अभियंता अनिरूध्द घाटगे यांच्यासह तांत्रिक कर्मचारी, लेखा विभाग व मानव संसाधन विभागाचे अधिकारी कर्मचारी वसुलीसाठी फीरत आ-हेत. मार्च अखेरीस केवळ सहा दिवस राहिल्याने युद्धपातळीवर वसुलीचे काम करा, अशा सूचना मुख्य अभियंता अरविंद बुलबुले यांनी दिल्या आहेत.

वीजबील भरण्यासाठी विविध पर्याय उपलब्ध असून सर्व वीजग्राहकांनी तातडीने थकीत वीजबिल भरणे गरजेचे आहे. अन्यथा महावितरणला वीजपुरवठा खंडित करण्याशिवाय कोणताही पर्याय नाही. सर्वांनी थकीत वीजबिल भरून महावितरणला सहकार्य करावे

**-अरविंद बुलबुले,**
**मुख्य अभियंता**
**लातूर परिमंडल**

## अग्रलेख...

# श्रद्धा ठरू नये कमजोरी...

श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांतील सीमारेषा अतिशय धूसर असते. श्रद्धा म्हणजे विचारपूर्वक स्वीकारलेला विश्वास; तर अंधश्रद्धा म्हणजे तर्क, पुराव्याशिवायचा आंधळा विश्वास. अंधश्रद्धेत माणूस कुणाच्या तरी आहारी जातो आणि श्रद्धावंत व्यक्ती श्रद्धेच्या पल्याड स्वयंभू असते. ती सश्रद्ध असतानाही विवेकी असते. श्रद्धा माणसाला नैतिक बळ देते, तर अंधश्रद्धा शोषणाचे कारण ठरते. अशोक खरात प्रकरणातील शोषण आणि त्याची व्याप्ती हे सारे पाहून सारेच अवाक्‌ झाले आहेत. पण, हे असे इतक्या मोठ्या प्रमाणात घडत असताना आपण काय करीत असतो, हाही प्रश्न आहेच. सर्वसामान्य लोक नेहमीच सेलिब्रिटींचे, श्रीमंत-प्रभावशाली लोकांचे आणि राजकीय नेत्यांचे अनुकरण करीत असतात. एखादा मोठा नेता, सेलिब्रिटी किंवा उद्योगपती खरातसारख्या कथित आध्यात्मिक पुरुषाच्या चरणी श्रद्धा वाहताना दिसतो तेव्हा त्याचा प्रभाव नकळत समाजावर पडत असतो. त्यामुळेच खरातसारखे भोंदूबाबा वर्षानुवर्षे समाजाला नासवीत असतात. इतिहासातही अशी उदाहरणे आहेतच. दरवर्षी अशा एका तरी भोंदूचे प्रकरण उघडकीस येत असते आणि तरीही आपले डोळे उघडत नाहीत, हाच आश्चर्याचा विषय आहे.

गेल्या दशकभरात महाराष्ट्रासारख्या प्रगतिशील राज्यात भोंदूगिरीची दोनेक हजार प्रकरणे नोंदवली गेली आहेत. आर्थिक फसवणूक, जादूटोणा, चमत्कारांच्या नावाखाली शोषण, लैंगिक अत्याचार अशा अनेक प्रकारांनी ठिकठिकाणचे भोंदूबाबा समाजाला पोखरत आहेत. नोंद न झालेल्या प्रकरणांची संख्या नोंद झालेल्या प्रकरणांपेक्षा कितीतरी पटीने जास्त असणार. भीती, सामाजिक दबावामुळे लोक गप्प राहतात. त्यामुळे अशांचे काहीच बिघडत नाही. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी कायदा आहे, असे म्हणतात. पण, तो आहे तर दिसत कसा नाही, असा प्रश्न विचारण्याचा हा प्रसंग आहे. खरात प्रकरणाची तक्रार बरीच आधी झाली होती. परंतु, त्याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले गेले, असे दिसते. अशाने काळ सोकावतो आणि खरातसारखे भोंदू तर जास्तच सोकावतात. इतिहासाची पाने उलटून पाहिली तर अंगावर काटा आणणारी अनेक उदाहरणे दिसतात. नरबळीची अघोरी प्रथा आणि गुप्तधनाच्या हव्यासापोटी निष्पाप बालकांचे बळी देण्याचे प्रकार घडले आहेत. औषध देण्याच्या नावाखाली किंवा अंगात येण्याच्या प्रकारातून महिलांचे शोषण करण्यात आले. कधी चमत्काराचा बनाव करीत कुणी हवेतून साखळी काढली, तर कधी कुणी अंगारा देऊन कर्करोग बरा करण्याचा दावा केला. आजही देशात आणि राज्यात भोंदूगिरीच्या अनेक घटना घडताना आपण बघत आहोत. त्यातील अनेक घटना समाजाला हादरवून टाकणाऱ्या ठरल्या आहेत. अशा घटनांनी केवळ त्या व्यक्तींचे नुकसान होत नाही; तर समाजाच्या विवेकबुद्धीवर प्रश्नचिन्ह उभे होते. किरकोळ संकट पुढे आले तरी संयमाचे धागे उसवण्याचा हा काळ आहे. अशा काळात आपापल्या समस्येवर अल्प काळात उपाय शोधण्याच्या नादात भोंदूगिरीला सामाजिक बळ मिळते. भविष्य अज्ञात असते. खरे तर त्याच्या तशा असण्यातच मानवी जीवनाची गंमत आहे. पण, काही लोक भविष्याची जास्त चिंता करीत अशा वाईट लोकांच्या डावपेचांना बळी पडतात. आजार, आर्थिक अडचणी, कौटुंबिक समस्यांमुळे माणूस खचतो आणि झटपट उपाय शोधण्याच्या नादात भोंदूगिरीच्या जाळ्यात अडकतो. हे रोखण्यासाठी व्यापक उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. महाराष्ट्रात अंधश्रद्धाविरोधी कायदा अस्तित्वात आहे. पण, केवळ कायदा करून समस्या सुटत नसतात. अनेक वेळा तक्रारी नोंदवल्या जात नाहीत, पुरावे मिळत नाहीत किंवा साक्षीदार पुढे येत नाहीत. काही प्रकरणांमध्ये राजकीय किंवा सामाजिक दबावामुळेही कारवाई होत नाही. परिणामी, दोषींना शिक्षा होत नाही आणि भोंदूगिरीला आळा बसत नाही. भोंदूगिरीवर नियंत्रण आणायचे असेल, तर कायद्याची कठोर अंमलबजावणी करावी लागेल आणि त्यासाठी तक्रारींवर लगेच कारवाई करावी लागेल. सरकारी यंत्रणेकडून एवढीच अपेक्षा आहे.

खरातसारखे भोंदूबाबा हे समाजातील अविवेकी आणि घाबरट संवर्गाचे अपत्य असतात. श्रद्धा बाळगता-बाळगता आपण अंधश्रद्ध होत आहोत, हेच अशा अनेकांना कळत नाही. अशी माणसं हळूहळू कर्मकांडात अडकवली जातात. मग खरातसारखे बाबा सांगतील ते करायला त्यांचे मन तयार होते आणि त्यातून अशा घटना घडतात. आजकालचे भोंदू तर हायटेक झाले आहेत. त्यापैकी अनेक बाबा फेसबुक लाईव्ह आणि युट्यूबच्या माध्यमातून आपल्या शयनकक्षापर्यंत पोहोचले आहेत. भीती, अज्ञान आणि असहायता ही भोंदूबाबांना बळ देणारी ठरते. माणूस स्वतःच्या कष्टांवर, विचारांवर आणि प्रयत्नांवर विश्वास ठेवण्याऐवजी अशा बाबांच्या मागे लागतो तेव्हा फसवणूक होणे अपरिहार्य असते. सर्व आध्यात्मिक स्त्री-पुरुष खरातसारखे नसतात हे खरेच आहे. काही मंडळी आध्यात्मिक शिकवणुकीतून समाजाचे भले करीत आहेत, यात वाद नाही. पण खरातसारखे भोंदूही अनेक आहेत. व्यापक समाजहिताच्या दृष्टीने भोंदूंना रोखलेच पाहिजे. त्यांच्या हालचालींवर नजर ठेवली पाहिजे. भारतीय राज्यघटनेत नागरिकांच्या अधिकारांच्या तरतुदी आहेत, तशा नागरिकांच्या कर्तव्याच्याही आहेत. आपण अधिकारांबाबत नको तितके जागरूक. कर्तव्याच्या नावावर आनंद. घटनेतीलच एक तरतूद आहे वैज्ञानिक दृष्टिकोन बाळगण्याची व तो समाजात व्यापक प्रमाणात प्रसृत करण्याची. श्रद्धा आणि अंधश्रद्धा यांच्यातील सीमारेषा इथेच महत्त्वाची ठरते. श्रद्धा ही नेहमी वैयक्तिक असते. ती जीवनातील अनिश्चिततेशी सामना करण्याची ताकद देते. पण अंधश्रद्धा ही सामाजिक समस्या बनते. ती विचारशक्ती गिळून टाकते आणि माणसाला इतरांच्या हातातील बाहुली बनवते. खरात प्रकरण हे त्याचे ताजे उदाहरण. महाराष्ट्र हे प्रगतिशील राज्य आहे. त्याला सुधारकी चळवळींचा इतिहास आणि वर्तमान आहे. सामाजिक परिवर्तनाच्या केंद्रस्थानी असलेले हे राज्य आहे. अशा राज्यात खरातसारखे समाजकंटक निर्माण होतात आणि त्यांचे शोषणाचे धंदे वर्षानुवर्षे बिनबोभाट चालत राहतात, हे अजिबात शोभणारे नाही. आज महाराष्ट्राच्या विकासाची गती प्रचंड आहे. पायाभूत सुविधांमध्ये मोठे बदल होत आहेत, गुंतवणूक वाढते आहे. शहरीकरण मोठ्या प्रमाणात होते आहे. पण समाजात अजूनही अंधश्रद्धा असेल आणि तिला कळत-नकळत पाठिंबा देणारे लोक असतील तर या प्रगतीत कुठेतरी न्यून आहे. कारण अशा घटनांचा परिणाम केवळ त्या व्यक्तींवर होत नाही, तर संपूर्ण समाजाच्या प्रतिमेवर होतो. राज्याच्या प्रतिमेवर परिणाम होतो. सर्वत्र एक प्रश्न निर्माण होतो की, जिथे इतकी प्रगती होते आहे, तिथे अजूनही अंधश्रद्धेला एवढे स्थान का?... यावर उपाय करायचे असतील तर सर्वप्रथम, शिक्षण पद्धतीत बदल आवश्यक आहे. विद्यार्थ्यांना केवळ माहिती देणे पुरेसे नाही. त्यांना विचार करायला शिकवले पाहिजे. प्रश्न विचारणे, तर्क वापरणे आणि पुराव्यांवर विश्वास ठेवणे ही सवय लावली पाहिजे. जिज्ञासू आणि चिकित्सक बुद्धीचे विद्यार्थी घडवणे हा सर्वांत महत्त्वाचा उपाय आहे. कारण त्यातूनच भविष्यातले जागरूक नागरिक घडतील. वर्तमान दुरुस्त करण्यासाठी प्रसिद्ध व्यक्तींनी अंधश्रद्धेला कोणत्याही पद्धतीने प्रोत्साहन देणे थांबवले पाहिजे. माध्यमांनी अंधश्रद्धेचा भंडाफोड वेळच्या वेळी केलाच पाहिजे. आणि शेवटी येते ती प्रत्येक व्यक्तीची स्वतःची जबाबदारी. समोरची व्यक्ती कुणीही असली तरी श्रद्धेचा विषय येताच संशयाने पाहणे शिकले पाहिजे. संशयी मन असणे ही कमजोरी नसते. ती शहाणपणाची सुरुवात असते. असा शहाणपणा नसेल तर काय घडते, हे आपल्याला खरात प्रकरणात दिसून आलेलेच आहे. त्यामुळे आता तरी सर्वांनी जागे झाले पाहिजे. आपले श्रद्धावंत असणे आपली कमजोरी ठरता कामा नये. आपल्या श्रद्धेचा फायदा कुठल्याही भोंदूबाबाला उठविता येणार नाही, याची प्रत्येकाने काळजी घ्यावी. आपल्या श्रद्धेतून आपल्याला जे मानसिक बळ प्राप्त होते ते अशा व्यक्तींच्या चिकित्सेसाठीही वापरले पाहिजे आणि सर्वांनी मिळून अंधश्रद्धा व त्यासाठी कारणीभूत असलेल्या सर्व घटकांचा नाश केला पाहिजे.


## विशेष

प्रा. सुखदेव बखळे

# रेल्वेस्थानके परिवर्तनाच्या प्रक्रियेत

भारतातील रेल्वेस्थानकांचा विकास आता केवळ प्रवासी चढ-उतार करण्याच्या ठिकाणांपुरता मर्यादित राहिलेला नाही. आधुनिक शहरी नियोजनाच्या संकल्पनेनुसार ही स्थानके बहुविध वाहतूक केंद्रे (मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब) म्हणून विकसित होत आहेत. या प्रक्रियेमुळे रेल्वे प्रवास अधिक सुलभ, सुरक्षित आणि आधुनिक होत असून रेल्वेची प्रतिमाही बदलत आहे. 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' म्हणजे एका ठिकाणी विविध वाहतूक साधनांची प्रभावी जोडणी. रेल्वेस्थानकाला केंद्रबिंदू मानून बस, मेट्रो, टॅक्सी, रिक्षा, सायकल आणि पादचारी मार्ग यांचे एकत्रित नियोजन केले जाते. भारतात या संकल्पनेला चालना देण्यासाठी 'अमृत भारत स्टेशन योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेत देशभरातील १३०० हून अधिक स्थानकांचा टप्प्याटप्प्याने विकास करण्यात येत आहे. या योजनेंतर्गत स्थानके केवळ वाहतूक केंद्र न राहता शहरातील महत्त्वाचे सार्वजनिक आणि व्यावसायिक केंद्र बनवण्यावर भर दिला जात आहे. पूर्वी रेल्वेस्थानकातून बाहेर पडल्यावर पुढील वाहतुकीसाठी प्रवाशांना बराच वेळ लागायचा. आता बस, मेट्रो किंवा टॅक्सीची सुविधा स्थानकाच्या परिसरातच उपलब्ध होत असल्यामुळे प्रवास सुलभ झाला आहे. आधुनिक स्थानकांवर वातानुकूलित प्रतीक्षागृहे, स्वच्छ स्वच्छतागृहे, डिजिटल माहिती प्रणाली, फूड कोर्ट, शॉपिंग क्षेत्र, एस्कलेटर आणि लिफ्ट अशा सुविधा उपलब्ध होत आहेत. सीसीटीव्ही, 'स्मार्ट मॉनिटरिंग सिस्टिम', गर्दी व्यवस्थापन तंत्रज्ञान आणि आधुनिक प्रकाशयोजना यामुळे स्थानक परिसर अधिक सुरक्षित झाला आहे. दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी सुलभता रॅम्प, ब्रेल साईन, लिफ्ट आणि विशेष सुविधा यामुळे दिव्यांग आणि ज्येष्ठ नागरिकांना प्रवास अधिक सोपा झाला आहे.

आधुनिक स्थानकांमुळे भारतीय रेल्वेची प्रतिमा मोठ्या प्रमाणात बदलत आहे. पूर्वी रेल्वेस्थानक म्हणजे गर्दी, अस्वच्छता आणि अव्यवस्था असे चित्र डोळ्यासमोर येत असे. आता आधुनिक वास्तुकला, स्वच्छ परिसर, डिजिटल सेवा आणि व्यावसायिक व्यवस्थापनामुळे स्थानके आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देणारी ठिकाणे बनत आहेत. या बदलाचे एक उल्लेखनीय उदाहरण म्हणजे भोपाळमधील राणी कमलापती रेल्वेस्थानक. हे स्थानक विमानतळासारख्या सुविधांसाठी प्रसिद्ध झाले असून आधुनिक रेल्वेस्थानकाचा आदर्श नमुना मानले जात आहे. यामुळे भारतीय रेल्वेची जागतिक स्तरावर सकारात्मक प्रतिमा तयार होत आहे. रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासाचा कार्यक्रम देशभर वेगाने पुढे जात आहे. 'अमृत भारत स्टेशन'अंतर्गत शेकडो स्थानकांचे




काम सुरू आहे. अनेक ठिकाणी स्थानकांच्या इमारतींचे आधुनिकीकरण, प्लॅटफॉर्म सुधारणा, पार्किंग व्यवस्था, प्रवेशद्वार आणि वाहतूक व्यवस्थेची पुनर्रचना करण्यात आली आहे. महाराष्ट्रातील परळ, माटुंगा, चिंचपोकळी, लासलगाव आणि धुळे स्थानकांचा विकास करण्यात आला आहे. पुणे, शिवाजीनगर, हडपसर, खडकी ही रेल्वेस्थानके भविष्यात पूर्ण विकसित 'मल्टीमोडल ट्रान्सपोर्ट हब' बनण्याची अपेक्षा आहे. रेल्वेस्थानकांच्या पुनर्विकासामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळत आहे. स्थानक परिसरात व्यापारी संकुले, हॉटेल, रिटेल दुकाने आणि कार्यालये विकसित होत आहेत. रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होत आहेत. शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा होत आहे.

भविष्यात रेल्वेस्थानके अधिक स्मार्ट, शाश्वत आणि तंत्रज्ञानाधारित असतील. सौर ऊर्जा, पावसाचे पाणी साठवण, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना आणि पर्यावरणपूरक बांधकाम यावर भर दिला जाणार आहे. स्मार्ट तिकीट प्रणाली, मोबाईल ॲपद्वारे माहिती, 'एआय' आधारित गर्दी व्यवस्थापन आणि डेटा आधारित देखभाल प्रणाली यांचा वापर वाढविण्यात येणार आहे. स्थानकांचा विकास शहराच्या 'स्मार्ट सिटी' प्रकल्पांशी जोडून एकात्मिक वाहतूक प्रणाली तयार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. देशभरात रेल्वेस्थानके आता बहुविध वाहतूक केंद्रे (मल्टिमोडल ट्रान्सपोर्ट हब) आणि व्यावसायिक संकुले म्हणून विकसित केली जात आहेत. त्यात हवामानानुकूल सार्वजनिक जागांचीही संकल्पना आहे. गेल्या काही वर्षांमध्ये भारतीय रेल्वे तसेच खाजगी भागीदारांनी मोठ्या प्रमाणावर स्थानक पुनर्विकास कार्यक्रमांना वेग दिला असून, प्रवाशांना उत्तम सेवेचा अनुभव देण्याबरोबरच रेल्वेच्या जमिनीतील व्यावसायिक क्षमता उलगडणे हाही उद्देश आहे. रेल्वेस्थानकांच्या या रूपांतरणामागे डिसेंबर २०२२ मध्ये रेल्वे मंत्रालयाने सुरू केलेली 'अमृत भारत स्टेशन स्कीम' ही राष्ट्रीय योजना प्रमुख प्रेरक शक्ती ठरत आहे. ६ ऑगस्ट २०२३ रोजी या योजनेंतर्गत देशभरातील ५०८ स्थानकांच्या पुनर्विकासासाठी भूमिपूजन करण्यात आले. या योजनेचा हेतू स्थानकांचे केवळ तात्पुरते सौंदर्यवर्धन न करता 'शहर केंद्र' म्हणून विकसित करणे हा आहे.

डिसेंबर २०२५ पर्यंत ठरवलेल्या १,३३७ स्थानकांपैकी १५५ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून या योजनेचा देशव्यापी विस्तार स्पष्टपणे दिसून येतो. मे २०२५ मध्ये या परिवर्तन प्रक्रियेत एक महत्त्वाचा टप्पा गाठला गेला. त्या वेळी देशभरातील १०३ पुनर्विकसित स्थानकांचे उद्घाटन करण्यात आले. यामध्ये सहारणपूर (उत्तर प्रदेश), ओर्चा (मध्य प्रदेश), परळ (मुंबई) तसेच मुनीराबाद आणि धारवाड (कर्नाटक) या स्थानकांचा समावेश होता. या कार्यक्रमाने रेल्वेने पायाभूत सुविधांच्या आधुनिकीकरणाला मिळालेला वेग अधोरेखित केला. वाढीव अर्थसंकल्पीय तरतुदी, प्रकल्प अंमलबजावणीतील गती, प्रवासी सुविधा आणि व्यावसायिक विकास यांचा समन्वय साधणारी नव्या प्रकारची दृष्टी यामुळे ही गती शक्य झाली आहे. पुनर्विकसित स्थानकांपैकी राणी कमलापती हे केरळमधील रेल्वे स्टेशन सार्वजनिक-खाजगी भागीदारीच्या मॉडेलवर उभारलेले जागतिक दर्जाचे उदाहरण मानले जाते. जर्मनीतील हेडलबर्ग या स्थानकाच्या धर्तीवर उभारलेले हे स्थानक भारतातील पहिले 'वर्ल्ड-क्लास' रेल्वेस्थानक म्हणून ओळखले जाते आणि येथे विमानतळासारखा प्रवासी अनुभव मिळतो. काही स्थानके पूर्णपणे नव्याने उभारली जात आहेत, तर अनेक ठिकाणी मध्यम स्तरावरील आधुनिकीकरणाचे काम केले जात आहे. तथापि, या नव्या पिढीतील स्थानकांचे दोन मूलभूत घटक स्पष्टपणे दिसतात. उत्तम सुविधा आणि पायाभूत रचनेद्वारे प्रवासी आराम वाढवणे आणि किरकोळ व्यापार, फूड कोर्ट आणि संरचित पार्किंगद्वारे व्यावसायिक क्षमता वाढवणे. पुनर्विकास कार्यक्रमाचा विस्तार होत असताना त्याच्या यशासाठी शाश्वतता आणि डिजिटलायझेशन यांचे प्रभावी एकत्रीकरण महत्त्वाचे ठरणार आहे. उष्णतेच्या लाटा, पूर आणि पाण्याची टंचाई यासारख्या आव्हानांना सामोरे जाणाऱ्या देशात हवामान-संवेदनशील स्थानक डिझाईन आता अपरिहार्य बनले आहे. सौर ऊर्जा, ऊर्जा कार्यक्षम प्रकाशयोजना, नैसर्गिक थंडावा देणारी रचना, पावसाच्या पाण्याचे संकलन, शून्य-निचरा मलनिस्सारण प्रणाली आणि स्थानिक वनस्पतींवर आधारित हरित क्षेत्र याद्वारे पर्यावरणीय परिणाम कमी करता येतील आणि दीर्घकालीन संचालन खर्चही घटू शकतो. एकूणच, भारतातील स्थानक पुनर्विकास हा केवळ इमारती सुधारण्याचा कार्यक्रम नाही, तर भविष्यासाठी सज्ज आणि शाश्वत वाहतूक केंद्रे उभारण्याचा व्यापक प्रयत्न आहे. या परिवर्तनाचा प्रवास पुढे नेताना सर्वसमावेशक, तांत्रिकदृष्ट्या प्रगत, कार्यक्षम आणि देशाच्या व्यापक शाश्वत विकास उद्दिष्टांशी सुसंगत राहणे अत्यावश्यक ठरणार आहे.

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

गिरीश शेरेकर

# गो-तस्करीचे 'कोडे' केव्हा उलगडणार?

कायदे अनेक बनविले जातात पण, सर्वच कायद्यांची अंमलबजावणी होतेच असे नाही. केंद्र व राज्य सरकारांनी बनविलेले काही कायदे फक्त कागदावरच असल्याचे आपल्या लक्षात येईल. उदाहरण द्यायचे झाल्यास महाराष्ट्रात गोवंश हत्या, तस्करी, अवैध वाहतूक बंदी आणि गुटखा व पानमसाला बंदी कायदा आहे. पण, या दोन्ही कायद्याचे पालन व अंमलबजावणी होताना कुठेच दिसत नाही. कायद्यातल्या तरतुदीच्या उलट मात्र सर्व काही जोरात होत आहे. गुटखाबंदीचा कायदा २०१२ तर गोवंश हत्याबंदीचा कायदा २०१५ साली लागू झाला. हे कायदे अस्तित्वात येण्याच्या पूर्वीची आणि आताच्या स्थितीत किती बदल झाला हे सांगताच येत नाही. कारण, दिसण्यासारखा बदलच झाला नसल्याने तो सांगणे कोणालाही शक्य नाही. आता तर अनेकांना असे काही कायदे झाले आहेत, याचाही विसर पडला आहे. विदर्भच काय राज्यातल्या अनेक भागांतून गोवंशाची इतकी खुलेआम तस्करी व कत्तल होत असताना व्यवस्था मात्र मूकदर्शक झाली आहे. विशेष म्हणजे हे सर्व देशी गाईंना राज्य शासनाने 'राजमाता-गोमाता' हा दर्जा दिल्यावर होत असल्याने अनेकांचा संताप अनावर होत आहे.

कायदा व त्याचा अंमल करणारी व्यवस्था असताना सुद्धा गोतस्करी होते हे न उलगडणारे कोडे आहे. सुरुवातीला तस्करीवर काही प्रमाणात लगाम होती. पण, यंत्रणा आणि त्यांच्या काम करण्याच्या पद्धतीचा अभ्यास करून तस्करांनी आपली कार्यपद्धती बदलविल्याने तस्करीचे कोडे दिवसागणिक अवघड होत आहे. मध्य प्रदेशाचे महाराष्ट्राला लागून असलेल्या सीमावर्ती भागातले तालुके आणि याच भागाला लागून असलेले विदर्भातील नागपूर, अमरावती, अकोला या जिल्ह्यातील तालुके तस्करीचे मुख्य केंद्र आहे. या तालुक्यांमधली काही मोठी गावे गोवंश तस्करीची उपकेंद्रे म्हणून उदयास येत आहेत. तस्करीसाठी मार्ग अनेक आहेत. मेळघाटच्या जंगलातून तर जनावरांना पायदळ नेत तस्करी होते. अलिकडेच एका तस्कराचा वाघाने फडशा पाडला होता. या घटनेवरून आणखी एक बाब स्पष्ट झाली की, वनविभाग कितीही सांगत असला तरी मेळघाटच्या जंगलातून गो-तस्करी होतेच. सांगायचा मुद्दा इतकाच की, पहिले केंद्रित असलेली तस्करी व कत्तल आता विकेंद्रित पद्धतीने होत आहे. गोवंशाची कत्तलीसाठी होणारी वाहतूक पूर्वीसारखी मोठ्या वाहनातून होत नाही. छोट्या वाहनांतून वेगवेगळ्या मार्गाने ती होते. याच पद्धतीने कत्तलही विविध ठिकाणी छोट्या स्वरूपात होते.

या मागचा मुख्य उद्देश कारवाई झाली तरी कमीत कमी नुकसान हा आहे. यात नव्याने अधोरेखित करण्यासारखा मुद्दा म्हणजे तस्करीसाठी आता गरीब हिंदूंना चांगल्या मजुरीचे आमिष दाखवून कामावर घेतले जाते. या मागचा त्यांचा मुख्य उद्देश इतकाच की, या कामात फक्त एकाच धर्माचे नाही तर इतरही धर्माच्या लोकांचा समावेश आहे, हे व्यवस्थेला दाखविणे होय. वेगवेगळ्या क्लृप्त्या करून तस्करी यशस्वीपणे केली जात आहे. शासन व प्रशासन मात्र महात्मा गांधींच्या तीन बंदरांच्या भूमिकेत वावरत आहे. गोवंशाच्या अवैध वाहतुकीविरुद्ध ज्या काही कारवाया होतात, त्या हिंदुत्ववादी संघटनांशी जुळलेल्या गोरक्षकांच्या सतर्कतेनेच होतात. त्यांच्याकडून माहिती मिळाल्यावरच पोलिस कारवाई करते. आता पाठबळ नसल्याने आस्था असूनही त्यांचा उत्साह कमी झाला आहे.

परवा राज्यसभेचे खासदार डॉ. अनिल बोंडे यांनी गोवंश तस्करीचा मुद्दा अमरावती पोलिस अधीक्षकांना निवेदन पाठवून प्रकर्षाने मांडला. त्यात त्यांनी तस्करीचे हे काम संघटितपणे कशा पद्धतीने होते, हे उदाहरणासह नमूद करून यात सहभागी सर्वांवर गोहत्या बंदी कायद्यासह मकोका (महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायदा) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली आहे. त्यांनी मोर्शी तालुक्यातल्या हिवरखेड येथील नागठाणाचे एक उदाहरण दिले. मध्य प्रदेशचा सीमावर्ती भाग, वरूड, मोर्शी भागातले ते मुख्य केंद्र झाले असून येथेच गोवंश एकत्र करून विविध भागांत कत्तलीसाठी पाठविले जाते. पूर्वीप्रमाणे गोरक्षा दल कार्यान्वित करण्याची सूचना त्यांनी पोलिस अधीक्षकांना केली आहे. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे कमी अधिक याच पद्धतीने सर्वत्र गोवंशाची वाहतूक होऊन पुढे कत्तल होते. या धंद्यात सहभागी असणारे आपली पद्धत वेळोवेळी बदलतात म्हणून ते यशस्वी होत आहेत. शासन व प्रशासनाची परिणामकारकता जुन्याच पद्धतीने काम करत असल्याने कमी झाली आहे. कार्यपद्धतीत बदल केल्याशिवाय आवश्यक ते परिणाम समोर दिसणार नाहीत. त्यासाठी गोसेवा आयोगासह समाजातल्या विविध घटकांनी दबाव वाढविण्याची गरज आहे. तेव्हाच गो-तस्करीचे कोडे उलगडेल!

९४२०७२१२२५

## धर्म-संस्कृती

प्रा. दिलीप जोशी

# पद्मपुराण

१८ पुराणात पद्मपुराण अत्युच्च स्थानावर आहे. पद्मपुराण भगवंताच्या पुराण विग्रहाच्या हृदयस्थानी आहे. 'हृदयं पद्मसंज्ञकम्' असे प्रमाण आहे. या पुराणाचा मुख्य प्रतिपाद्य विषय श्रीविष्णू असले, तरी यात भगवान शिव आणि ब्रम्हदेवांचेही प्रतिपादन आहे. या पुराणाच्या श्रवण अथवा पठनाने भगवंताप्रति रती, प्रीती आणि अनुराग उत्पन्न होतो. शास्त्रात याला शुद्धभाव म्हणतात म्हणूनच पद्मपुराण वेदतुल्य आहे.

**'तस्माद्यदि हरेः प्रीतेरुत्पादे धियते मतिः ।**
**श्रोतव्यमनिशं पुंभिः पुराणं कृष्णरुपिणः ॥'**

वेदांनंतर पुराणाचे स्थान आहे. काही वेळा तर या पुराणाचे स्थान वेदांच्याही वर असल्याचे स्वतः पद्मपुराणच सांगते.

**'यो विद्याच्चतुरो वेदान् सांगोपनिषदो द्विजः ।**
**पुराणं च विजानाति यः स तस्माद्विचक्षणः ॥'**

पद्मपुराणातील हा श्लोक याबाबत पुष्टी करतो. पद्मपुराण नैमिषारण्यात शौनकादी ऋषींना लोमहर्षन सुतांचे पुत्र उग्रश्रवा सुतांनी सांगितले. पद्मपुराण ५ खंड आणि ५५ हजार श्लोकांचे असून सृष्टी खंड, भूमी खंड, स्वर्ग खंड, पाताल खंड आणि उत्तर खंड असे ते पाच खंड आहेत.

**'प्रथमं सृष्टीखंडं हि भूमीखंडं द्वितीयकं ।**
**तृतीयं स्वर्गखंडं च पातालं चतुर्थकम् ।**
**पंचमं चोत्तरं खंडं सर्व पापप्रणाशनम् ।'**

काही ठिकाणी याची विभागणी सात खंडातही दिली आहे. या पुराणाचे नाव पद्मपुराण का पडले? तर, भगवान विष्णूंच्या नाभीतून कमळ निर्माण झाले. त्या कमळातून भगवान ब्रह्मदेव उत्पन्न झाले. ब्रह्मदेवांनी सृष्टी निर्माण केली. त्यावेळी भगवान विष्णूंनी सांगितलेला उपदेश पद्मपुराण रूपात ब्रह्मदेवांनी आपला पुत्र मरीची पुलस्त्य आदींना सांगितला. थोडक्यात हे तत्त्वज्ञान आणि तत्त्वकर्ते पद्म म्हणजे कमळातून निर्माण झाले म्हणून या पुराणाला पद्मपुराण म्हणतात.

सृष्टी खंडामध्ये पुलस्त्य महामुनी यांनी हे पुराण भीष्माचार्यांना सांगितले. यात त्यांनी सृष्टीक्रम तथा भगवान विष्णूंचे महात्म्य सांगितले. या पुराणात वराह अवतार कथा, लक्ष्मीची कथा, अमृताची समुद्रमंथनाची कथा विशद केली. सतीचा देहत्याग, दक्षयज्ञ विध्वंस इथे विशेषत्वाने सांगितला. भीष्म आणि पुलस्त्य यांच्या संवादातूनच देवता, दानव, गंधर्व, नाग आणि राक्षस यांची उत्पत्ती कथा सांगितली. मरुद्गण, चौदा मन्वंतर, पृथु चरित्र, सूर्यवंश वर्णन, चंद्रवंश वर्णन, यदुवंश तथा श्रीकृष्ण अवतार वर्णन पद्मपुराणात सांगितले आहे. पुष्कर क्षेत्र आणि सरस्वती प्राकट्य, पुष्कर क्षेत्री भगवान श्रीराम लक्ष्मण सीतामाई यांनी जाऊन केलेला श्राद्ध विधी, श्रीराम द्वारा शंबूक वध कथा या पुराणात आहे. दंडकारण्य उत्पत्ती, तारकासुर जन्म, मदन दहन कथा, गणेश कार्तिकेय जन्म, तारकासुर वध इथे आहे. गरुड चरित्र, रुद्राक्ष उत्पत्ती, गंगा उत्पत्ती इत्यादी सृष्टी खंडात आहे.

पद्मपुराणाचा दुसरा भाग म्हणजे भूमी खंडात शिव शर्मा नामक भक्त आणि त्याचे चार पुत्र यांची कथा, पाप-पुण्य फळ, ययाती कथा, महर्षी च्यवन कथा, विहुंड दैत्य वध आणि पद्मपुराण महात्म्य आहे. पद्मपुराणाचा तिसरा खंड असलेल्या स्वर्ग खंडात भारतवर्षाचे वर्णन ज्यात नर्मदादी, अमरकंटक, कावेरी, यमुना, काशी, प्रयाग वर्णन आहे. कीर्तन महिमा, ब्रह्मचर्य नियम, गृहस्थ नियम, वानप्रस्थ आणि संन्यास नियम या खंडात आहे. पद्मपुराणाचा चौथा खंड म्हणजे पाताल खंडात श्रीराम भगवंताचे श्रीलंकेतून अयोध्या आगमन आणि त्या नंतरचे वर्णन आहे. सीतामातेचे अरण्यात जाणे, लव आणि कुश, भरत, शत्रुघ्न, लक्ष्मण वर्णन इत्यादी इथे आहे. वृंदावन आणि श्रीकृष्ण-राधा, शालिग्राम वर्णन, तुळशी आणि अश्वत्थ महिमा दिला आहे. तुळशीला हरिप्रिया का म्हणतात? तिचे औषधीय महत्त्व, उत्पत्ती इत्यादी बाबी या पुराणात आहेत. पुढील श्लोकावरून लक्षात येईल.

**'तुलस्यामृत जन्मासि सदा त्वं केशव प्रिये!**
**केशवार्थ चिनोमि त्वं वरदा भव शोभनेय ।'**

पद्मपुराणात काही प्रात्यक्षिक बाबींचा विचार दिला आहे. उत्तरखंडात बद्रिकाश्रम आणि नारायण महिमा, अन्नदान, जलदान, वृक्षारोपण महिमा दिला आहे. पाणी आणि वृक्षारोपण किती महत्त्वाचे हे पद्मपुराण सांगते. प्रत्येक महिन्यात दोन एकादशी येतात. त्यांची वर्षाची एकूण २४ नावे जसे मोक्षदा एकादशी, सफला एकादशी, पुत्रदा एकादशी, षट्तिला आणि जया एकादशी, विजया आणि आमलकी एकादशी अशा विविध एकादशीची नावे आणि महात्म्य पद्मपुराणात आहेत. चातुर्मास महात्म्य, श्रीमद्‌भगवद्‌गीता महात्म्य, मार्कंडेय जन्म, विविध अवतार कथा या पुराणात आहेत. शिव-विष्णू ऐक्य या पुराणात दिले आहे.

**'शैवम च वैष्णवम लोकमेका रूपं नरोत्तम,**
**द्वयोश्चाप्यन्तरं नास्ति एक रूपं महात्मनोः ।'**

शिवाय

**'विष्णु रूपाय विष्णवे शिव रूपिणे,**
**शिवस्य हृदये विष्णुर्विष्णुर्हृदय शिवः ।'**

या पुराणात शिव, विष्णू आणि ब्रह्मा यांचे तत्त्व मांडले आहे. विष्णुभक्तीची उत्कटता सांगताना जिव्हा तीच जी विष्णू नाम घेते, हृदय तेच जे नारायण नामाने पिघळते हे सांगणारा पुढील श्लोक पहा.

**'सा जिह्वा य हरीं स्तौति तन्मनास्तत्पादानुगम्,**
**तानि लोमानि चोच्यन्तेय यानि तत्रामनि च्योष्तितम् ।**
कुर्वन्ति तच्च नेत्राम्बु यदाच्युत प्रसन्नतः।'

पद्मपुराण पठन अथवा श्रवण हा भगवत्प्रीतीसाठी मार्गसोपान आहे, हे पद्मपुराणाचे महात्म्य आहे.

**'तस्माद्यदि हरेः प्रीतेरुत्पादे धीयते मतिः ।**
**श्रोतव्यमनिशं पुंभिः पुराणं कृष्णरुपिणः ।'**

या श्लोकातून पद्मपुराण महिमा लक्षात येईल. पद्मपुराण परिपूर्ण पुराण असून सर्वांना उपयुक्त, समजणारे आणि करणीय धार्मिक बाबी सांगणारे पुराण आहे. हे पुराण भारताचा इतिहास आहे. त्यामुळेच हे पुराण प्रासादिक आहे.

९८२२२६२७३५

## वाचक पत्रे

### पाणपोई नामशेष होण्याच्या मार्गावर

पूर्वी कडक उन्हाळ्यात वाटसरूंची तहान भागावी म्हणून ठिकठिकाणी पाणपोई बांधली जायची. मात्र या आधुनिक युगात ग्रामीण भागात आता पाणपोईचे अस्तित्वच नष्ट होत चालले आहे. पैसे देऊन मिनरल वॉटर विकत घेऊन वाटसरूंकडून आपली तहाण भागवली जात आहे. सध्याच्या बदललेल्या या आधुनिक युगात मिनरल वॉटरचा वापर मोठ्या प्रमाणावर होऊ लागला आहे. प्रवास करताना, नवख्या ठिकाणी जाताना मोठ मोठ्या कार्यक्रमाप्रसंगी शुद्ध व निर्जंतुक केलेले मिनरल वॉटर वापरले जाऊ लागल्याने पाणपोई दुर्लक्षित होऊ लागल्या आहेत. ग्रामीण भागातही मिनरल वॉटर उपलब्ध होत असल्याने सर्वसामान्यांकडून देखील याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो.

पूर्वी ग्रामीण भागात तसेच शहरी भागातही विविध सामाजिक संस्था, सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्ती, विविध प्रकारची मंडळे यांच्याकडून गावांतील मुख्य रस्त्यांवर, चौकात, वर्दळीच्या ठिकाणी उन्हाळा सुरू झाल्यानंतर पाणपोई सुरू केली जात होती. यासाठी मातीच्या मोठ्या रांजणामध्ये पिण्याचे पाणी भरून ते एखाद्या झाडाखाली अथवा सावलीच्या ठिकाणी झाकून ठेवले जात होते. पाणी पिण्यासाठी प्याला व त्याबरोबर पाणी घेण्यासाठी ओरगाळे देखील या ठिकाणी ठेवलेले असायचे. उन्हातान्हात थकून-दमून आलेल्या व्यक्तीसाठी ही पाणपोई म्हणजे आपली तहान भागविण्यासाठी मोठा आधार होता. अतिथी देवो भव या उक्तीप्रमाणे भारतीय संस्कृतीत महत्त्वाचे स्थान असणाऱ्या या पाणपोईतील पाणी पिऊन तृप्त झालेली व्यक्ती पाणपोई सुरू करणाऱ्याला मनोमन धन्यवाद देऊन कृतज्ञता व्यक्त करत होती. मात्र आता मिनरल वॉटरमुळे पाणपोईचे अस्तित्वच राहिले नाही. ग्रामीण भागातही ठिकठिकाणी मिनरल वॉटरचे उत्पादन करणारे कारखाने सुरू झाले आहेत. त्यामुळेच भारतीय संस्कृतीचे प्रतीक असणारी पाणपोई नामशेषच होण्याच्या मार्गावर असल्याचे लक्षात येत आहे.

**जयदीप सुधीर हिरवे**/पुणे. ९०९६२७६४८३

### 'अविरत' शतकाचा प्रवास, विचारांचा अखंड यज्ञ

२१ मार्च २०२६ रोजी प्रकाशित 'अविरत' या शताब्दी विशेष पुरवणीने शंभर वर्षांचा घेतलेला आढावा, हा एका विचारप्रवाहाचा, एका मूल्यपरंपरेचा आणि एका अखंड राष्ट्रनिष्ठ प्रवासाचा जिवंत दस्तावेज वाचकांसमोर ठेवला आहे. ''न मे कर्मफले स्पृहा'' हे ब्रीदवाक्य घेऊन दैनिक 'तरुण भारत'ची वाटचाल खऱ्या अर्थाने अविरत सुरू आहे. कर्मयोगाची ही अखंड परंपरा केवळ आजपर्यंत मर्यादित नाही, तर पुढील शतकानुशतकेही अशीच तेजस्वीपणे सुरू राहील, याबाबत तिळमात्र शंका नाही. ''चले हैं ध्येय पथ पर, चलेंगे ध्येय पथ पर'' या गीतातील भावार्थाप्रमाणे, ध्येयवादी, सातत्यपूर्ण आणि निष्ठेची ही परंपरा या पुरवणीच्या प्रत्येक पानातून जाणवते.

'अविरत'मधील लेख वाचताना स्पष्ट होते की तरुण भारत हे : राष्ट्र प्रथम भूमिका जपणारे दैनिक, एका विचारप्रवाहाचा उत्सव, पत्रकारितेचे प्रेरणास्थान, शताब्दीचा धगधगता यज्ञ, मराठी पत्रकारितेतील सोनेरी पर्व. ही सर्व विशेषणं तरुण भारतला अगदी सार्थ ठरतात. गेली ५८ वर्षे या प्रवासाचा मी स्वतः साक्षीदार आहे. समजायला लागल्यापासून तरुण भारत हे माझ्या जीवनाचा एक अविभाज्य भाग राहिले आहे. विशेषतः स्पंदन पुरवणीमुळे आमच्या संगणक संस्कार केंद्रातील अनेक बालकांना लिहितं करण्याची प्रेरणा मिळाली, एखाद्या रुक्ष क्षेत्रात (जिथे केवळ यंत्रांचे आवाजच कानांवर) राहूनही लिखाणाला स्थान देऊन प्रोत्साहन देणाऱ्या तरुण भारताचे मोठे योगदान आहे. या शताब्दी पुरवणीचे दोन्ही भाग एकत्रितपणे, ऐतिहासिक, आश्वासक आणि देदीप्यमान वाटचाल दर्शवतात. भूतकाळ, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा सेतू निर्माण करतात. समाजाभिमुख दृष्टिकोन ही खास ओळख, मूल्यांची जपणूक आणि देशभक्तीचा जागर, राष्ट्रचेतनेच्या जागृतीचा उत्सव, लोकशाहीचा निर्भीड प्रहरी, माध्यम जगतातील कर्मयोग, समृद्ध व्यक्तिमत्त्व घडविणारे वृत्तपत्र म्हणून तरुण भारतची वैशिष्ट्यपूर्ण ओळख होते. तरुण भारत हा संघ विचारांचा अभिमान बाळगणारा, पण मुखपत्र नसलेला स्वतंत्र विचारांचा मंच आहे ही त्याची सर्वांत मोठी ताकद आहे.

**श्रीकांत भास्कर तिजारे**/९४२३३८३९६६

### पुन्हा चुली पेटल्यात

युद्ध इराण- इस्रायल, अमेरिका यांच्यात सुरू आहे. पण त्याची झळ संपूर्ण जगाला बसली आहे. गृहिणींना धुरांचा त्रास नको म्हणून घरोघरी स्वयंपाकासाठी गॅस वापरला जातो आहे. केरोसिन तर आता मिळतच नाही. कोळसा, लाकडं याचे भाव आकाशात आहे. अचानक गॅस सिलेंडर टंचाई निर्माण झाली. ज्यांच्याजवळ एकच सिलेंडर आहे, ते संपले की दुसरे मिळायला दोन दिवस लागत आहे. युद्धाची झळ तळागाळांपर्यंत पोहोचली आहे. हे सगळं लवकर थांबले पाहिजे. नाहीतर आणखी कशा कशाची टंचाई होईल. अप्रत्यक्ष परिणाम आता होतातच आहे. आपण सगळे प्रार्थना करू शकता.

**अंजली पळणीटकर**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीराम



भगवान विष्णूच्या प्रमुख १० अवतारा मध्ये मत्स्य, कुर्म , वराह, नरसिंह ,वामन ,परशुराम ,श्री राम , श्रीकृष्ण , गौतम बुद्ध आणि कल्की अवतार. यामधील श्री विष्णूंचा सातवा अवतार म्हणजेच प्रभू श्रीरामचंद्र.

चैत्र शुद्ध नवमी या दिवशी कौशल्या आणि दशरथ यांचा पुत्र त्रेतायुगातले रावणाचे अत्याचार नष्ट करण्यासाठी आणि धर्माची पुनर्स्थापना करण्यासाठी श्रीरामचंद्रांनी जन्म घेतला. हिंदू धर्माचे आराध्य दैवत, सत्यवचनी ,आदर्श पुत्र, एकपत्नीव्रत, पराक्रमी ,आदर्श राजा ,संघटन कुशलता, ,संयमी, त्यागी, प्रतिकूल परिस्थितीतही मन स्थिर ठेवणाऱ्या प्रभू श्री रामचंद्राचा जन्मसोहळा रामनवमीच्या दिनी दुपारी बारा वाजता आनंदाने उत्साहाने साजरा केला जातो. प्रभू श्री रामनामाने सर्व भक्तांच्या पापांचा नाश होतो ,सर्व इच्छा पूर्ण होतात ,सर्व अवयवांचे रक्षण होते, मनुष्यास सुख, विजय ,सर्व कार्य सिद्धी प्राप्त होते . दुःख आणि संकटांचा नाश होऊन मुक्ती मिळते. रामरक्षा मध्ये प्रभू श्री रामचंद्र अनेक नावांनी संबोधले आहेत प्रत्येक नाव हे वैशिष्ट्यपूर्ण अर्थपूर्ण आहे जसे लोकाभिराम, रणरंगधीर, जितेंद्रिय, रघुवंशी , कारुण्यमूर्ती, करुणाकार ,पुराणपुरुषोत्तम, जानकी वल्लभ ,रामभद्र ,रामचंद्र, प्रजापती ,राघव ,रघुनाथ, रघुनंदन इत्यादी. राम नामाची ताकद सांगताना राम नाम हे विष्णूच्या हजार नावाच्या जपा इतके समान आणि पुण्यकारक आहे असे महादेवांनी पार्वतीला राम नामाचे महत्त्व पटवून देताना सांगितले रामरक्षा मधील सर्वात शेवटचा श्लोक जसे " राम रामेती रामेती रमे रामे मनोरमे, सहस्त्रनाम तत्तुल्य राम नाम वरानने,". खरे पाहता श्रीराम प्रभूंच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून जीवन जगण्याचा प्रयत्न केला तर मानवी जीवन सुख समृद्धीने परिपूर्ण होईल. आदर्श पुत्र कसा असावा, भाऊ कसा असावा, राजा कसा असावा इत्यादी हे श्रीराम प्रभूंच्या कार्य आदर्श यावरून लक्षात येते प्रत्येक नात्यांमधील मर्यादा ठेवून सर्वगुणसंपन्न आदर्श असल्याने मर्यादा पुरुषोत्तम प्रभू श्रीरामचंद्रांचा वास चराचरात आहे जसे परभ्रम, चैतन्य, सत्संग, आनंद , त्रिभुवन तारक, सुखकर्ता ,श्रद्धा, शांती, सबुरी, चैतन्य, पुरुषोत्तम, भक्ती भाव, सगुण सुंदर, निर्गुण सुंदर ,लावण्याच्या गाभ्यात, आत्म्याठाई , जे जे मंगल, कर्तव्याचे पालन, स्वानंदाच्या ठाई ,सुंदर शब्दात, सुंदर सुरात, सकलजीवांच्या ठाई, वात्सल्याच्या स्वरूपात, हनुमंताच्या हृदयात इत्यादी मध्ये चराचरात राम आहे त्यांच्या नामस्मरणाने आणि भक्तीने आपल्याला राम प्राप्त करता येतो."श्रीराम जय राम जय जय राम " ..

- सो .अश्विनी वासुदेवराव टेकाळे. ( जोशी)बीड.

# घरातून निघून गेलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा शोध घेवून घरी पाठविण्यात पोलिसांना यश

तभा. वृत्तसेवा

**बीड** | मागील दोन महिन्यांच्या कालावधीत घरातून निघून गेलेल्या तीन अल्पवयीन मुलींचा शोध घेऊन त्यांचे समुपदेशन करून सुरक्षितपणे घरी परत पाठवण्यात बीड शहर पोलिसांना यश आले आहे.

यातील तिसऱ्या मुलीचा शोथ नांदेड शहरातून घेण्यात आला. विशेष बाब म्हणजे संबंधित मुलगी स्वतः मोबाईल वापरत नव्हती, त्यामुळे तिचा मागोवा घेणे अत्यंत आव्हानात्मक ठरले. मात्र, एका अनोळखी व्यक्तीचा मोबाईल वापरून तिने इंस्टाग्रामवरून एका मित्राला संदेश पाठवला होता. त्या मित्रालाही तिची ओळख नव्हती, त्यामुळे तपास अधिक गुंतागुंतीचा झाला.

सदर संदेशात तिने नांदेड येथे असल्याचे संकेत दिले होते. त्यानुसार नांदेड पोलिसांची मदत घेऊन शोधमोहीम राबविण्यात आली. स्थानिक




माहितीदारांच्या मदतीने ती एका विद्यार्थिनीच्या रूमवर राहत असल्याची माहिती मिळाली आणि पोलिसांनी तत्काळ कारवाई करून मुलीला ताब्यात घेतले.

मुलगी शोधल्यानंतर तिचे कुटुंबाशी पुनर्मिलन करून घरी परत पाठवणे हे आणखी मोठे आव्हान असते. अनेक वेळा मुली घरच्यांविरुद्ध बंड करून शासकीय वसतिगृहात राहण्याचा पर्याय निवडतात. अशा वेळी पोलिस आणि बालकल्याण विभाग यांची भूमिका अत्यंत महत्त्वाची ठरते.

बीड शहर पोलिसांनी प्रभावी समुपदेशन व समन्वय साधून तीनही मुलींची यशस्वी घरवापसी केली आहे.

तपासादरम्यान असे निदर्शनास आले की, किशोरवयीन मुलींसोबत पालकांनी संवाद साधताना समजून घेण्याऐवजी कठोर भूमिका घेतली जाते. योग्य संवादाचा अभाव, तसेच सोशल मीडियाचा प्रभाव यामुळे मुली घरापासून दूर जाण्याची शक्यता वाढते. याबाबत पालकांनी सतर्क राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कावत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. वेंकटराम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, पोलीस उपनिरीक्षक महेश जाधव, पोलीस अंमलदार गहिनीनाथ बावनकर, मंगेश शिंदे, राम पवार यांनी यशस्वीरीत्या पार पाडली.

# अंधश्रद्धा-बुवाबाजी-सत्ताच्या संगनमताने 'महिलांचे शोषणा'विरोधी कठोर कारवाई व्हावी

## मुख्यमंत्र्यांना 'मअंनिस' बीड शाखेचे निवेदन




तभा. वृत्तसेवा

**बीड** | नाशिक येथे उघडकीस आलेल्या भोंदू अशोक खरात प्रकर णाकडे केवळ त्या एका व्यक्तीच्या गुन्ह्याच्या रुपात पाहणे,ही मोठी चूक ठरेल.अंधश्रद्धा,सत्ता,संपत्ती,बुवाबाजी,ज्योतिष्य, व 'तथाकथीत अध्यात्म व दैवी शक्तीच्या' अतिशय धोकादायक संगनमताचे हे राज्याला हादरवून सोडणारे गंभीर उदा. आहे. करिता,या व अशा प्रकरणांची चौकशी केवळ आरोपीपुरती मर्यादित न ठेवता,त्या मागील संपुर्ण जाळ्याचा शोध घेण्याबाबत महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ,बीड शाखेच्या वतीने विवेक वाहिनीच्या राज्य कार्याध्यक्ष प्राचार्य सविता शेटे यांच्या नेतृत्वाखाली राज्याच्या मा.मुख्यमंत्री महोदयांना मा.जिल्हाधिकारी यांचे मार्फत निवेदन पाठविले असल्याची माहिती जिल्ह्याचे उपाध्यक्ष प्राचार्य कॉ डी जी तांदळे यांनी दिली आहे.

यासंबंधाने अधिक माहिती अशी की,समाजातील असुरक्षीतता,अशाश्वत जीवन,भिती,अंध श्रद्धा,व विविध समस्यांचा गैरफायदा घेत 'तथाकथीत फल ज्योतिष्य,अध्यात्म,दैवी शक्ती'च्या नावाखाली महिलांचे व जनतेचे भयंकर शोषण कसे केले जाते,याचे खरात प्रकरणामुळे चिंताजनक व संतापजनक चित्र पुन्हा समोर आले आहे. म्हणून,सदर प्रकरणाची निष्पक्ष,निर्भय,पारदर्शक चौकशी करून सर्व संबंधितांना कठोर शासन होईल,अशी हमी निर्माण व्हावी.

# आंबेजोगाईच्या कन्येची आर्मी स्पोर्ट इन्स्टिट्यूट येथे शिक्षणासाठी झाली निवड

## तलवारबाजी क्रीडा प्रकारामध्ये मिळवले नैपुण्य

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | अंबाजोगाई येथील कु. निशिगंधा नितीन गायकवाड हिने आपल्या उत्कृष्ट क्रीडा कामगिरीच्या जोरावर पुणे येथील Army Sports Institute मध्ये आर्मी गर्ल्स स्पोर्ट्स कंपनी (AGSC) साठी झालेल्या निवड प्रक्रियेत यश संपादन करत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. निशिगंधा ही इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेत असून ती छत्रपती संभाजीराजे ग्लोबल स्कूल, अंबाजोगाई येथील विद्यार्थिनी आहे. तलवारबाजी (Fencing) या क्रीडा प्रकारात तिने शालेय स्तरावर जिल्हा स्तरावर




सुवर्णपदक, विभागीय स्तरावर कांस्यपदक तसेच राज्यस्तरावर सुवर्णपदक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

पुणे येथील आर्मी स्पोर्ट्स इन्स्टिट्यूटमध्ये आयोजित करण्यात आलेल्या या निवड प्रक्रियेत देशभरातील खेळाडूंनी सहभाग घेतला होता. सदर निवड प्रक्रिया तीन दिवस चालणारी असून त्यामध्ये कागदपत्र पडताळणी, क्रीडा कौशल्य चाचणी, शारीरिक क्षमता चाचणी, वैद्यकीय तपासणी तसेच अंतिम निर्णय प्रक्रियेचा समावेश होता. या सर्व टप्प्यांमध्ये निशिगंधाने उत्कृष्ट कामगिरी करत अंतिम निवड निश्चित केली.

या संस्थेमार्फत निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वयाच्या १८ वर्षांपर्यंत आंतरराष्ट्रीय दर्जाचे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत दिले जाते. तसेच राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर पदक मिळविल्यास भारतीय सैन्यात हवालदार पदावर नियुक्तीची संधी उपलब्ध होते. शिक्षणासोबतच उच्च दर्जाचे क्रीडा प्रशिक्षण देणारी ही संधी अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाते.

निशिगंधा ही तालुका कृषी अधिकारी कार्यालयात सहाय्यक कृषी अधिकारी म्हणून कार्यरत असलेले नितीन गायकवाड यांची कन्या आहे. तिच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून कौतुक होत असून अंबाजोगाई तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

# सावरकर महाविद्यालयात पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ

## शिक्षणाचा वापर समाजाच्या प्रगतीसाठी करावा : पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत

तभा. वृत्तसेवा

**बीड (प्रतिनिधी)** | आपण जे शिक्षण घेतलेले आहे त्याचा उपयोग राष्ट्राच्या प्रगतीसाठी करावा. आपण देशासाठी काय करू शकतो हा विचार नेहमी समोर ठेवून वाटचाल केली पाहिजे असे प्रतिपादन जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी केले. येथील स्वातंत्र्यवीर सावरकर महाविद्यालयामध्ये आयोजित पदवी वितरण समारंभाच्या प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून ते मार्गदर्शन करत होते. व्यासपीठावर संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, मुख्य प्रशासकीय अधिकारी प्रा. चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, उपप्राचार्य डॉ. लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, परीक्षा विभाग प्रमुख डॉ सचिन कंदले,



विद्यार्थी विकास मंडळाचे प्रभारी डॉ. गंगाधर उषमवार, विभाग प्रमुख डॉ. सोपान सुरवसे, डॉ. रमेश खंडागळे यांची उपस्थिती होती. पुढे बोलताना पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत म्हणाले की पुस्तकी शिक्षणा बरोबरच मूल्य आधारित शिक्षणही महत्वाचे आहे. प्रत्येक तरुणाने आपल्या शिक्षणाचा उपयोग देशाच्या प्रगती साधण्यासाठी करावा यातून एक चांगली पिढी घडवल्याचे समाधान मिळेल. चांगल्या गुणांचा अंगीकार करून आपले व्यक्तिमत्व कसे अधिक प्रभावी निर्माण होईल यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य म्हणाले की पदवी शिक्षण आपण घेतले आहे. आता आपली जबाबदारी ही वाढली आहे. देशाचे आपण जबाबदार नागरिक झालो आहोत. आपल्याकडून समाजाच्या अनेक अपेक्षा आहेत. समाजाचे उन्नतीसाठी प्रत्येकाने प्रयत्न करण्याची गरज आहे. शिक्षित समाज झाला तर राष्ट्राच्या प्रगतीला हातभार लागतो असे ते म्हणाले.

# बीड जिल्ह्यात महिला बचत गटांसाठी 'कृषी अवजार बँका' स्थापनेसाठी अनुदान

तभा. वृत्तसेवा

**बीड** | बीड जिल्ह्यातील महिला बचत गटांना शेती व्यवसायातून आर्थिक समृद्धीकडे नेण्यासाठी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या (पोकरा) दुसऱ्या टप्प्यांतर्गत 'कृषी अवजार बँका' स्थापन करण्यासाठी २४ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येत आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुभाष साळवे यांनी सांगितले की, या योजनेसाठी पात्र गटांना प्रकल्पाच्या एकूण मूल्याच्या ६० टक्क्यांपर्यंत अर्थसाहाय्य मिळणार आहे. उमेद, माविम किंवा आत्मा पुरस्कृत महिला बचत गटांना ५ एप्रिलपर्यंत पोकराच्या अधिकृत पोर्टलवर ऑनलाइन अर्ज सादर करता येईल.

योजनेत सहभागी होणाऱ्या गटात वेगवेगळ्या कुटुंबांतील किमान १० सदस्य असणे अनिवार्य आहे. एका गावातून केवळ एकाच महिला गटाची निवड लॉटरी पद्धतीने केली जाईल.

अनुदानातून ट्रॅक्टर, पेरणी व कापणी यंत्रे, कम्बाइन हार्वेस्टर यांसारखी आधुनिक कृषी अवजारे खरेदी करता येतील. तसेच ज्या प्रकल्पांचे मूल्य २० लाखांपेक्षा जास्त असेल, त्यांना राष्ट्रीयीकृत बँकेकडून ७५ टक्के कर्ज घेणे बंधनकारक राहील.

प्रशासनाकडून महिलांना आत्मनिर्भर होण्याच्या या संधीचा लाभ घेण्यासाठी स्थानिक कृषी कार्यालयाशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# लेखिका बेबीसरोज अंबिलवादे यांचा ग्रामीण सोनार संघटनेकडून सन्मान

तभा. वृत्तसेवा

**बीड** | लेखिका व कवयित्री बेबीसरोज अंबिलवादे यांचा ग्रामीण सोनार संघटनेच्या वतीने शॉल,श्रीफळ, सन्मानचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

नोकरी करत असतांना वृत्तपत्रात रेंगळणा-या हाताने मला नकळत लिहायला शिकविले अन् पाहता पाहता माझी पाच पुस्तके प्रकाशित झाली या पुस्तकांना विविध पुरस्कार मिळाले पण माझ्या समाजाकडून माझ्या साहित्याची दखल घेऊन माझा हा सन्मान केला तो माझ्यासाठी भाग्याचा क्षण ठरला.

टाकळीभान येथील ग्रामीण सोनार संघटनेचे अध्यक्ष मधुकर मैड यांच्या अध्यक्षतेखाली जागतिक महिला दिनाचे औचित्या साधून विविध क्षेत्रात गौरवशाली परंपरा असलेल्या सोनार समाजाचे भारताच्या




सांस्कृतीक, सामाजिक, शैक्षणिक, औद्योगिक, साहित्यीक आणि राजकीय क्षेत्रात ठसा उमटवणा-या महिलांचा यावेळी गौरव करण्यात आला.

समाजातील महिलांचा सन्मान व्हावा हा विचार रुजवणारे सत्यानारायण उदांवत, सेवानिवृत कर्मचारी जालना यांनी माझ्या प्रकाशित साहित्याची दखल घेऊन तसेच समाजासाठी नेहमी हिरिरीने काम करुन समाजात काम करणा-या अनेक उपेक्षित महिलांना सन्मान मिळवून दिला.

या कार्यक्रमास पुणे,मुंबई,नागपूर,धाराशिव, बीड,जालना,परभणी, बार्शी या जिल्हयातुन समाजिक कार्यकर्ते, उपस्थित होते.

हा सन्मान मिळाल्याबद्दल लेखिका बेबीसरोज अंबिलवादे यांचे मनिषा अंबिलवादे,रेवती लाबडे, सुरेश महाजन, सावता गुंजाळ, संध्या टाकळीकर,कुसूम पेकम तसेच राजकीय सामाजिक,साहित्यीक,शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी व पत्रकारांनी अभिनंदन केले आहे.

# मानमोडी येथे धाडसी दरोडा; आठ ते दहा लाखाचा ऐवज लंपास

**गेवराई** | दोन बंगल्यांमध्ये घुसून चोरट्यांनी रोख रकमेसह सोन्याचे दागिने असा आठ ते दहा लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना सोमवारी मध्यरात्री मानमोडी येथे घडली.

मानमोडी गावापासून हाकेच्या अंतरावर मादळमोही रस्त्यावर मधुकर यमाजी येवले व बापूसाहेब यमाजी येवले या सख्ख्या भावांचे शेतात शेजारी-शेजारी दोन बंगले आहेत. सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी दोन्ही घरांचे दरवाजे उचकटून आत प्रवेश केला. घरातील कपाटांची तोडफोड करून नगदी सुमारे तीन लाख रुपये तसेच सोन्याचे दागिने असा मोठा ऐवज चोरट्यांनी लंपास केला. मंगळवारी सकाळी ही घटना उघडकीस आल्यानंतर तात्काळ गेवराई पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. दरम्यान श्वान पथक व फिंगरप्रिंट पथकही घटनास्थळी दाखल झाले असून संशयितांचा शोध सुरू आहे. गेल्या काही दिवसांत ग्रामीण भागात चोरीच्या घटना वाढत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# बीड जिल्ह्यासाठी 1.20 लाख लिटर रॉकेल मंजूर

**बीड** | देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेल्या तीव्र गॅस टंचाईवर मात करण्यासाठी बीड जिल्ह्यासाठी १.२० लाख लिटर रॉकेल (केरोसिन) साठा मंजूर करण्यात आला आहे. हा साठा जिल्ह्यातील १९७७ स्वस्त धान्य दुकानांमार्फत वाटप केला जाणार आहे, ज्यामुळे सुमारे ५ लाख रेशन कार्डधारकांना मोठा दिलासा मिळणार आहे. मागील ९ वर्षांपासून बंद असलेले रॉकेल वितरण पुन्हा सुरू झाल्यामुळे नागरिकांना आता गॅस सिलिंडरसाठी महिनाभर प्रतीक्षा करावी लागणार नाही.

# श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स येथे सृजन-2026 महोत्सवाचे आयोजन

## मराठवाड्याच्या विविध जिल्ह्यांतील 210 हून अधिक विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग

तभा. वृत्तसेवा

**अंबाजोगाई** | येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ऍण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, अंबाजोगाई यांच्या वतीने सृजन-२०२६ हा माहिती - तंत्रज्ञानावर आधारित विभागीयस्तरावरील एकदिवसीय तांत्रिक परिसंवाद उपक्रम मंगळवार, दिनांक २४ मार्च २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

या उपक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञ डॉ.राजेश इंगोले (अंबाजोगाई) यांच्या हस्ते व श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स ऍण्ड इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी महाविद्यालयात संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, सौ.डिंपल मोदी, प्राचार्य डॉ.बी. आय.खडकभावी, उपप्राचार्य प्रा.वसंतराव चव्हाण, प्राचार्य डी.एच.थोरात, प्रा.राघवेंद्र राजमान्य, समन्वयक डॉ.व्ही. एस.हमदे आणि सहसमन्वयक प्राचार्य डॉ.तपस्या गुप्ता-परदेशी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध विज्ञान विषयक, माहिती तंत्रज्ञानावर आधारित उपक्रम सातत्याने राबविण्यात येतात. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून सृजन-२०२६ विभागीय




स्तरावरील एकदिवसीय तांत्रिक परिसंवाद मोदी लर्निंग सेंटर, रिंग रोड, अंबाजोगाई येथे आयोजित करण्यात आला होता. यात पोस्टर प्रेझेंटेशन, प्रोग्रॅमिंग कंटेस्ट ऑन सी व स्पॉट वेब डिझाईन युजिंग एआय हे तीन इव्हेंट ठेवण्यात आले होते. यात बी.एससी, बीसीएस, बी.कॉम, बीसीए आणि संगणकाशी संबंधित शाखेचे विद्यार्थी सहभागी झाले. विषय आणि नियमावली तयार करून प्रत्येक फॅकल्टीच्या समन्वयक आणि सहसमन्वयक यांना पोस्टर प्रेझेंटेशन इव्हेंटसाठी परीक्षक म्हणून प्रा. आर.ए.वेदपाठक (अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई), प्रा.डॉ.तृप्ती पाडेकर (खोलेश्वर महाविद्यालय, अंबाजोगाई), प्रोग्रॅमिंग कंटेस्ट ऑन सी इव्हेंटसाठी परीक्षक म्हणून प्रा.प्रतिक्षा पाटील (योगेश्वरी पॉलिटेक्निक, अंबाजोगाई) आणि स्पॉट वेब डिझाईन युजिंग एआय इव्हेंटसाठी परीक्षक म्हणून प्रा. वर्षाराणी गोरे (अभियांत्रिकी महाविद्यालय, अंबाजोगाई) यांचे सहकार्य लाभले. त्यांना सर्व युनिट प्रमुख यांचे सहकार्य लाभले. यावेळी बोलताना डॉ.व्ही.एस.हमदे व प्राचार्य डॉ.तपस्या गुप्ता परदेशी यांनी सांगितले की, श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या दुदृष्टीतून सृजन-२०२६ ही संकल्पना राबविण्यात येत आहे. कारण, विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान विषयांतील माहिती केवळ आपल्या महाविद्यालयापुरतीच अवगत न होता. अन्य जिल्ह्यांतील महाविद्यालये तसेच तेथील प्राध्यापकवृंदांकडून देखील अवगत केल्या जाऊन आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थी हा त्या-त्या विषयात निपुण व्हावा ही यामागची खरी कल्पना असल्याचे संकेत मोदी यांच्यामुळे शक्य होत आहे असे सांगितले. तर यावेळी बोलताना डॉ.राजेश इंगोले म्हणाले की, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला चालना देणारा ठरला असून, भविष्यातही असे उपक्रम आयोजित करण्याचा संकेत राजकिशोर मोदी आणि महाविद्यालयाचा मानस हा संस्थेला नव्या उंचीवर घेवून जाणारा आहे असे डॉ.इंगोले यांनी नमूद केले.

याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी सृजन-२०२६ अंतर्गत तीन इव्हेंट मध्ये सहभाग घेतल्याबद्दल श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक सचिव राजकिशोर मोदी यांनी सर्व सहभागी विद्यार्थ्यांचे कौतुक करून त्यांना शुभेच्छा दिल्या व पोस्टर प्रेझेंटेशनची पाहणी करून इव्हेंट सादर करणार्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. कार्यक्रमाच्या शेवटी सृजन-२०२६ या माहिती व तंत्रज्ञान विषयी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना रोख स्वरूपातील पारितोषिके प्रदान करण्यात आली. या उपक्रमात श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या सर्व विभागप्रमुख, प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. या उपक्रमाला लातूर, बीड, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर, अंबाजोगाई आणि परभणी यासह विविध जिल्ह्यांतील १० ते १२ नामांकित महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी यात मोठ्या प्रमाणावर सहभाग घेऊन हा उपक्रम यशस्वी केला.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# जिल्ह्यातील २१ आदर्श ग्रामसेवकांचा जिल्हा परिषदेत सत्कार



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**
कामाची पावती म्हणून ग्रामसेवक यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार दिला जातोय याचा मला आनंद आहे, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी आज येथे केले.
येथील षटकोणी सभागृहात ग्रामपंचायत विभागामार्फत उत्कृष्ट व आदर्श कार्य करणाऱ्या ग्रामसेवकांचा सन्मान सोहळा मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.
यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर मांडे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) समृद्धी दिवाने, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) केशव गड्डापोड उपशिक्षणाधिकारी संदिपकुमार सोनटक्के यांच्यासह गटविकास अधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते.
ग्रामसेवकांनी गाव पातळीवर चांगल्या सेवा दिल्यास वेळेत लोकांची कामे पूर्ण केल्यास लोकांच्या तक्रारी आपोआप कमी होतात असे श्री. गायकवाड यावेळी म्हणाले. ग्रामपंचायत पातळीवर काम करत असताना आपण आपले काम प्रामाणिकपणे व लोकांना समाधान मिळेल, असे काम करण्याचे आवाहन त्यांनी उपस्थितांना केले. वंदे मातरम गीताला दीडशे वर्षे पूर्ण झाले असून २३ मार्चपासून वंदे मातरम गीताबाबत ग्राम पंचायत,शाळा, महाविद्यालयात जनजागृती करण्यात येत आहे. ग्राम स्तरावरील नागरिकांच्या तक्रारीचे निवारण करण्यासाठी व्हाट्सअप चॅटबोटसह अंतर विभागीय समन्वय पोर्टल विकसित करण्यात आले असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गायकवाड यांनी सांगितले.
हिंगोली मध्ये हळदीच्या उत्पादनाला बचत गटाच्या माध्यमातून पिवळे सोनं म्हणून प्रोडक्शन केले आहे.
यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी दिगंबर मंडे,उपमुख्य कार्यकारी अधिकारी समृद्धी दिवाने यांनीही समयोचित भाषण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उप मुख्य कार्यकारी अधिकारी केशव गडापोड यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते दीपप्रज्वलन तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमा पूजनाने करण्यात आली.
यावेळी ग्रामपंचायत पातळीवर उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामसेवक यांना मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रम यशस्वितेसाठी लक्ष्मीकांत क्षीरसागर व दत्ता वाघ यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी व ग्रामपंचायत अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मतदार मॅपींग कामकाजाचा जिल्हाधिकाऱ्यांकडून आढावा




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**
आगामी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण-२०२६ कार्यक्रमाच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने हिंगोली जिल्ह्यातील मतदार यादीतील मतदारांचे सन २००२ मधील मतदारांशी मॅपिंग तसेच मॅपिंगच्या प्रगतीबाबत आज जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेतला.
भारत निवडणूक आयोगाकडून लवकरच मतदार यादीचा विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रम जाहीर होणार असून, त्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रांवर मतदार मॅपिंगचे काम दि. २० जानेवारी २०२६ पासून सुरू करण्यात आले आहे. सद्यस्थितीत ९२-वसमत विधानसभा मतदारसंघात ८०.२८ टक्के, ९३-कळमनुरीमध्ये ७८.८७ टक्के तर ९४-हिंगोलीमध्ये ७४.३७ टक्के मॅपिंग पूर्ण झाले असून जिल्ह्याचा एकूण प्रगतीदर ७७.८० टक्के आहे.
मतदार मॅपिंगचे काम गतिमान करण्यासाठी सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांनी टेबल-टॉप ॲक्टिव्हिटीच्या माध्यमातून जास्तीत जास्त मतदारांची नोंदणी व पडताळणी करणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मात्र, ५५ टक्क्यांपेक्षा कमी प्रगती असलेल्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांचा आढावा जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी राहुल गुप्ता यांनी आज जिल्हा नियोजन समिती सभागृहात आढावा घेतला.
यावेळी जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी एसआयआर-२०२६ च्या अनुषंगाने सविस्तर मार्गदर्शन करून मतदार मॅपिंगचे काम दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश दिले. तसेच बैठकीस अनुपस्थित राहणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या सूचना संबंधित उपविभागीय अधिकारी तथा मतदार नोंदणी अधिकारी आणि तहसीलदार तथा सहाय्यक मतदार नोंदणी अधिकारी यांना देण्यात आल्या. सन २००२ व सन २०२४ च्या मतदार यादीतील नोंदींचे मॅपिंग सुलभ व्हावे यासाठी नागरिकांनी आपली वैयक्तिक माहिती, विशेषतः विवाहित महिलांनी माहेरच्या कुटुंबाची माहिती, संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी मतदारांना केले आहे.

# जिल्हाधिकाऱ्यांकडून आरोग्य विभागाचा आढावा



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**
जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी राष्ट्रीय क्षयरोग कार्यक्रमाचा आरोग्य विभागाकडून आज जिल्हाधिकारी कार्यालयात सविस्तर आढावा घेतला.
या बैठकीस जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. देवेंद्र जायभाये, डॉ. विशाल पवार, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सतीश रुणवाल, डॉ. गजानन चव्हाण, डॉ. गणेश जोगदंड, डॉ. संदीप काळे, जिल्हा साथरोग वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रकाश जाधव, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक शंकर तावडे तसेच जिल्हा लेखा व्यवस्थापक श्रीपाद गारुडी उपस्थित होते.यावेळी जिल्हाधिकारी गुप्ता यांनी १५ व्या वित्त आयोगांतर्गत आर्थिक कामकाजाचा लेखाजोखा तपासला. तसेच विविध आरोग्यविषयक बांधकामांचा आढावा घेत कामे विहित वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना आरोग्य यंत्रणेला दिल्या. एचपीव्ही लसीकरण मोहिमेचाही आढावा घेत, पालकांचे समुपदेशन करून लसीकरणाचे महत्त्व पटवून देण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.
जागतिक क्षयरोग दिनानिमित्त जिल्हाधिकारी श्री. गुप्ता यांनी उपस्थितांना 'टीबी मुक्त' भारताची शपथ दिली तसेच 'टीबी मुक्त भारत' अभियानांतर्गत १०० दिवसीय क्षयरुग्ण शोध मोहिमेची सुरुवात करण्यात आली.



हिंगोली- येथील रामलीला मैदानावर मागील आठवडाभरापासून आंतरराष्ट्रीय ख्यातीचे भागवत कथाकार प पू रमेशभाई ओझा यांनी श्रीमद् भागवत कथाचे वाचन केले. या कथेचे आयोजन श्री गजराज बाल गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी केले होते. उत्कृष्ट नियोजनाबद्दल प पू रमेशभाई ओझा यांनी पदाधिकाऱ्यांचा सत्कार केला. यावेळी सर्व पदाधिकारी उपस्थित होते. छाया- सुनील पाठक

## संक्षिप्त वृत्त

### क्षयरोग शोध मोहीमेचे उद्घाटन

हिंगोली- जिल्हा परिषद हिंगोली येथे आज जागतिक क्षयरोग दिन साजरा करून मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या हस्ते एक्स-रे व्हॅनला हिरवी झेंडी दाखवून टीबी मुक्त भारत अभियान अंतर्गत १०० दिवसीय क्षयरुग्ण शोध मोहीम अभियानाची सुरुवात करण्यात आली. १७८ जोखीम ग्रस्त गावामध्ये एक्स-रे व्हॅन मार्फत एक्स-रे काढून तपासणी करण्यात येणार आहे. यावेळी टी बी मुक्तची शपथ यावेळी देण्यात आली. आपला हिंगोली जिल्हा टी बी मुक्त करण्याण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन समन्वय ठेवून प्रयत्न करण्याच्या सूचना यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी देऊन अभियान यशस्वी राबविण्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा. प्र.) समृद्धी दिवाने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलास शेळके, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ देवेंद्र जायभाये, वैद्यकीय अधिकारी डॉ अभिजित बांगर, प्रशासकीय अधिकारी विठ्ठल भुसारे, जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी पोले,जिल्हा परिषद येथील कर्मचारी व जिल्हा क्षयरोग केंद्र येथील रवींद्र घुगे जिल्हा पी पी एम समन्वयक बालाजी उबाळे, कार्यक्रम सहाय्यक पुंडगे,पर्यवेक्षक श्री दुधाडे, कुलकर्णी, पटीशन बनसोड, क्षयकिरण तंत्रज्ञ लोखंडे, डोल्हारे, माने, बोरकर, जाधव इतर कर्मचारी उपस्थित होते.

### जिपच्या व्हॉटस्ॲप चॅटबोटचे उद्घाटन

हिंगोली- मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांच्या संकल्पनेतून अंतर विभागीय समन्वय पोर्टल व व्हॉट्सॲप चॅटबोट सेवेचा आज प्रारंभ येथील षटकोनी सभागृहात करण्यात आला. तर विभागीय समन्वय पोर्टल हे तालुकास्तर व ग्रामस्तरावरील अधिकारी व कर्मचारी यांच्या समस्या, मागणी व तक्रारींचे निवारण करण्यासाठी विकसीत करण्यात आले. ग्रामस्तरावरील अधिकारी ग्रामसेवक, अंगणवाडी ताई, मुख्याध्यापक, आरोग्य सहायक व जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणांना तर अधिकारी गट विकास अधिकारी, तालुका आरोग्य अधिकारी, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, पशुसंवर्धन अधिकारी, गट शिक्षणधिकारी यांना आणि जिल्हास्तरावरील अधिकारी संबंधित विभाग प्रमुखांना फायदा होणार आहे. जिल्हा परिषद हिंगोलीचे व्हॉट्सॲप चॅटबोट विकसित करण्यात आले असून, यामध्ये नागरिकांना जिल्हा परिषदेच्या विविध योजना व सोयी सुविधा घरबसल्या मिळाव्यात, यासाठी ८०८०४६७६१४ या व्हॉट्स अँप क्रमांकावर उपलब्ध राहतील. या मध्ये प्रमुख्याने जिल्हा परिषदेबद्दल इत्यंभूत माहिती तसेच केंद्र, राज्य शासन पुरस्कृत योजना, जि प सेस योजनांची संपूर्ण माहिती सोप्या पध्दतीने मिळू शकेल.या व्हॉट्सॲप चॅटबोटचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड यांनी केले आहे.

### ५९ वाहन चालकांविरूध्द पोलिसांची कारवाई

हिंगोली- अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ५९ वाहन चालकांविरूध्द पोलिसांनी कारवाई करीत वाहन चालकांकडून ५२ हजारांचा दंड वसूल केला आहे तसेच जिल्ह्यात अवैध दारू विक्री करणाऱ्या ८ ठिकाणी पोलिसांनी छापे मारून मुद्देमाल जप्त करीत आरोपींताविरूध्द दारू बंदी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल केले आहेत.

# संसारातून मुक्तीचा मार्ग हरिकथेमध्येच- प पू रमेशभाई ओझा






**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**
येथे सुरू असलेल्या श्रीमद भागवत कथे दरम्यान प्रख्यात कथाकार प. पू. भाईश्री रमेशभाई ओझा यांनी जीवन, धर्म आणि अध्यात्म यावर अत्यंत मार्मिक वर बोलताना म्हणाले, संसाराच्या बंधनातून मुक्त व्हायचे असेल तर हरिकथा श्रवण करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन त्यांनी मंगळवारी येथे केले. बुधवार दि २५ मार्च रोजी श्रीमद् भागवत कथेचा समारोप झाला असून महाप्रसादाचा लाभ अनेक भाविकांनी घेतला.
सनातन धर्माचे तत्त्वज्ञान स्पष्ट करताना त्यांनी सांगितले की, मानवाचे शरीर हे नश्वर असून त्यातून मलमूत्र निर्माण होते, त्यामुळे शरीरावर अभिमान न ठेवता आत्मिक शुद्धतेकडे लक्ष द्यावे. पूजा-अर्चा करताना देखील शरीरातील अपवित्रतेची जाणीव ठेवून नम्रता आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.
आयुर्वेदाचा खरा अर्थ सांगताना भाईश्री म्हणाले की, आयुर्वेद हा केवळ रोग बरे करण्यासाठी नसून शरीराचे हित जपण्यासाठी आहे. भूक लागल्यानंतर अतिरेक न करता संयमाने आहार घ्यावा, अन्यथा शरीरात विकार निर्माण होतात, असेही त्यांनी स्पष्ट केले. मानवी जीवनातील भावनांवर भाष्य करताना त्यांनी राग, क्रोध टाळण्याचे आवाहन केले. कामवासना, इच्छा आणि भोग याकडे धर्माच्या चौकटीतून पाहणे गरजेचे आहे. धर्मपूर्वक पैसा कमवा आणि त्याचा सदुपयोग करा. मंदिरात सेवा करणाऱ्या पुजाऱ्यांना योग्य दक्षिणा देणे हीदेखील धर्माचीच कृती आहे, असे त्यांनी सांगितले.
यावेळी त्यांनी कथा ही केवळ मनोरंजनासाठी नसून जीवन घडविण्याचे साधन असल्याचे ठासून सांगितले. यासाठी त्यांनी एक मार्मिक उदाहरण दिले. रेल्वे प्रवासात एक वृद्ध व्यक्ती वारंवार खिडकीबाहेर हात करून काहीतरी टाकत असल्याचे पाहून एका तरुणाने विचारणा केली. त्यावर वृद्धाने बाहेर माकडांना चणे टाकतोय असे सांगितले. मात्र बाहेर माकडेच नसल्याचे लक्षात आणून दिल्यावर वृद्धाने मिश्कीलपणे हा माझा टाइमपास आहे असे उत्तर दिले.
या कथेद्वारे भाईश्रींनी तरुणांना संदेश दिला की, आयुष्यातील वेळ निरर्थक गोष्टींमध्ये वाया घालवू नका. हरिकथा, साधना आणि चांगल्या विचारांमध्ये वेळ घालवून जीवन समृद्ध करा.
कथेच्या माध्यमातून दिलेल्या या संदेशामुळे उपस्थित भाविकांमध्ये आध्यात्मिक जागर निर्माण झाली.
बुधवार दि २५ मार्च रोजी श्रीमद् भागवत कथेचा समारोप करण्यात आला. यावेळी मोठ्या संख्येने भाविकांनी उपस्थिती लावली. शेवटी महाप्रसादाचा लाभ हजारो भाविकांनी घेतला. आयोजकांकडून अतिशय शिस्तबध्द आणि चोख नियोजन करण्यात आल्यामुळे प. पू. रमेशभाई ओझा यांनी आयोजकांचा सत्कारही केला. एक आठवडा चाललेल्या श्रीमद् भागवत कथेमुळे शहरात भक्तीमय वातावरण निर्माण झाले. भाविकांनी कथा ऐकण्याचा आनंद घेतला.

# आंतरराज्य टोळीतील गुन्हेगाराला केली अटक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**
शहरात तिरूपती नगरा भागात घराला कुलूप लावून कुटुंबासह भोजनासाठी हॉटेलमध्ये गेलेल्या शिक्षकाचे घर फोडून अवघ्या १६ मिनीटात १० लाखांचा मुद्देमाल पळविला होता. या प्रकरणात पोलिसांनी आंतरराज्य टोळीतील एका गुन्हेगाराला मंगळवारी अटक केली आहे.
तिरूपती नगर भागातील शिक्षक विश्वजीत उगिले हे १० मार्च रोजी कुटुंबीयांसह काही अंतरावर असलेल्या एका हॉटेलमध्ये भोजनासाठी गेले होते. घराला कुलूप असल्याचा गैरफायदा घेत चोरट्यांनी कपाटातील सोन्या चांदीचे दागिने व रोख १ लाख रूपये असा सुमारे १० लाखांचा मुद्देमाल पळविला. ११ मार्च रोजी शहर पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला होता. पोलिस अधीक्षक निलाभ रोहन यांनी या गुन्ह्याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविला. स्थानिक गुन्हे शाखेने गोपनीय माहीती व तांत्रिक विश्लेषण केल्यानंतर यामध्ये आरोपी सय्यद सोहेल सय्यद सरवर रा बल्लागुडा हैद्राबाद याने चोरी केल्याचे स्पष्ट झाले. पोलिसांनी त्याला तेलंगणाा राज्यातून अटक केली. त्याच्याकडून २ लाख २८ हजार रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपी सोहेल हा तेलंगणा, आंध्र प्रदेश, महाराष्ट्रामध्ये गुन्हेगारी करणाऱ्या टोळीतील सदस्य असल्याचे प्राथमिक चौकशीत स्पष्ट झाले आहे. पोलिसांनी टोळीतील इतर आरोपींचा शोध सुरू केला आहे.

# शिवाजी महाविद्यालयात कवीसंमेलन रंगले




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २५ मार्च**
श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ हिंगोली संचलित शिवाजी महाविद्यालयात महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात आलेल्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले समाज-सेवा पुरस्काराच्या मानकरी उद्योजिका, सामाजिक कार्यकर्त्या, जिजाऊ ब्रिगेड राष्ट्रीय संघटक श्रीमती सुनिता मुळे, सुप्रसिद्ध हिंदी कवयित्री, हिंदी काव्य पुरस्कार विजेत्या सुमन गोपाल दुबे स्वामिनीयांच्या सत्कारासह हिंगोली येथील सुप्रसिद्ध कवी कवयित्री यांचे काव्य संमेलन संपन्न झाले. या समारंभाच्या अध्यक्षा श्री शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सौ. मंदाताई पवार, प्रमुख उपस्थिती पूर्व शिक्षणाधिकारी तथा संस्थापक शिवाजीराव पवार, मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेचे अध्यक्ष अशोक अर्धापुरकर, थवा प्रकाशनचे संचालक गोडाती काळे, साहित्यिक कलानंद जाधव, रतन आडे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रामदास मुक्ते, उपप्राचार्य डॉ. बाळासाहेब क्षीरसागर, कवयित्री संगीता चौधरी, पारिजात देशमुख, विजया पतंगे, राधिका देशमुख, अश्विनी देशमुख, कवी रघुवीर पतंगे, काळे यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.
यावेळी सुमन दुबे आणि सुनीता मुळे यांचा सत्कार करण्यात आला. यानंतर मराठवाडा साहित्य परिषद हिंगोली शाखेच्या वतीने नामवंत कवीचे काव्यसंमेलन संपन्न झाले. यात हिंगोली येथील सुप्रसिद्ध कवी कवयित्रींनी बहुविध रसातील काव्याचे अप्रतिम सादरीकरण केले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.बाळासाहेब क्षीरसागर यांनी केले .आभार प्राचार्य डॉ. रामदास मुक्ते यांनी मानले. सूत्रसंचालन साहित्यिक प्रा. धाराशिव वैजनाथराव शिराळे यांनी केले.
या समारंभासाठी महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक वृंद, संस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# लहान ग्रामपंचायतने घेतला गावात डिजे व भोंगे बंदीचा ठराव

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २५ मार्च-**

अर्धापूर तालुक्यातील लहान ग्रामपंचायतने ध्वनी प्रदूषणाची समस्या सोडविण्यासाठी विशेष ग्रामसभा घेऊन एक ठराव मंजूर केला आहे.या ठरावानुसार गावातील सर्व धार्मिक स्थळावरील भोंगे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे.तसेच मिरवणूकीत डीजे लाण्याधर बंदी घालण्यात आली आहे.या निर्णयामुळे ज्येष्ठ नागरिक , आजारी रुग्णांना व विद्यार्थ्यांना फायदा होणार असून गावातील सामाजिक वातावरण शांत राहण्यास मदत होणार असून आसा निर्णय घेणारी ही तालुक्यातील पहिली ग्रामपंचायत ठरली आहे.या निर्णयाची माहिती पोलीस ठाण्याला देण्यात आली आहे. पोलिस प्रशासनाने या निर्णयाचे स्वागत केले आहे .

तालुक्यातील लहान ग्रामपंचायतची जिल्ह्यात स्मार्ट व्हीलेज म्हणून जिल्ह्यात ओळख आहे.तसेच हैदराबाद मुक्ती संग्रामात लढ्यात या गावाचे खूप मोठे योगदान राहिले आहे .या गावातील महिलांनी दारुबंदीसाठी खूप मोठा लढा देऊन गावातील दारुचे दुकान बंद केले आहे.याच गावातील नागरिकांनी पुढाकार घेऊन धार्मिक स्थळांवरील भोंगे बंद करण्याचा निर्णय घेतला आहे .तसेच मिरवणूकीत वाजणाऱ्या कर्णकर्कश डीजे लावण्यावर बंदी घालण्याचा निर्णय घेतला आहे.

लहान ग्रामपंचायतीची विशेष ग्रामसभा घेण्यात आली होती.या ग्रामसभेत गावातील बसवेश्वर मंदिर, हनुमान मंदिर, दोन्ही दत्तमंदिर, बोधीसत्व बौद्ध विहार,प्रजापती जमा मशिद,संत गोरोबा काका मंदिर,, महाकाली दुर्गा मंदिर, व अन्य धार्मिक स्थळे या ठिकाणचे भोंगे बंद करण्याचा ठराव करण्यात आला आहे.तसेच साजरी होणारी शिव जयंती, डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती, गौतम बुद्ध जयंती, सर्व विजयी मिरवणूका, वाढदिसनिमित्ताने लावण्यात येणाऱ्या डीजेवर बंदी घालण्यात आली आहे.या ठरावाचे सुचक उप सरपंच शेख महेबुब आहेत तर अनुमोदक आनंदराव सटवाजी लोणे हे आहेत.या ठरावाचे माहिती व निवेदन पोलिसांना देण्यात आले आहे .या वेळी सरपंच सदशीव इंगळे, उपसरपंच शेख महेबुब, ग्रामसेवक रविकांत क्षिरसागर, ग्रामपंचायत सदस्य आनंदराव लोणे, मंगेश कुराडे, बसवेश्वर संस्थानाचे अध्यक्ष आवघुत वखरे,विलास स्वामी, केशवराव हरकरी, दत्त इंगळे, बालाजी शिवणकर, सतिश रणखांब, नितीन बोले, पोलिस पाटील आनंद इंगळे आदी उपस्थित होते.

**ज्येष्ठ नागरीक, रुग्णांना होणारा त्रास कमी करण्यसाठी बंदी : सरपंच इंगळे**

लहान गावातील ध्वनी प्रदूषण कमी व्हावे व विद्यार्थ्यांना, ज्येष्ठ नागरिक व रुग्णांना होणार त्रास कमी व्हावा यासाठी भोंगे व डीजे लावण्यावर बंदी घालण्याचा ठराव करण्यात आला आहे.याची माहिती पोलीसांना देण्यात आली आहे.आशी माहिती लहानचे सरपंच सदाशिव पाटील इंगळे यांनी बोलतांना दिली.

**लहान गावाचा आदर्श घ्यावा : पो. नि. कदम**

अर्धापूर तालुक्यातील लहान ग्रामपंचायतीने एक विशेष चांगला ठराव घेतला आहे.या डिजे व भोंगे बंदीच्या निर्णयामुळे गावातील ध्वनी प्रदुषण कमी होण्यासाठी मदत होणार आहे. लहान गावाचा आदर्श तालुक्यातील ईतर गावांनी घ्यावा असे आवाहन अर्धापूर पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांनी दैनिक तरुण भारत बोलतांना केले आहे.

# प्रभारी मुख्याधिकाऱ्यांचा मनमानी कारभार

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. २५ मार्च-**

हिमायतनगर येथील नगरपंचायतचा कारभार गेल्या अनेक दिवसांपासून मनमानी पध्दतीने सुरू असुन कार्यरत असलेले प्रभारी मुख्याधिकारी ताडेवाड हे कार्यालयात न राहता आपला कारभार अर्धापूर येथून पाहत असल्याचे दिसुन येत आहे. नगरपचायत मधील विकासाचे काम,तसेच टॅक्स वसुली , पाणीपुरवठा, स्वच्छता,यासह अनेक कामे रखडली आहेत. परंतू या कामावर देखरेख करणारे मुख्याधिकारी आपला कारभार मात्र मनमानी पद्धतीने करत अर्धापुर येथुन दुर्बीण द्वारे पाहत असल्याने ते कधीच कार्यालया मध्ये दिसुन येत नाही.एखाद्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांला विचारले असता ते दौऱ्यावर किंवा अर्धापुरला मिटींगला गेले एवढेच उत्तर देण्यात येते तोडेवाड हे अर्धापुर येथे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत असुन त्यांना हिमायतनगर येथील नगरपंचायत मुख्याधिकारी म्हणून प्रभार पद देण्यात आला आहे. परंतु ते या पदासाठी पात्र आहेत का असा प्रश्न निर्माण झाला आहे.ते अर्धापुर येथे नायब तहसीलदार म्हणून कार्यरत असुन त्यांचे ही या पदाकडे दुर्लक्ष होत आहे.कार्यालयीन दिवसांमध्ये दुरध्वनी क्रमांक बंद राहत असल्याने संपर्क कोणाकडे करावा असा प्रश्न सामान्य नागरीक करीत आहेत.मुख्याधिकारी यांच्या अधीनस्त असलेले कर्मचारी कामाची देखरेख करीत असल्यामुळे होत असलेली विकासाची कामे रामभरोसे सुरू आहे. त्यामुळे कायमस्वरूपी मुख्याधिकारी नगरपंचायतीला लाभला तर विकास कामांना खेळ बसणार नाही. अशी चर्चा नागरिकांत होत आहे.

# किनवट येथे सर्वधर्मीय सामूहिक विवाह मेळावा

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २५ मार्च-**

आशिष सेवाभावी संस्थेच्या वतीने सर्वधर्मीय सामूहिक विवाह मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा मेळावा रविवार दि. ३१ मे २०२६ रोजी कलावती गार्डन, किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे संपन्न होणार आहे.

या उपक्रमाचा उद्देश समाजातील सर्व घटकांतील गरजू कुटुंबांना आर्थिक दिलासा देत साध्या पद्धतीने विवाह सोहळे पार पाडणे हा आहे. सामूहिक विवाहामुळे अनावश्यक खर्चाला आळा बसून सामाजिक एकात्मता वाढण्यास मदत होते.

आणि मा. व्यंकटराव नेम्मानीवार (संचालक सरस्वती विद्यामंदिर किनवट), मा. ॲड. मिलिंद सर्पे (अध्यक्ष: सेक्युलर मोमेन्ट नांदेड), मा. डॉ. आनंद भालेराव (प्रा. संत भगवान बाबा कला व विज्ञान महा. बोधडी) आणि मा. ॲड. सुनील येरेकार (कायदेशीर सल्लागार) यांचे या मेळाव्याला सहकार्य व मार्गदर्शन लाभणार आहे.

मेळाव्यासाठी नोंदणी सुरू असून इच्छुक वधू-वरांनी आयोजकांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. या कार्यक्रमासाठी विविध पदाधिकाऱ्यांची समिती कार्यरत असून अध्यक्ष म्हणून अजय कदम, उपाध्यक्ष वसंत राठोड, सचिव मारोती गायकवाड, कार्याध्यक्ष लक्ष्मीपती दोनपेल्लीवार, सहसचिव अतुल दर्शनवाड, कोषाध्यक्ष लक्ष्मीकांत दराडे, संघटक प्रशांत कोरडे, सहसंघटक गौतम धावारे, डी. के. उमरेकर, प्रसिद्धी प्रमुख राजू गायकवाड, आकाश आळणे, सदस्य विशाल हलवले, संतोष गुरुले, कपिल कांबळे, प्रमोद मुनेश्वर, राहुल चिखलीकर, राजकुमार सूर्यवंशी, राजू कापुरे, बाळासाहेब कावळे, विजय कदम, नारायण सिंगर व नवीन जाधव यांच्यासह अनेक सदस्य परिश्रम घेत आहेत.



संयोजन समिती तर्फे विवाह सोहळा पार पाडण्यासाठी किनवट शहरातील प्रशस्त अशी कलावती गार्डन मंगल कार्यालयाचे नियोजन केले असून वधू वराना कपडे, चप्पल मणी मंगळसूत्र आणि जेवणाची सरोत्तम सोय करण्यात आलेली आहे अशी माहिती प्रसार माध्यमांशी बोलतांना आयोजक राजेंद्र शेळके यांनी सांगितले तरी सदरील सामाजिक उपक्रम राबविण्याचा उद्देश हा सर्व समाजातील तळागाळाच्या घटकापर्यंत हा संदेश पोहोचवून गरजू व्यक्तींना आई वडिलांना हा संदेश पोहचवून लग्नारा लागणाऱ्या अवाढव्य खर्चासाठी कर्जबाजारी किंवा आपली शेती विकून घरदार विकून लग्न लावण्याची गरज नसून आमच्या विवाह मेळाव्यात केवळ नोंदणी करून सर्व जबाबदारी मुक्त व्हावे, एखाद्या धनाढ्य माणसाला लाजवेल अशा पद्धतीने हा विवाह सोहळा पार पडण्यात येईल असे मत राजेंद्र शेळके यांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाचे संयोजक दिपकदादा ओंकार तर आयोजक राजेंद्र शेळके असून स्थानिक नागरिकांनी या उपक्रमास जास्तीत जास्त लग्न नोंदणी करून सहकार्य करावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

नोंदणी साठी संपर्क ( राजेंद्र शेळके८८०६०८८१०५,दीपकदादा ओंकार ९८५०७७६६७०, अजय कदम ९४०३१५५७३६, वसंत राठोड ९७६७२८७०८८, लक्ष्मीपती दोनपेल्लीवार ९८५०४८७६९४)

## डॉ. आंबेडकर जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी वसंत सवई

**उमरी**-विश्वरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या उमरी शहर अध्यक्षपदी वंसत सवई तर उपाध्यक्षपदी अनिल सोनकांबळे यांची निवड करण्यात आली .



डॉ.बाबासाहेब आंबेडकर महोत्सवनिमीत्त दि २२मार्च २०२६ रोजी माजी उपनगराध्यक्ष अनिल सोनकांबळे यांच्या अध्यक्षतेखाली सांस्कृतिक सभागृहात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी रापतवार नगर,पोर्णीमा नगर, व्यंकटेश नगर, काश्यप बुद्ध विहार परीसर, डॉ आंबेडकर नगर शहरातिल सर्व नगरातील बौध्द बांधव उपस्थित होते सर्वानुमते पुढीलप्रमाणे डॉ बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती गठीत करण्यात आली. अध्यक्ष वसंत सवई, उपाध्यक्ष ए एस सोनकांबळे कार्याध्यक्ष ईश्वर सवई, सचिव उपेंद्र खंदारे, सहसचिव नागेश सोनकांबळे कोषाध्यक्ष राजेश्वर सवई,संघटक संदिप गोवंदे, कैलास सोनकांबळे,सल्लागार नगरसेवक प्र .गजानन अडगुडवाड, संदिप लांडगे, अशोक कांबळे, सदस्य रविराज सवई, अजित सोनकांबळे, कपिल सवई,शुभम सोनकांबळे, विशाल खंदारे, गौतम सोनफळे,गौतम लांडगे, तरुण वाघमारे,लक्ष्मण सवई, राहुल खंदारे, सिध्दार्थ वाघमारे, , चंद्रकांत श्रीकांबळे, चंद्रप्रकाश पवार, मिलिंद सवई, ईश्वर लोखंडे, जयवंत सोनकांबळे,बाळू लांडगे विश्वास कसबे, विकास खंदारे निखिल सोनकांबळे, छकुल खंदारे, गंगाधर दे. सवई, कुणाल सोनकांबळे,किरण कदम, दिपक सवई, अविनाश सवई, संजय सोनटक्के, गौतम सोनटक्के, अदिची निवड करण्यात आली आहे.सदरील नवनिर्वाचित कार्यकर्णिचे पदाधिकारी यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

## हाणेगाव विभागात एस आय आर मतदार नाव नोंदणीचे कार्य प्रगतीपथावर

**हाणेगाव** -सध्या महाराष्ट्रात चालू असलेल्या एस आय आर म्हणजेच मतदान कार्डचे नवीन नाव समावेश प्रक्रिया २००२ मध्ये लग्न झालेल्या महिलांनी आपल्या मतदारसंघातील बी एल ओ ला भेटून आपल्या वडीलाचे मतदान कार्ड व नाव समाविष्ट असलेले कार्डचे नंबर देऊन प्रक्रिया पूर्ण केली जात आहे तरी हाणेगाव येथील आठ मतदान केंद्रामध्ये



सर्व बी एलओ चे काम जवळपास ८० ते ९० टक्के पूर्ण झाले असून पुढील कामासाठी सर्व कार्य करत असल्याचे दिसून येत आहे हाणेगाव विभागात १४ गावे असून यामध्ये हाणेगाव खुतमापूर, कोकलगाव, बिजलवाडी, कुणमारपल्ली, कामाजीवाडी, कुडली ,वझर ,कबीरवाडी, शिळवणी, महेबूबनगर तुंबरपळी, या गावातील सर्व बी एल ओ ची कामे प्रगतीपथावर असल्याचे टी आर बिरादार यांनी सांगितले या बी एल ओ चे सुपरवायझर हाणेगाव विभागाचे मंडळ अधिकारी लक्ष्मण बेंजलवार, व तसेच चैनपुरे व्ही व्ही काम पाहत आहेत तर हाणेगाव येथील संपूर्ण बी एल ओ चिट्टी व मधील असलेले कर्मचारी टी आर बिरादार, सोनवणे एस बी, कुंभार वि जी ,पवार बी पी, मदने एस पी, भंडारे एस ,आर ,राठोड ए जी, चलवे एस व्ही ,या सर्व बी एल ओ चे कार्य प्रगतीपथावर असल्याचे बिरादार टी आर यांनी सांगितले

## श्री साईबाबा मंदिर कलशारोहनचा वर्धापन दिन : आज भव्य कीर्तन सोहळा

**नांदेड** -माजी खासदार तथा विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या पुढाकारातून नांदेड - लातूर रोडवरील साईनगर धनगरवाडी येथे स्थापन करण्यात आलेल्या श्री साईबाबा मंदिर कलेशारोहणचा आठवा वर्धापन दिन आज २६ मार्च रोजी साजरा करण्यात येणार आहे . वर्धापन दिनानिमित्त महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध हभप अच्युत महाराज दस्तापुरकर यांचा भव्य कीर्तन सोहळा आयोजित करण्यात आला असून याच दिवशी महाप्रसादाचे ही आयोजन करण्यात आले आहे. कलशारोहण वर्धापन दिन आणि किर्तन सोहळ्यास उपस्थित राहून लाभ घेण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तथा माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण पाटील चिखलीकर , भारतीय जनता पार्टीच्या महिला आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्ष सौ प्रणिताताई देवरे - चिखलीकर यांनी केले आहे. या मंदिराचा कलिशारोहणाचा आठवा वर्धापन दिवस दिनांक २६ मार्च रोजी सकाळी दहा वाजता आयोजित करण्यात आला आहे. यानिमित्त हरिभक्त परायण श्री अच्युत महाराज दस्तापुरकर यांचे कीर्तन होईल . त्यानंतर महाप्रसाद ही आयोजित करण्यात आला आहे. आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहणार असून . यावेळी हरिभक्त परायण बालाजीराव पाटील मारताळेकर , ह भ प बालाजीराव झुंबाड, ह भ प बाबुराव केंद्रे , धनगरवाडीचे सरपंच अमित संजय पगडे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे अशी माहिती देण्यात आली आहे. आयोजित कीर्तन सोहळ्याचा आणि महाप्रसादाचा भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रवीण पाटील चिखलीकर , सौ प्रणिताताई देवरे - चिखलीकर बालाजी पाटील मारतळेकर, बाबुराव केंद्रे, बालाजी झुंबाड व अमित पगडे सरपंच धनगरवाडी यांनी केले आहे .

# धम्मगुरु भदंत पंयाबोधी थेरो ३६ उपासकांसह थायलंड दौऱ्यावर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २५ मार्च-**

येथील अखिल भारतीय भिक्खू संघाचे जिल्हाध्यक्ष तथा तालुक्यातील खुरगाव नांदुसा परिसरातील श्रामणेर प्रशिक्षण केंद्राचे संचालक, संघनायक तथा धम्मगुरु भदंत पंयाबोधी थेरो हे दि. २२ मार्चपासून बौद्ध राष्ट्र थायलंडच्या धम्माभ्यास दौऱ्याकरिता येथील हुजुरसाहेब नांदेड रेल्वेस्थानकावरुन रात्री १०.४० वा. रवाना झाले आहेत. ते तेलंगणा मार्गे बँकाक, पाटाया, धम्मगया, आयुथाया अशा विविध ऐतिहासिक ठिकाणी जाणार असून तेथील बौद्ध संस्कृती व लोकजीवनाचा अभ्यास करणार आहेत. धम्माभ्यास दौऱ्याकरिता जाणाऱ्या ३७ बौद्ध उपासक उपासिकांसाठी मंगल कामना व्यक्त करण्यासाठी येथील रेल्वे स्थानकावर श्रामणेर भिक्खू संघासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

श्रामणेर प्रशिक्षण केंद्राच्या वतीने बौद्ध उपासक उपासिकांसाठी जगातील बौद्ध राष्ट्रांचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात येतो. धम्मदीक्षा सुवर्ण काळाचे औचित्य साधून सदरील दौरा आयोजित करण्यात आला आहे. यात भदंत पंयाबोधी थेरो यांच्यासह अशोक कोल्हे, अरुणा कोल्हे, दैवशाला गोंडाणे, संघमित्रा पंडित, वंदना थोरात, वंदना नरवाडे, यशोधरा नरवाडे, अशोक ढबाले, चतुरा ढबाले, गणपत नरवाडे, गंगासागर इंगोले आदीसह अन्य बौद्ध उपासक उपासिका सहभागी झाले आहेत. हा दौरा २९ मार्च पर्यंत चालणार असल्याचे भदंत पंय्याबोधी थेरो यांनी सांगितले.

# लोहा शहरात नागरिकांसाठी सुविधायुक्त सार्वजनिक शौचायाचा शुभारंभ

**तभा वृतसेवा**
**लोहा, दि. २५ मार्च-**

जनतेच्या अनेक वर्षापासुनच्या मागणीला यश मिळाले असुन शहरात विविध ठिकाणी सुविधायुक्त सार्वजनिक शौचालय उभारणीच्या कामाचा शुभारंभ झाला आहे.



लोहा शहरात नागरिकाला लघु शंका करण्यास अनेक अडचणी येत होत्या, अनेक वर्षापासुन जनतेची मागणी होती ,शहरात सार्वजनिक शौचालय व्यवस्था करावी ही अनेक वर्षापासुन मागणी होती. या मागणीचा विचार करुन आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनियुक्त नगराध्यक्ष शरद पाटील पवार व उपनगराध्यक्ष करिमभाई शेख ,गटनेते भास्कर पाटील पवार यांनी निर्णय घेतला आणि या कामाचा शुभारंभ केला.

शहरात गर्दीचे ठिकाण अनेक असुन योजनेचा व्यापारी वर्गाला त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन जागेची निवड करण्यात आली आहे. जागेवर जवळ कोणाची हारकत रहाणार नाही अशा जागा शोधुन सुविधायुक्त सार्वजनिक स्वच्छालयाच्या बांधकामाल सुरूवात केली आहे. छ. शिवाजी महाराज चौक, समशानभूमी परिसर , जिल्हा परिषद शाळा परिसर या ठिकाणी शौचालयांच्या उभारणीचा शुभारंभ केला आहे. या शौचालयांमुळे शहरातील नागरिकांच्या मूलभूत सुविधांमध्ये मोठी भर पडणार आहे असेही नगराध्यक्ष शरद पाटील पवार यांनी मत व्यक्त केले.

# कृत्रिम पाणी टंचाईवर नियोजनाची बैठक बोलवा : प्रविण गायकवाड

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २५ मार्च-**

मुदखेड येथील नगरपालिके तर्फे मुदखेड शहरासाठी पिंपळकौठा (म) तलाव आणि सिता नदीवरील विहिरीतून पिण्याच्या पाण्याचा पुरवठा केला जातो. गेल्या आठ दिवसांपासून पाणि पुरवठा विस्कळीत झाल्याने शहरातील नागरिकांना मोठ्या कृत्रिम पाणि टंचाईचा सामना करावा लागत आहे. मुदखेड शहरास कमी पडणार नाही एवढा पाणि साठा उपलब्ध असतांना नागरिकांना नगर पालिकेच्या नियोजना अभावी कृत्रिम टंचाई सद्रस्य परिस्थितीतून जावे लागत आहे. ही बाब योग्य नसल्याचे हेरून नवीन कॉनशिलला कृत्रिम पाणि टंचाई बाबत तात्काळ बैठक



बोलावून पाणि टंचाई सद्रस्य परिस्थितीवर नियंत्रण आणून शहरातील नागरिकांना दिलासा द्यावा असा सल्ला मुख्याधिकारी मुदखेड यांच्याकडे एका लेखी निवेदना द्वारे भाजपाचे जेष्ठ कार्यकर्ते प्रवीण गायकवाड यांनी दिला आहे. निवेदनाच्या प्रति माजी मुख्यमंत्री खा.अशोकराव चव्हाण,आ.ॲड.श्रीजया चव्हाण, नगराध्यक्ष विश्रांती कदम, पाणी पुरवठा सभापती शाम चंद्रे यांनाही देऊन कृत्रिम पाणि टंचाई बाबत सर्वांचे लक्ष वेधले आहे.

# मनपा शिक्षण व महिला बालकल्याण समितीच्या उपसभापतीपदी निरंजना लांडगे



**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २५ मार्च-**

नांदेड वाघाळा शहर महापालिकेच्या शिक्षण व महिला बालकल्याण समितीच्या उपसभापतीपदी सिडको प्रभाग क्रमांक २० च्या नगरसेविका सौ. निरंजनाताई राजू लांडगे यांची जिल्हाधिकारी तथा पिठासीन अधिकारी राहुल कर्डिले यांनी एका बैठकीत बिनविरोध निवड करण्यात आली.

नुकत्याच झालेल्या सर्वसाधारण सभेत शिक्षण व महिला बालकल्याण समितीच्या ११ सदस्यांची निवड करण्यात आली. या बैठकीत शिक्षण व महिला बालकल्याण समिती उपसभापतीपदी सिडकोच्या नगरसेविका सौ. निरंजनाताई राजू लांडगे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीबद्दल प्रभागातील सामाजिक कार्यकर्ते नितीन वाघमारे, शिलवान लांडगे, विशाल जोंधळे, दिलीप लांडगे, पप्पू सूर्यवंशी, अरुण भुते, मू. पठाण, गजानन कहाळेकर, गौतम पवार, सिद्धार्थ पवार, सौ.ममता लांडगे, दैवशाला वाघमारे, सुनीता पवळे, सीमा भुते, किरण यादव पत्रकार संभाजी सोनकांबळे सुरेश आंबटवार, शरद काटकर यांच्यासह सामाजिक, राजकीय क्षेत्रातील कार्यकर्ते व समाज बांधवांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# किनवट नगर परिषदेची धडक कारवाई; थकबाकीदारांचे दोन गाळे सील

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. २५ मार्च-**

थकबाकीदारांविरोधात प्रशासनाने कठोर भूमिका घेतली असून किनवट नगर परिषद आता पूर्णपणे क्शन मोडमध्ये आली आहे. वारंवार सूचना देऊनही करांचा भरणा न करणाऱ्या मालमत्ता धारक, गाळेभाडेकरू, जमीन भाडे व पाणीपट्टी थकबाकीदारांवर ठोस कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. मंगळवारी (दि. २४ मार्च) नगर परिषदेने शहरात धडक मोहीम राबवत दोन व्यावसायिक गाळे जप्त करून सील केले. या कारवाईमुळे थकबाकीदारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

जमीन भाडे, गाळे भाडे, मालमत्ता कर आणि पाणीपट्टी थकविणाऱ्यांविरोधात प्रशासनाने आक्रमक पवित्रा घेतला आहे. आर्थिक वर्ष संपण्यास अवघे काही दिवस शिल्लक असताना वसुलीला गती देण्यासाठी नगर परिषदेकडून कठोर पावले उचलली जात आहेत. आजच्या मोहिमेत शहरातील दोन मोठ्या थकबाकीदारांचे गाळे सील करून जप्तीची कारवाई करण्यात आली.



या संदर्भात बोलताना नगर परिषदेचे मुख्याधिकारी मृगाजी काकडे यांनी सांगितले की, नागरिकांनी कटू कारवाई टाळण्यासाठी ३० मार्च २०२६ पूर्वी सर्व थकीत पाणीपट्टी, मालमत्ता कर, गाळे भाडे व जमीन भाड्याचा भरणा करावा. मुदतीत कर न भरल्यास संबंधितांच्या मालमत्ता जप्तीची मोहीम अधिक तीव्र करण्यात येईल.

या धडक मोहिमेत कर विभाग प्रमुख श्री. घुले यांच्यासह श्री. संमुखराव, स्वानंद मामीलवाड, शेख रियाज, श्री. कैतवाड, परमेश्वर कचमोडे, अनिल माहूरकर, गंगाधर दोनपेलीवार तसेच नगर परिषदेचे कर्मचारी व पथक सहभागी होते. दरम्यान, आगामी आठवड्यात शहरातील विविध भागांत अशीच मोहीम राबविण्यात येणार असून जप्तीची नामुष्की टाळण्यासाठी नागरिकांनी तात्काळ कर भरणा करून सहकार्य करावे, असे आवाहन नगर परिषद प्रशासनाने केले आहे.

# शिक्षण, समाज आणि संस्कृतीच्या बेरजेतूनच मानवी सभ्यतेची निर्मिती : डॉ. विश्वधार देशमुख

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. २५ मार्च-**

स्वातंत्र्यसेनानी पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आयोजित १९ व्या व्याख्यानमालेत प्रमुख वक्ते डॉ. विश्वधार देशमुख यांनी मानवी उत्क्रांती, सभ्यता आणि शिक्षणाच्या मूळ संकल्पनांवर अत्यंत प्रभावी व विचारप्रवर्तक भाष्य केले. दि २४ मार्च रोजी (मंगळवारी) देगलूर येथील आयोजित व्याख्यानमालेत डॉ. देशमुख म्हणाले की, आजच्या समाजातून ग्रॅडमदर टच हरवला असून शिक्षण, समाज आणि संस्कृतीच्या बेरजेतूनच मानवी सभ्यतेची निर्मिती होते असे ते सांगितले.

स्वातंत्र्यसेनानी पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ मागील १९ वर्षांपासून व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात येते. काल दि. २४ मार्च रोजी (मंगळवारी) प्रमुख वक्ते डॉ. विश्वधार देशमुख यांनी शिक्षण, समाज आणि संस्कृती याविषयावर मार्गदर्शन केले. यावेळी आपल्या भाषणात डॉ. देशमुख म्हणाले की, सुमारे २० लाख वर्षांपासून चालू असलेल्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेतून होमो सेपियन्स हा जीव सृष्टीचा केंद्रबिंदू कसा झाला, हे समजून घेणे म्हणजे मानवी सभ्यतेचा प्रवास समजून घेणे होय. मानव सृष्टीचा स्वामी झाला, त्यामागे शिक्षण, समाज आणि संस्कृती यांची बेरीज आहे, असे ते म्हणाले. पुढे बोलताना ते म्हणाले की, त्यांनी तथागत गौतम बुद्ध, वर्धमान महावीर, येशू ख्रिस्त, महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा



ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, स्वामी विवेकानंद यांसारख्या महान व्यक्तिमत्त्वांनी मानवी सभ्यतेला आदर्श घालून दिला आहे. तर दुसरीकडे हिटलर, चंगेज खान यांसारख्या विनाशकारी प्रवृत्तींचाही दाखला दिला.

दरम्यान कार्यक्रमाची सुरुवात स्वातंत्र्यसेनानी पोशट्टीदादा उनग्रतवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन करण्यात आले. तसेच प्रा. गौतम भालेकर व प्रकाश सोनकांबळे यांनी भक्तीगीत सादर करुन उपस्थितांची मने जिंकली. यावेळी अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्दन चिद्रावार, सहसचिव राजकुमार महाजन, कार्यकारणी सदस्य देवेंद्र मोतेवार, सदस्य रविंद्र अप्पा दयाडे, सदस्य विजय उनग्रतवार, प्राचार्य मोहन खताळ, उपप्राचार्य डॉ अनिल चिद्रावार, डॉ. जनार्दन भुमे, डॉ. विनायक मुंडे, डॉ. सर्जेराव रणखांब, डॉ. संजय देबडे, डॉ. माधव चोले, कवी लक्ष्मण मलगिलवार, जेष्ठ सेवानिवृत्त शिक्षक एच.एस. खंडागळे यांच्यासह आदीं मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ देशमुख भाष्य करताना म्हणाले की, प्रत्येक व्यक्तीत एक 'महामानव' दडलेला असतो आणि त्या बीजाला अंकुरित करण्याची प्रक्रिया म्हणजे खरे शिक्षण असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच समाज ही केवळ जात किंवा पोटजात नसून नीती आणि नियमांनी बांधलेला समूह आहे, असे स्पष्ट करत त्यांनी सध्याच्या संकुचित विचारसरणीवर टीका केली.

संस्कृती ही धर्मापुरती मर्यादित नसून ती प्रदेश, परंपरा आणि जीवनशैलीची व्यापक अभिव्यक्ती असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. राजेश्वर दुडूकनाळे यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. अशोक टिपरसे यांनी मांडले. तर या कार्यक्रमास विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...

### श्री शिवाजी तंत्रनिकेतनमध्ये 'सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक व रस्ता सुरक्षा' विषयावर मार्गदर्शन

**परभणी,/प्रतिनिधी :** म.शी.प्र. मंडळ संचलित श्री शिवाजी तंत्रनिकेतन येथे मंगळवार २४ मार्च रोजी 'सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक व रस्ता सुरक्षा' या विषयावर तज्ज्ञ मार्गदर्शन कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. शाहिद ठेकीया होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून मोटार वाहन निरीक्षक अविनाश मोराडे तसेच सहाय्यक मोटार वाहन निरीक्षक अविनाश चौंडे उपस्थित होते. यावेळी प्रा. राहुल काळीकर, प्रा. विजय पाटील, प्रा. अमोल बेंडसुरे, प्रा. रसिका चौधरी, प्रा. कदम एच. के. यांसह सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ. ठेकीया यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, शासकीय सेवेत प्रवेशासाठी स्पर्धा परीक्षा हा एकमेव प्रभावी मार्ग असून तंत्रशिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठीही या क्षेत्रात भरपूर संधी उपलब्ध आहेत. तसेच त्यांनी रस्ता सुरक्षेबाबतही महत्त्वपूर्ण सूचना दिल्या. यानंतर प्रमुख मार्गदर्शक अविनाश मोराडे व अविनाश चौंडे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी, अभ्यासाचे नियोजन, करिअरच्या संधी, नियमितता आणि आत्मविश्वास याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी रस्ता सुरक्षेचे महत्त्व अधोरेखित करताना हेल्मेटचा वापर, सीट बेल्ट लावणे, वेग मर्यादेचे पालन यासारख्या नियमांचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे निरसन करून घेतले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा. राम चव्हाण यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. नितीन काळे, प्रा. मनोज दुधाटे तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

### श्रीराम जन्मोत्सवानिमित्त आज गंगाखेडात भव्य मिरवणुकीचे आयोजन

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** श्रीराम जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त गुरुवार २६ मार्च रोजी गंगाखेड येथे भव्य कार्यक्रमाचे आयोजन श्रीराम जन्मोत्सव समिती व समस्त हिंदू बांधवांच्या वतीने करण्यात आले आहे.

यंदाच्या सोहळ्यानिमित्त २३ व २४ मार्च रोजी शहरातील सुमारे २० विद्यालयांमध्ये पुणे येथील प्रसिद्ध व्याख्याते विजय खुटवड (श्री संत सेवा संघ, पुणे) यांचे 'पुरुषोत्तम श्रीराम' या विषयावर प्रेरणादायी व्याख्यान पार पडले. २६ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजता प्रभू श्रीरामांची चांदीच्या रथातून भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. या मिरवणुकीत पुणे येथील ढोल पथक, पारंपरिक संबळ वादक, वारकरी भजनी मंडळ तसेच राम, लक्ष्मण व सीता यांचे सजीव देखावे सादर करण्यात येणार आहेत.
मिरवणुकीनंतर प्रभू श्रीरामाची आरती व महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. मिरवणुकीचा मार्ग गोदाकाठ येथून सुरू होऊन भगवती चौक, श्रीराम चौक, अहिल्याबाई होळकर चौक मार्गे शिवस्मारक येथे श्रीराम पूजनानंतर समारोप होणार आहे. या भव्य सोहळ्यास पंचक्रोशीतील माता-भगिनी, युवक-युवती, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी व सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीराम जन्मोत्सव समिती, गंगाखेडतर्फे करण्यात आले आहे.

### महानगरपालिकेसमोर दुसऱ्या दिवशीही संतप्त कार्यकर्त्यांचे ठिय्या आंदोलन

**परभणी,/प्रतिनिधी :** महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ३ अंतर्गत वांगी रस्त्यावर अपना नगर भागातील हनुमानाची मुर्ती हटविल्यास मंदिराचा ओटा व टीनशेड जमीनदोस्त केल्याच्या निषेधार्थ शिवसेनेच्या संतप्त कार्यकर्त्यांनी आज बुधवारी दुसऱ्या दिवशीही महापालिका कार्यालयासमोर पुन्हा ठिय्या आंदोलन सुरु करीत प्रशासनास धारेवर धरले.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या नेतृत्वाखाली संतप्त कार्यकर्त्यांनी बुधवारी पुन्हा महापालिका कार्यालय गाठून महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांना जाब विचारला. यावेळी आयुक्त नार्वेकर यांनी कर्मचाऱ्यांच्या चुकीमुळे तो प्रकार घडला. त्या संदर्भात चौकशी केली जाईल व संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल, अशी माहिती दिली.

दरम्यान, मंगळवारी महापालिका कार्यालयातील फर्निचरची तोडफोड केल्याबद्दल सहाय्यक आयुक्त तुकाराम कदम यांनी दिलेल्या तक्रारीनुसार नवा मोंढा पोलिसांनी आंदोलनकर्त्या शिवसेनेचे जिल्हाप्रमुख आनंद भरोसे, माणिक पौंढे, अशोक गव्हाणे, राहुल शिंदे, अरुण झांबरे, माधव खुणे, निजर बुचाले, धनंजय जाधव, सचिन पाटील, निखिल सक्तेपार, आकाश गरुड, करण भोसले, नरेश इरळदकर या १३ जणांविरोधात गुन्हा दाखल केला.

### परभणीच्या आद्या बाहेतीची राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात निवड

**परभणी,/प्रतिनिधी :** गुजरातमधील गांधीधाम येथील एम. पी. मित्रा इंडोअर स्टेडियममध्ये २३ ते ३१ मार्च दरम्यान होणाऱ्या ८७ व्या सब-ज्युनिअर व कॅडेट आंतरराज्य अजिंक्यपद राष्ट्रीय टेबल टेनिस स्पर्धेसाठी परभणी जिल्ह्यातील कु. आद्या महेश बाहेती हिची महाराष्ट्र संघात निवड झाली आहे. ती ११, १३ व १५ वर्षांखालील मुलींच्या गटांमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व करणार आहे.

२०२५ वर्षात महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेतर्फे आयोजित सहा राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करत गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावल्यामुळे आद्याची राज्य संघात निवड झाली आहे. विशेष म्हणजे, अल्पवयात अशी कामगिरी करणारी आद्या ही राज्यातील पहिलीच खेळाडू ठरली असल्याची माहिती परभणी जिल्हा टेबल टेनिस संघटनेचे सचिव गणेश माळवे यांनी दिली.

आद्या ही भारतीय क्रीडा प्राधिकरण व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, परभणी यांच्या अंतर्गत चालणाऱ्या ङ्खखेलो इंडियाफ प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षक चेतन मुक्तावार यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करते. तसेच अनिल बंदेल, सचिन पुरी, असद अली, अजय कांबळे, ईश्वर कदम यांचे तिला वेळोवेळी मार्गदर्शन लाभते. ऐश्वर्या पाटील (फिजिओ) व कांचन बसेकर (योग प्रशिक्षक) यांचेही सहकार्य मिळत आहे. सध्या आद्या स्कॉटिश अकॅडमीमध्ये इयत्ता पाचवीत शिक्षण घेत आहे.

आद्याच्या या यशाबद्दल महाराष्ट्र राज्य टेबल टेनिस संघटनेचे अध्यक्ष प्रवीण लुकंड, राष्ट्रीय सरचिटणीस यतिन टिपणीस, जिल्हा क्रीडा अधिकारी गीता साखरे, संजय मुंढे, कल्याण पोले, मिलिंद साळवे, सुयश नाटकर, रोहन ओंढेकर, गणेश माळवे, डॉ. विवेक नावंदर यांच्यासह प्रशिक्षक, खेळाडू व पालकांनी तिचे अभिनंदन केले.

### श्रीराम नवमी निमित्त आज परभणीत शोभायात्रा

**परभणी,/प्रतिनिधी :** श्रीराम नवमी व हिंदू एकता दिवसाच्या निमित्ताने गुरुवार २६ मार्च रोजी श्रीराम जन्मोत्सव समितीच्या वतीने परभणी शहरात भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले असून सर्व श्रीराम भक्तांनी मोठ्या संख्येने या शोभायात्रेत सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

मागील १३ वर्षांपासून सुरू असलेली ही परंपरा यावर्षीही उत्साहात पार पडणार असून ही शोभायात्रा गुरुवार २६ मार्च रोजी दुपारी ४.३० वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते शनिवार बाजार दरम्यान निघणार आहे.

# सोनपेठात वाळू तस्करांचे पेव फुटले! रात्रीच्या अंधारात वाळू तस्करांचा हैदोस...!

## प्रशासनाची अवैध वाळू वाहतुकीकडे दुर्लक्षच ठरतेय कारणीभुत, लक्ष देण्याची नागरिकांची मागणी

**बाबासाहेब गर्जे**

**सोनपेठ,/प्रतिनिधी:-** तालुक्यासह बाहेर तालुक्यातील गोदापात्रातून अवैध रेती उपसा केलेल्या हायवा टिप्पर ची रात्रभर सोनपेठ शहरात वाहतूक सुरू आहे. त्यामुळे शहरातील नागरिकांना या वाहनांच्या कर्कश आवाजाचा रात्रभर नाहक त्रास सहन करावा लागत आहे. तसेच शासनाच्या रेतीची बिनदिक्कत तस्करी होत असल्याने मोठ्या प्रमाणात शासन महसूल सुद्धा बुडवला जात आहे.

पाथरी तालुक्यातील मुद्गल येथे प्रशासनाच्या नाकावर टिच्चून रेतीची तस्करी सुरू असल्याच्या या गंभीर बाबीकडे कोणतेही प्रशासन लक्ष देत नसल्याने रेती तस्करही आता निर्भीड बनले असल्याचे दिसून येत आहे. सध्या सोनपेठ तालुक्यातील लासीना, वाडीपिंपळगाव आणि मानवत तालुक्यातील वांगी, गंगाखेड तालुक्यातील महातपूरी येथील गोदापात्रातील रेती घाट अधिकृतपणे लिलाव पद्धतीने महसूल प्रशासनाने विक्री केले असून त्यातूनही अवैध रेती उपसा सुरू आहे. या अधिकृत वाळू घाटाच्या नावाखाली वारेमाप उपसा केला जात आहे.महसुल अधिनियम ढाब्यावर बसवून रात्रभर पोकलेन मशीन गोदापात्रात टाकून रेती उपसा केला जातो आणि सकाळ होताच मशीन बाहेर काढून दुरवर उभ्या केल्या जातात. रात्रभर मशीनच्या साह्याने उपसा केलेली वाळू ची दिवसभर हायवा टिप्पर मधून वाहतूक केली जाते. दिवसा वाळू वाहतूक केली जात असलेल्या अनेक वाहनांकडे शासनाच्या अधिकृत पावत्या दिसून येत नाहीत. तर रात्रभर गोदापात्रात मशीनने वाळू उपसून मोठमोठे खड्डे पडले आहेत.सोनपेठ तालुक्यातील खडका,वाडी पिंपळगाव,मोहळा या ठिकाणी रात्रीचा बेकायदेशीर वाळू उपसा सुरू आहे.

पाथरी तालुक्यातील मुदगल येथील गोदापात्रातून गेली महिनाभरापासून बिनदिक्कीतपणे पोकलाईन मशीनच्या सहायाने मोठ्या प्रमाणात अवैध रेती उपसा सुरू असलेल्या गंभीर बाबीकडे संबंधित प्रशासन डोळेझाक का करत आहे? असा सवाल सामान्य नागरिकांतून उपस्थित केला जात आहे. सदरच्या अवैद्य रेतीची रात्रभर हायवा टिप्पर द्वारे सोनपेठ शहरात वाहतूक केली जात आहे. यावेळी रात्रीचे आकरा वाजल्यापासून पहाटे चार वाजेपर्यंत दहा ते बारा हायवा टिप्परचा नंगा नाच रात्रभर सोनपेठ शहरात सुरू आहे. शहरामध्ये २२ ते २५ हजार रुपये दराने प्रति पाच ब्रासचे एक हायवा टिप्पर विक्री केले जात आहे. मुळात पाथरी तालुक्यातील मुद्गल हे गावं शासनाच्या रेती घाटाच्या यादीमध्ये आहे. परंतु प्रत्येक वर्षी जिल्हाधिकारी स्तरावरून या घाटाचा लिलावा करण्या अगोदर संबंधित ग्रामपंचायतीकडून रेतीघाट संदर्भात हरकती मागविल्या जातात. अशावेळी मुद्गल येथील रेती तस्कर, सदरच्या रेती घाटाचा शासनाने लिलाव करु नये म्हणून शासनाकडे लेखी तक्रारी करत असतात. रेतीघाट सोडल्यानंतर प्रदूषणावर परिणाम होणार असून गावातील पिण्याच्या पाण्याची ही टंचाई भासू शकते व ग्रामस्थांना याचा नाहक त्रास भोगाव लागतो अशा प्रकारच्या खोट्या तक्रारी केल्या जातात. त्यामुळे शासन मुदगल येथील रेतीघाटाचा लिलाव करत नाही. याचाच फायदा घेऊन पावसाळा संपताच गावातील रेती तस्कर गोदापात्रातील अवैद्य रेती उत्खननासाठी सज्ज होतात.

त्यामुळे हे मुदगल येथील रेती तस्करांचे गोलमाल जिल्हा प्रशासन कधी ओळखणार? गोदापात्रातातू नियमबाह्य सुरू असलेल्या वाळू उत्खननामुळे शासनाचा कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवला जात आहे. या तस्करीला प्रशासन लगाम कधी लावणार? याकडे अनेक नागरिकांचे लक्ष लागून राहिले आहे.

### पाथरीत जुगार अड्ड्यांवर पोलिसांची धाड; १३ आरोपींवर कारवाई, दीड लाखांचा मुद्देमाल जप्त

**परभणी,/प्रतिनिधी :** पाथरी शहरातील जुगार अड्डे व मटका बुकी सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सोमवार २३ मार्च रोजी धाड टाकत दोन ठिकाणी कारवाई केली. या कारवाईत एकूण १३ आरोपींना ताब्यात घेण्यात आले असून सुमारे १ लाख ४९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पहिल्या कारवाईत रशिद कॉलनी परिसरातील एका शेडमध्ये 'तिर्रट' नावाचा जुगार खेळताना ८ जणांना रंगेहाथ पकडण्यात आले. त्यांच्या ताब्यातून ३३ हजार २०० रुपयांची रोकड व ७ मोबाईल असा एकूण ८३ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी पाथरी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १४८/२०२६ अन्वये महाराष्ट्र जुगार कायद्यानुसार गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पोहेकॉ अनिल हत्ती अंबीरे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. दुसऱ्या कारवाईत नायब हॉटेल परिसरातील एका शेडमध्ये 'फन टारगेट चक्री (बिंगो)' हा ऑनलाइन जुगार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर छापा टाकण्यात आला. या ठिकाणी ५ आरोपींना ताब्यात घेऊन ३६ हजार ६०० रुपयांची रोकड, एक मोबाईल तसेच संगणक व अन्य साहित्य असा एकूण ६६ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी गुन्हा क्रमांक १४९/२०२६ दाखल करण्यात आला असून तपास पोहेकॉ नारायण शितळे यांच्याकडे देण्यात आला आहे.या दोन्ही कारवायांमध्ये एकूण ६९ हजार ८०० रुपयांची रोकड, ८ मोबाईल तसेच संगणक साहित्य जप्त करण्यात आले आहे. या मोहिमेत पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे यांच्यासह पोहेकॉ प्रदीप खानसोळे, संजीव जिंकलवाड, गणेश धुमाळ व कामाजी गवळी यांनी सहभाग घेतला.

# पूर्णेत गॅसचा तुटवडा..... एजन्सीचा नियोजन शून्य कारभाराचा घरगुती गॅस धारकांना फटका...लांबच लांब रांगा




**पूर्णा,/प्रतिनिधी-** शहरात पूर्णा गॅस एजन्सीवर नियोजन शून्य कारभारामुळे शहरवासीयांना ऐन रमजान महिन्यात ईद च्या दिवशी सकाळी नऊ वाजल्यापासून रांगेत उभे राहून ही गॅस सिलेंडर मिळत नसल्याने लाडक्या बहिणीसह अनेकांना रिकाम्या हाती वापस जावे लागले.दहा दिवस अगोदर नंबर लावूनही
रांगेत उभं राहून सुद्धा गॅस सिलेंडर न दिल्यामुळे ग्राहकांना रिकाम्याहाती वापस जावे लागले.डीएसी नंबर, ओटीपी आल्यानंतरही गॅस सिलेंडर मिळत नसल्याने पूर्णा गॅस एजन्सीच्या नियोजन शून्य कारभारामुळे ग्राहकानी तीव्र नाराजी व्यक्त करण्यात येत आहे.

जिल्हा प्रशासन एकीकडे घरगुती गॅसची टंचाई नसल्याचे सागत असताना मात्र शहरातील पूर्णा गॅस एजन्सीच्या नियोजन शून्य कारभारामुळे नागरिकांना नाराजी व्यक्त केली आहे. पुरवठा विभागाने गॅस एजन्सी चालकाच्या या मनमानी कारभार लक्ष देण्याची गरज आहे. परंतु असे होताना दिसत नाही. यामुळे महसूल प्रशासना विरोधात नागरिकांनी नाराजी व्यक्त केली जात आहे.दरम्यान गॅस सिलिंडरच्या तुटवड्याच्या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी ऑनलाईन बुकिंग करूनही सिलेंडर घरपोच दिले जात नाही.तसेच रांगेत उभं राहूनही मिळत नाही.पुरवठा विभागाने तत्काळ लक्ष देऊन शहरातील गॅस पुरवठा सुरळीत करावा अशी मागणीही नागरिकातून होत असल्याचे दिसून आले आहे.

# श्री.संत हिरामनगिरी महाराज जाग्रूत संस्थान जिंतुर या ठिकाणी भव्य यात्रा व भंडारा महाप्रसाद संपन्न

**जिंतूर,/प्रतिनिधी:** जिंतूर तालुक्यातील श्री.संत हिरामनगिरी महाराज जागृत देवस्थान जिंतूर येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी रविार दिनांक २२ मार्च रोजी भव्य दिव्य यात्रा संपन्न झाली व भंडारा संपन्न झाला या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिंतूरचे तहसीलदार मा.सौ.शितलताई कच्छवे व मा.प्रताप भैया देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की श्री.संत हिरामनगिरी महाराज जागृत देवस्थान जिंतूर येथे दरवर्षी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून गोसावी समाज आपल्या सहकुटुंब सहपरिवार सहित श्री.संत हिरामनगिरी महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी हजारोच्या संख्येने जिंतुर येथे येतात यानिमित्त श्री.संत हिरामनगिरी महाराज यांच्या कार्यक्रमाच्या ठिकाणी ह.भ.प.रामगिरी महाराज मिरखेलकर यांनी आपल्या प्रवचनातून समाजाला चांगले संदेश देण्यात आले तसेच प्रवचन झाल्या नंतर लगेच महाआरती घेण्यात आली जिंतूरच्या तहसीलदार मा.सौ.शितलताई कच्छवे व मा,प्रताप भैया देशमुख व श्री.जगनगिरी महाराज श्री.हिरामनगिरी महाराज श्री.तुळजीरामगिरी महाराज श्री.बाबारावगिरी महाराज श्री.सुंदरगिरी महाराज यांना महा आरतीचा मान देन्यात आला..... मा.प्रताप भैया देशमुख यांनी आपल्या भाषणात सांगितले की श्री.संत हिरामनगिरी महाराज यांच्या संस्थांसाठी नगरपरिषदेच्या वतीने पुढच्या वर्षीच्या यात्रेनिमित्त कुठलीही कमी पडू देणार नाही तसेच श्री संत हिरामनगिरी महाराजांच्या समाधी स्थळी जो काही विकास करता येईल त्यासाठी परभणी जिल्ह्याच्या कार्यसम्राट
पालकमंत्री तथा राज्यमंत्री मा.सौ.मैघनादिदी बोर्डीकर यांच्याकडे पाठपुरावा करून गोसावी समाजाचे अराध्य दैवत श्री.संत हिरामनगिरी महाराज यांच्या संस्थांनासाठी मी कुठल्याही प्रकारचा कमी पडु देणार नाही तसेच जास्तीत जास्त पालकमंत्र्यांकडे पाठपुरावा करून निधी आणण्यात येईल असे त्यांनी आश्वासन दिले यावेळी प्रमुख मान्यवरांनी श्री.संत हिरामण गिरी महाराज यांच्यासाठी आपले मनोगत व्यक्त केले
प्रमुख उपस्थिती
मा.श्री.अरुण भाऊ गिरी मा.श्री.नंदू भाऊ गिरी मा.श्री.विजु भाऊ धुंदी डॉ.संजय पुरी सर डॉ. केदार कटिंग सर डॉ. रामेश्वर नाईक सर डॉ.किरण बकान सर डॉ.महेश देशमुख सर श्री.मंगेश भाऊ कुरे श्री.गणेश भाऊ खवणे श्री.हनुमान सिंग भाऊ कच्छवे श्री.केशव वानरे श्री.स्वप्नील भैया भारती श्री.संजयभाऊ दराडे श्री.मुंजाभाऊ रनमाळ श्री.पांडुरंग भाऊ गीते श्री.उद्धव भाऊ नागरे श्री.अशोक आप्पा श्री.यादवरावजी थिटे श्री.पवन भैया पुरी श्री.गंगाधर भाऊ गिरी श्री.अंबादास भाऊ गिरी श्री.संजय भाऊ गिरी सुनील पडेकर,अशोक गिरी नंदु नरुके,बंशी धायत,राजु पवार यशवंत सोळुंके,श्रीकांत गिरी प्रभू दिलेवार,लक्ष्मण बामणे भारत पवार,काशीगीर वंश, सुरेश सोळंके,दशरथ काळमे, दुर्गेश चव्हाण,बापू राठोड शिवप्रसाद चव्हाण,तुकाराम पवार मोतीराम पडेकर,लक्ष्मण गिरी, संदीप दिलेवार,अर्जुन गोसावी ऋषिकेश दिलेवार,साईनाथ राठोड, रमेश दादा क्षेत्री अशोक नरुके,ज्ञानेश्वर चव्हाण, राजू देवडे,हरीश मुळे,रितेश गिरी,मोहन चव्हाण,परमेश्वर चव्हान,कृष्णा चव्हान बाबूसिंग गिरी,बालाजी राठोड, राजू कोळी, या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजी गिरी,गणेश गिरी,डिगांबर गिरी,प्रभु गिरी,मोहन चव्हान, यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेला गोसावी समाज बांधवांनी व भक्तांनी भव्य दिव्य असा कार्यक्रम संपन्न करण्यात आला कार्यक्रम संपल्यानंतर गोसावी समाजाच्या वतीने श्री.संत हिरामण गिरी महाराज जागृत देवस्थान जिंतुर या ठिकाणी भव्य महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते.

# तगड्या पोलीस बंदोबस्तात नगर परिषदेची अतिक्रमण हटाव मोहीमेस सुरवात.. नागरिकांनकडून स्वागत...रस्ते होणार मोकळे

**पूर्णा,/प्रतिनिधी:** रेल्वे स्थानकासमोरील कच्चे व पक्के अतिक्रमण नगर परिषदने बुलडोझर साह्याने तगड्या पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण काढली रस्ते मोकळे केले.

शहरात बऱ्याच ठिकाणी कच्चे व पक्के अतिक्रमण झाले आहे.या अतिक्रमण धारकाचा रहदारीस मोठ्या अडचणी निर्माण होऊ लागल्या. महिलाना शाळकरी विद्यार्थ्यांना ये जा करण्यास अडचण होत होती.अशा अनेक अडचणीच्या तक्रारी करण्यात आल्या होत्या. शेवटी पूर्णा पालिका प्रशासनाला जाग आली आणि मुख्याधिकारी




डॉ. उत्कर्ष गुट्टे यांच्या नेतृत्वाखाली पालिकेच्या सर्व अधिकारी कर्मचारी यांना घेऊन अतिक्रमण ठिकाणी पोहचले. त्याच प्रमाणे उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. समाधान पाटील, पोलीस निरीक्षक विलास गोबाडे, सहाय्यक पोलीस निरीक्षक गजानन पाटील, सुशांत किनगे, मंजुषा मोरे यांच्यासह अनेक अधिकारी, दंगा नियंत्रण, पोलीस कर्मचारी, होमगार्ड रेल्वे स्थानक समोरील अतिक्रमण धारकासमोर दाखल झाले. हे सर्व चित्र पाहताच नागरिकांनी चर्चा सुरू केली की आता हे अतिक्रमण निघणार. आणि बुलडोझर सुरू झाला. रेल्वे स्थानकासमोरील दूतर्फ असलेले अतिक्रमण पालिका प्रशासनाने हटण्यास सुरुवात केली. सध्या तरी रेल्वे स्थानकासमोरील दुतर्फा आणि डॉ.झाकीर हुसेन चौकातील शाळेजवळ असलेले अतिक्रमण पालिका प्रशासनाने काढले असून संध्याकाळपर्यंत ही मोहीम चालू होती. यावेळी या ठिकाणचा विद्युत पुरवठा बंद करण्यात आला होता. यावेळी तहसील प्रशासनाचे कर्मचारी, नगरपरिषद प्रशासकीय अधिकारी मुंतजीब खान,दिनेश मुळे, अब्दुल हकीम, उत्तम कांबळे, अशोक पारवे, राकेश जाधव याच्यासाह अनेक अधिकारी कर्मचारी, जेसीबी, ट्रॅक्टर उपस्थित होते. अतिक्रमण काढण्यास सुरुवात झाल्यामुळे अनेक नागरिकातून समाधान व्यक्त करण्यात आले आहे.